

महाराष्ट्राचे
शिल्पकार
साने गुरूजी
साहित्य आणि संस्कृति मंडळ
महाराष्ट्र राज्य
राजा मंगळवेढेकर
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

अनुक्रमणिका

**सेनानी साने गुरुजी**

अनुक्रमणिका

# सेनानी साने गुरुजी

राजा मंगळवेढेकर

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

अनुक्रमणिका

प्रथमावृत्ती : जानेवारी २००२

द्वितीयावृत्ती : जानेवारी २००५

महाराष्ट्राचे शिल्पकार : क्र. २

प्रकाशक :
सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय इमारत,
१७२, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय मार्ग,
दादर, मुंबई – ४०० ०१४.

© प्रकाशकाधीन

मुद्रक :
न्यू एज प्रिंटिंग प्रेस,
भूपेश गुप्ता भवन,
८५, सयानी रोड,
प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५

मुखपृष्ठ : राजा बडसल

किंमत : ४० रुपये

## अनुक्रमणिका

*साने गुरुजींना अभिप्रेत असलेली धडपड*
*आपल्या विद्यार्थिदशेपासूनच ज्यांनी आपल्या*
*जीवनात स्वीकारली आणि रुजवली त्या*
*सन्मित्र डॉक्टर सी. तु. ऊर्फ दादा गुजर*
*यांच्या सातत्यपूर्ण धडपडीला*
*स्नेहार्द्रपूर्वक अर्पण...*

## अनुक्रमणिका

# दुसऱ्या आवृत्तीच्या निमित्ताने

'साने गुरुजी' हे नाव मराठी साहित्यात आणि भारतीय स्वातंत्र्य संग्रामात अत्यंत तेजोमय नाव आहे. एक संपूर्ण पिढी साने गुरुजी यांच्या साहित्यावर पोसली होती. घराघरातून गुरुजी त्यांच्या कथेद्वारे पोचले होते.

मनात गहन गंभीर करुणा असल्याशिवाय विषमतेविरुद्ध खंबीर लढा देता येत नाही. 'क्रांती'च्या भूमीत करुणेची पाळेमुळे असल्याखेरीज ती यशस्वी होत नाही.

रक्त, अश्रू आणि घाम एकत्रित व्हावे लागतात. साने गुरुजींनी समतेच्या क्रांतीची स्वप्ने पाहिली. बहिष्कृतांच्या, वंचितांच्या, उपेक्षितांच्या लढ्याचे नेतृत्व केले.

आपले सर्वस्व पणाला लावून गुरुजींनी कष्टकऱ्यांच्या, कामकऱ्यांच्या, शेतकऱ्यांच्या हितासाठी लेखणी, वाणी झिजवली. साने गुरुजी हे लाखो युवकांचे प्रेरणास्रोत झाले. महाराष्ट्राच्या थोर शिल्पकाराचे चरित्र राजा मंगळवेढेकर यांनी परम निष्ठेने आणि कठीण परिश्रमाने तयार केले आहे. अल्पावधीत या प्रकाशनाची दुसरी आवृत्ती निघत आहे. मराठी वाचकांची वाचन संस्कृती टिकून असल्याची ही खूण आहे. या प्रकाशनासाठी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे प्रभारी सचिव श्री. उ. बा. सूर्यवंशी, श्री. ज. शं. साळवी, व श्रीमती छा. दि. गोडांबे आणि मंडळाचे कर्मचारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले, त्याबद्दल आभार.

| | |
|---|---|
| | **प्रा. रतनलाल सोनग्रा** |
| मुंबई | अध्यक्ष |
| दिनांक : २९ डिसेंबर, २००४ | महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ |

अनुक्रमणिका

# निवेदन

महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, आर्थिक व वैचारिक जडणघडणीत ज्या दिवंगत महनीय व्यक्तींचा महत्त्वपूर्ण सहभाग आहे अशा व्यक्तींची साधारणतः शंभर ते सव्वाशे पानांची सुबोध मराठी भाषेत चरित्रे लिहून ती पुस्तकरूपाने प्रकाशित करण्याचे मंडळाने योजिले आहे. या चरित्रग्रंथमालेतील " सेनानी साने गुरुजी" हे दुसरे पुस्तक आहे.

या चरित्र ग्रंथाचे लेखक श्री. राजा मंगळवेढेकर यांनी आपल्या या ग्रंथाच्या प्रास्ताविकात म्हटल्यानुसार " गुरुजींच्या व्यक्तिमत्त्वाची एक सर्वस्व समर्पणाची भावना ज्वलंतपणे वास करीत होती आणि म्हणूनच गिरणी कामगारांचा प्रश्न असो, स्त्रीकामगारांचा लढा असो, कॉंग्रेसची निवडणूक असो वा बेचाळीसच्या चळवळीसारखा स्वातंत्र्याचा लढा असो, गुरुजी हे वीर पुरुषांप्रमाणे स्वतः उठले, देशातल्या तरुणांना उठवले, स्वतः पेटले आणि देशातल्या असंख्य तरुणांनाही पेटवले, आयुष्यभर लढले, झुंजले आणि महाराष्ट्रातल्या तरुणांचे सेनानी बनले.

साने गुरुजींच्या या क्रांतिकारी व्यक्तिमत्त्वावर श्री. राजा मंगळवेढेकर यांनी या जीवन कहाणीत विशेष भर दिला आहे.

साने गुरुजींची ही जीवन कहाणी मराठी वाचकांना आवडेल असा आम्हाला विश्वास आहे.

**रा. रं. बोराडे**
अध्यक्ष
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

मुंबई
दिनांक : १९ डिसेंबर २००१

अनुक्रमणिका

# मनोगत

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने 'महाराष्ट्राचे शिल्पकार' या शीर्षकाखाली ग्रंथमालेची एक योजना हाती घेतली आहे.

या योजनेत 'साने गुरुजी' या थोर व्यक्तीच्या जीवनचरित्राचा व कार्याचा परिचय करून देणाऱ्या ग्रंथाचा समावेश करण्यात आला आहे. आणि हा ग्रंथ लिहिण्याची जबाबदारी माझ्यावर सोपवली आहे, हे मी माझे भाग्य समजतो!

साने गुरुजींचे बृहद् चरित्र लिहिण्याची जबाबदारी सुमारे ३० वर्षांपूर्वी साधना ट्रस्टचे अध्यक्ष श्री. एस. एम. जोशी यांनी माझ्यावर सोपवली होती. त्या वेळी मी सुमारे अडीच ते तीन वर्षे सर्व महाराष्ट्रभर हिंडून–फिरून गुरुजींच्या हयात असलेल्या नातेवाईकांशी, त्यांच्या शाळेतील शिक्षकांशी, कारावासातील सत्याग्रहींशी, बेचाळीसच्या लढ्यातील क्रांतिकारक तरुणांशी व गुरुजींच्या अनेक चाहत्यांशी संपर्क व संवाद साधून माहिती काढली. तसेच गुरुजींनी लिहिलेली पत्रे, हस्तलिखिते लेखांची कात्रणे, नियतकालिके इत्यादी चरित्रसाधने बरीच जमा केली होती. त्याशिवाय सर्वश्री यदुनाथ थत्ते, मधू लिमये, ग. प्र. प्रधान, एस. एम. जोशी, ना. ग. गोरे, वसंत बापट या नामनिर्देशाव्यतिरिक्तही गुरुजींच्या परिवारातील अनेकांचे सक्रिय सहकार्य लाभले होते. आणि या सहकार्यामुळे 'साने गुरुजींची जीवनगाथा' हा गुरुजींचा बृहद् चरित्रग्रंथ साकार झाला तो ११ जून १९७५ रोजी. गुरुजींच्या पंचविसाव्या स्मृतिदिनाच्या दिवशी पुण्यात मधू दंडवते यांच्या हस्ते आणि एस. एम. जोशींच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्रात ३०–३५ ठिकाणी प्रकाशित झाला. मराठी साहित्यात एखाद्या ग्रंथाचा प्रकाशन समारंभ एवढ्या उत्स्फूर्त उत्साहाने समारंभपूर्वक प्रकाशित झाला असे अन्य उदाहरण नसेल! अर्थात, ही सारी पुण्याई गुरुजींची आहे याची खोल जाणीव माझ्या मनात आहे!

साने गुरुजींच्या निधनालाही आता ११ जून २००० रोजी ५० वर्षे पूर्ण झाली. त्या निमित्ताने या ग्रंथाची चौथी आवृत्ती साधना प्रकाशनातर्फे प्रकाशित झाली आहे. त्यावरून या ग्रंथाला वाचकप्रियताही लाभली आहे.

या चरित्रकहाणीला मी 'सेनानी साने गुरुजी' असे म्हटले आहे. कारण गुरुजींच्या आंत्यतिक सेवाभावामुळे व अथांग करुणेमुळे त्यांच्या डोळ्यातून येणाऱ्या प्रेमाश्रूंमुळे आणि विशेषतः 'श्यामची आई' या त्यांच्या अमर अशा करुणरम्य पुस्तकामुळे गुरुजींच्या व्यक्तित्वाबद्दल ते हळुवार, मुळूमुळू आहेत अशी कल्पना सर्वत्र दिसते. मराठीतले काही टीकाकार त्यांना 'रडके' म्हणूनच समजत होते. परंतु साने गुरुजींनी तुकारामांप्रमाणेच 'मऊ मेणाहुनी आम्ही विष्णुदास । कठिण वज्रासी भेदु ऐसे' अशा बाण्याने व 'रात्रंदिन आम्हा युद्धाचा प्रसंग' या जागृत जाणिवेने प्रत्येक क्षेत्रात क्रांतिकारकता प्रकट केली आहे. विद्यार्थी, महिला, किसान आणि कामगार यांच्या प्रश्नासाठी वेळोवेळी लढे दिले आहेत. पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरात अस्पृश्य बांधवांना दर्शनासाठी प्रवेश मिळावा म्हणून प्राणांतिक उपोषणाचे दिव्यही आरंभिले होते. त्यांच्या या प्रयत्नाने महाराष्ट्राचा 'बडा बंडवाला' ज्ञानेश्वर यांनी १३व्या शतकात सुरू केलेली सामाजिक क्रांती, परंतु जी पंढरपूरच्या वाळवंटात थबकली होती ती पाउले २०व्या शतकाच्या मध्यास गुरुजींनी प्रत्यक्ष पांडुरंगाच्या चरणापाशी नेऊन पोचवली.

अनुक्रमणिका

त्या काळी देशाच्या स्वातंत्र्याला गांधीजींच्या नेतृत्वाखाली देशात भरास आला होता. साने गुरुजी हे त्या वेळी प्रत्येक लढ्यात मोठ्या हिरिरीने उतरले होते. आणि अनेक वेळा तुरुंगवासही भोगला होता. गुरुजींच्या व्यक्तिमत्त्वातच एक सर्वस्व समर्पणाची भावना ज्वलंतपणाने वास करीत होती आणि म्हणूनच गिरणीकामगाराचा प्रश्न असो, स्त्री-कामगारांचा लढा असो, काँग्रेसची निवडणूक असो वा बेचाळीसच्या चळवळीसारखा स्वातंत्र्याचा अंतिम लढा असो गुरुजी हे वीर पुरुषाप्रमाणे स्वतः उठले, देशातल्या तरुणांना उठवले, स्वतः पेटले आणि देशातल्या असंख्य तरुणांनाही पेटवले. त्यांनीच एके ठिकाणी म्हटले आहे, " एका अमेरिकन कवीच्या काव्यातील काव्यपंक्ती मला फार आवडते. " When I give, I give all." " देताना मी सर्वस्वाने देतो. हात राखून देण्याची प्रवृत्ती मला मानवत नाही." आणि याच भावनेने गुरुजी आयुष्यभर लढले, झुंजले आणि महाराष्ट्रातील तरुणांचे 'सेनानी' बनले. या क्रांतिकारक व्यक्तिमत्त्वावर या जीवनकहाणीमध्ये विशेषतः भर दिलेला आहे.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने महाराष्ट्राच्या या नामवंत शिल्पकाराचे छोटे जीवनचरित्र लिहिण्याची जी संधी दिली आणि त्यामुळे साने गुरुजींच्या स्मृतिसहवासात पुनश्च काही काळ मला राहता आले त्याबद्दल मी मंडळाच्या अध्यक्षांना मनःपूर्वक धन्यवाद देतो.

हे चरित्र लिहिण्याच्या कामी डॉ. सौ. शुभांगी कुलकर्णी यांनी जी बहुमोल मदत केली आहे त्याबद्दल त्यांचे 'आभार' या नुसत्या कोरड्या शब्दाने उपचार म्हणून उल्लेख करणे भागणार नाही, तर त्यांनी जे श्रम घेतले त्याबद्दल मी त्यांच्या ऋणात राहणे पसंत करतो.

- **राजा मंगळवेढेकर**

अनुक्रमणिका

# अनुक्रमणिका


१. मातृधर्मी साने गुरुजी ........................................ १२

२. जडणघडण ........................................ १३

३. शुभ संस्कारांची शिदोरी ........................................ १७

४. शिक्षणाचा ध्यास ........................................ १९

५. मातृवियोग ........................................ २२

६. श्याम पदवीधर झाला! ........................................ २४

७. छात्रानंद गुरुजी ........................................ २६

८. स्व-तंत्र शिक्षक ........................................ ३०

९. स्वातंत्र्यलढ्यात उडी ........................................ ३३

१०. सक्रिय राजनीती ........................................ ३६

११. स्वदेशीचे व्रत ........................................ ३९

१२. धुळ्याच्या तुरुंगात ........................................ ४३

१३. नाशिकच्या कारावासात ........................................ ४६

१४. भावनाशील छायाप्रकाश ........................................ ५०

१५. भारतीय संस्कृती : अंतरंग दर्शन ........................................ ५३

१६. किसान-कामगारांचे कैवारी ........................................ ५७

१७. कर्मयज्ञ ........................................ ६३

१८. वैयक्तिक सत्याग्रह ........................................ ६६

१९. बेचाळीसचा लढा ........................................ ६८

२०. कुमारांशी हितगूज ........................................ ७१

२१. मंदिर प्रवेश ........................................ ७३

२२. 'कर्तव्य' आणि 'साधना' ........................................ ७८

२३. आंतरभारतीचा ध्यास ........................................ ८१

२४. महाप्रस्थान ........................................ ८४

२५. अशी नेऊया पुढेच दिंडी! ........................................ ८७

**अनुक्रमणिका**

# १. मातृधर्मी साने गुरुजी

मराठी मुलखात मातृधर्माचे शिवार प्राचीन काळापासून बहरलेले आहे. खरं तर भारतीय संस्कृतीनेदेखील 'मातृदेवो भव' अशी प्रथम वंदना मातेलाच दिलेली आहे. 'न मातुः परदैवत' अशी संस्कृत सुभाषितकारांची वाणी इथे सतत निनादत आलेली आहे. इतकेच नव्हे तर मराठी माणसाने पुरुषाच्या ठिकाणीसुद्धा मातृत्व पाहण्याची आगळीवेगळी दृष्टी इथे अनुभवलेली आहे, फुलवलेली आहे. पंढरीचा पांडुरंग हे तर महाराष्ट्राचे आराध्य दैवत! अठ्ठावीस युगे कटिवरी हात ठेवून भक्ताला पालवीत विटेवर उभा असलेला श्रीविठ्ठल हा आमचा खरं तर पिता-बाप. परंतु आमच्या सर्व संतांना या पिताश्रीपासून जो प्रीतपान्हा लाभला आणि जे प्रेमवात्सल्य मिळाले त्यामुळे सुखावून विठोबाची 'विठाई' केली. आणि हे आगळेवेगळेपण इथल्या संतांनाही लाभले. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर हा त्याच चालीने 'ज्ञानेश्वर माउली' झाला. आणि याच परंपरेत आधुनिक महाराष्ट्रात बाळगोपाळांना गोष्टी सांगून आपल्या आईच्या कथाकहाण्यांनी डोळे पाणावून सोडणाऱ्या आईची महती 'श्यामची आई' या आपल्या अक्षरवाङ्मयात श्रेष्ठ असणाऱ्या पुस्तकाने गायली. हा 'श्याम' म्हणजेच साने गुरुजी!

साने गुरुजींच्या बाबतीत निसर्गाने एक चमत्कारच केलेला दिसतो. गुरुजी प्रकृतीने पुरुष पण कृतीने मातेचे हृदय त्यांना लाभलेले दिसते. म्हणूनच त्यांना मातृधर्मी साने गुरुजी असे म्हटले जाते. महाराष्ट्रातील सानथोर मंडळींची माउली म्हणजेच साने गुरुजी! मातृधर्मी साने गुरुजींनी मराठी मुलखात सर्वांना आईचे प्रेम भरभरून दिले. आचार्य अत्रे यांनी तर " साने गुरुजींची 'श्यामची आई' म्हणजे मातेचे महन्मंगल स्तोत्रच होय" असे म्हटले आहे. " गुरुजी मातृहृदयाचे कवी होते. प्रौढांच्या सान्निध्यात लाजाळूप्रमाणे संकोच पावणारे गुरुजी मुलांच्या सहवासात सुर्यविकासी कमळाप्रमाणे आपोआप हसू लागत आणि कारंज्याच्या धारांप्रमाणे उचंबळू लागत. त्यांना पाहून मुलांना आपली आई भेटल्याचा आनंद होई आणि हृदयाची कपाटे उघडून ती आपल्या सुखदुःखाच्या गोष्टी त्यांच्याशी करू लागत. महाराष्ट्रातील हजारो मुलांशी त्यांची मैत्री होती. मुलांना स्वयंपाक करून जेवू घालावे, दुखण्याबहाण्यात त्यांची शुश्रूषा करावी, थोरांच्या आणि शूरांच्या गोष्टी सांगून त्यांना पराक्रमी करावे, याचा गुरुजींना निदिध्यास लागून राहिला होता. मातृत्वाने गुरुजींचे हृदय एकसारखे ओसंडत होते, म्हणूनच त्यांच्या वाणीतून आणि लेखणीतून बाहेर पडणारे प्रत्येक अक्षर न् अक्षर पावित्र्याने आणि मांगल्याने ओथंबून निघाले."

मातृहृदयी साने गुरुजींनी आपल्या उण्यापुऱ्या एकावन्न वर्षांच्या आयुष्यात मराठी मुलखात बरीच मोठी कामे केली. एका साने गुरुजींमध्ये विविध स्वरूपातील साने गुरुजी होते. मातृप्रेमी व मातृधर्मी साने गुरुजी, आदर्श शिक्षक साने गुरुजी, स्वातंत्र्यलढ्यातील व समाजसेवेतील क्रांतिकारक साने गुरुजी, किसान-कामगारांचे व गोरगरीब दलितांचे आणि शोषित महिलांचे कैवारी साने गुरुजी, साहित्यिक साने गुरुजी, कवी साने गुरुजी, भारतीय संस्कृतीचे भाष्यकार साने गुरुजी, लोकसाहित्याचे संग्राहक व परभाषेतील उत्तमोत्तम ग्रंथांचे अनुवादक आणि रूपांतरकार साने गुरुजी, संपादक-पत्रकार साने गुरुजी, मुलांचे मनोरंजन करता करता त्यातूनच प्रभूशी नाते जोडणारे साने गुरुजी, आंतरभारतीचे प्रवक्ते साने गुरुजी या रूपातील साने गुरुजींचे व्यक्तिमत्व बहुरंगी, बहुआयामी-'मल्टिडायमेन्शनल' होते!

अशा या सेनानी साने गुरुजींची ही कहाणी!

❑

अनुक्रमणिका

## २. जडणघडण

साने यांचे घराणे मूळचे देवरूखचे. पण पुढे कालांतराने त्यातील काही शाखा रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली तालुक्यातील पालगड या गावी स्थायिक झाल्या. या पालगड गावीच श्री. सदाशिवराव उर्फ भाऊराव आणि सौ. यशोदाबाई ऊर्फ बयो या दांपत्याच्या पोटी २४ डिसेंबर १८९९ रोजी साने गुरुजींचा जन्म झाला. बारश्याच्या दिवशी नाव ठेवले होते पंढरीनाथ. पुढे शाळेत नाव घालण्याच्या वेळी तो झाला पांडुरंग. पांडुरंग सदाशिव साने व नंतर पुढे महाराष्ट्राचे साने गुरुजी म्हणूनच तो प्रसिद्ध झाला!

परंतु घरात आणि गावात मात्र त्याला 'पंढरी' म्हणूनच हाक मारीत असत. पंरतु पंढरीला मात्र 'राम' हे नाव फार प्रिय होते. थोडा मोठा झाल्यावर त्याने एकदा आपल्या आईला विचारलेसुद्धा होते की, " आई! माझं नाव राम का ग नाही ठेवलंस?" परंतु पुढे दापोलीच्या शाळेत शिकायला गेल्यानंतर त्याला तिथे राम नावाचा मित्रच मिळाला. या रामची आणि त्याची मैत्री जुळली, ती अखेरपर्यंत कायम होती. दोघांच्या जिवाभावाची मैत्री जुळली आणि पंढरीला राम भेटल्यामुळे तो मग आपल्या वाङ्मयसृष्टीत स्वतः श्याम बनला. पाठीवरची यशवंत, पुरुषोत्तम, सदानंद आणि थोरली आक्का ही भावंडे त्यांना अण्णा म्हणायची. श्यामच्या जीवनाला आकार देण्यात त्याच्या आईचा हातभार मोठा होता. श्याम कसा घडला, कसा वाढला त्याची स्मृती व हकिगत श्यामनेच शब्दबद्ध केली आहे. 'श्यामची आई' पुस्तकाच्या प्रारंभी श्यामने आपल्याला बालपणी आईकडून मिळालेले उदंड प्रेम आणि शुभ संस्कार जीवनभर कसे पुरले; तीच त्याची जीवनसत्वे कशी बनली; रक्षणकर्ती कवचकुंडली कशी ठरली याच्या कथा—गोष्टी आठवणीच्या रूपाने सांगितलेल्या आहेत. श्यामने माणसाच्या मोठेपणाचा ऊहापोह करताना म्हटले आहे, " पुष्कळ वेळा मनुष्याचा मोठेपणा त्याच्या आईबापांवर अवलंबून असतो. त्याच्या बऱ्यावाईटाचा पाया लहानपणीच भरला जात असतो. मायबापच कळत वा नकळत मुलाला लहानाचा मोठा करीत असतात. आई देह देते व मनही देते. जन्माला घालणारी तीच व ज्ञान देणारीही तीच." श्यामला त्याच्या भाग्याने थोर माता मिळाली. " माझ्यात जे काही चांगले आहे ते माझ्या आईचे आहे. आई माझा गुरू, आई कल्पतरू! तिने मला काय दिले! तिने मला काय दिले नाही? सारे काही दिले. प्रेमळपणे बघायला, प्रेमळपणे बोलायला तिने मला शिकवले. मनुष्यावर नव्हे तर गाईगुरांवर, फुलापाखरांवर, झाडामाडांवर प्रेम करायला तिनेच मला शिकवले. अत्यंत कष्ट होत असतानाही तोंडातून ब्र न काढता शक्यतो आपले काम उत्कृष्टपणे करीत राहणे हे मला तिनेच शिकवले. कोंड्यांचा मांडा करून कसा खावा व दारिद्र्यातही सत्त्व व स्वत्व न गमविता कसे रहावे, हे तिनेच मला शिकवले. आईने शिकवले त्याचा परार्धांशही माझ्या जीवनात मला प्रकट करता आला नाही. माझ्या आईनेच माझ्या जीवनात अत्तर ओतले. मी मनात म्हणत असतो,

*मदंतरंगी करून निवास*
*सुवास देई मम जीवनास*

तीच वास देणारी, रंग देणारी. मी खरोखर कोणी नाही. सारे तिचे, त्या थोर माऊलीचे. सारी माझी आई! आई!! आई!!!"

लहान लहान गोष्टींतून आणि छोट्या छोट्या प्रसंगातून याच माऊलीने आपल्या पंढरीला सर्वाभूती देव पाहण्याची, सर्वांवर प्रेम करण्याची मंगल शिकवणूक दिली.

लहानग्या श्यामने एकदा गुलबक्षीच्या कळ्या तोडून आणल्या. आई म्हणाली , “ श्याम, मुक्या कळ्या नको हो तोडू! त्यांना नीट फुलू दे.” कळ्या फुलल्या नाहीत. त्या तशाच सुकून गेल्या. अर्धवट कामे नीट फुलत नाहीत हा बोध श्यामने घेतला.

एकदा श्यामला आईने आंघोळ घातली, अंग पुसले. श्यामने हट्ट धरला, “ तळवे पूस. त्याला माती लागेल.” आईने ओच्याने तळवे पुसले. तिने आपल्या अंगावरचे लुगडे ओले करून घेतले. मुलासाठी आई काय करणार नाही? ती म्हणाली, “ श्याम, पायाला घाण लागू नये म्हणून जपतोस तसे मनाला घाण लागू नये म्हणून जप हो!”

आईने साध्या सरळ गोष्टीतून एक थोर शिकवण दिली होती!

आईने एकदा सावित्रीचे व्रत घेतले होते. वडाला ३ दिवस १०८ प्रदक्षिणा घालायच्या होत्या. पण आई आजारी होती. ताप भरला होता. तिच्याने प्रदक्षिणा होणार नव्हत्या. ती म्हणाली, “ श्याम, उद्या मी वडाची पूजा करीन. तीन प्रदक्षिणा घालीन. बाकीच्या तू पुऱ्या कर हो बाळ.”

“ पण माझ्या प्रदक्षिणा कशा चालतील?”

“ चालतील हो बाळ! देवाला डोळे आहेत. मी आजारी आहे हे त्याला माहीती आहे”.

“ पण बायका मला हसतील. मुलं चिडवतील. मला लाज वाटते.” श्याम कुरकुरत म्हणाला. आई खिन्न झाली. ती म्हणाली, “ आईचे काम करायला कसली रे लाज? हे देवाचे काम आहे. ते करण्यासाठी कुणी हसले तर तेच वेडे ठरतील. देवाचे काम करायला कोणी लाजू नये. पाप करायला माणसाने लाजावे!”

म्हातारी म्हारीण एक दिवस डोक्यावर लाकडाची मोळी घेऊन चालली होती. चालताना मोळी खाली पडली. जड मोळी कुणीतरी हात लावल्याशिवाय डोईवर कशी घेता येणार? पण हात तरी कोण लावणार? म्हातारीला शिवले तर विटाळ नाही का होणार? आईच्या अंतःकरणात म्हातारीविषयी कळवळा दाटून आला. ती श्यामला म्हणाली, “ श्याम त्या म्हातारीच्या डोक्यावर तेवढी मोळी दे!”

श्यामच्या बालमनावर दुःखित–दलितांबद्दल अपार सहानुभूती बाळगावी, अशी थोर शिकवण कोरली गेली. समाजाची कामे करणारी सारी माणसे देवाला प्रिय असतात. कुणी हीनदीन नसतो, कुणी श्रेष्ठ–उच्च नसतो. सगळे सारखेच समान असतात याचे भान श्यामला आले.

श्यामला धीट बनवण्यासाठीही आईने प्रयत्न केले. तो भित्रा राहू नये म्हणून प्रसंगी ती कठोरदेखील बनली.

कोकणमध्ये पावसाळ्यात विहिरी तुडुंब भरलेल्या असतात. अशा वेळी पोहण्याची मौज असते. नवीन मुलांना या वेळेसच पोहायला शिकवतात. नवशिक्याच्या कमरेला सुकड किंवा भोपळा बांधून विहिरीत सोडतात. श्याम ही गंमत काठावरून पहायचा. त्याला पाण्याची भीती वाटायची. आई पुष्कळ वेळा म्हणायची, “ श्याम, अरे पोहायला शीक. लहान लहान मुले पोहतात आणि तुला रे कसली भीती? उद्या रविवार आहे, पोहायला जा.”

अनुक्रमणिका

श्याम काही बोलला नाही. रविवार उजाडला तसा तो माळ्यावर कुठेतरी दडी मारून बसला. मुले बोलवायला आली. त्यांनी त्याला शोधून काढले. पण श्याम हालेचना. आईला राग आला. पाठीवर शिपट्या मारीत तिने त्याला फरफटत नेले. कंबरेला सुकड बांधले. पाण्यात ढकलले. श्याम घाबरला. ओरडू लागला. पण मित्रांनी त्याला धीर दिला. पोहताना हात कसे मारायचे ते सांगितले. हळूहळू श्याम धीट झाला. शेवटी त्याने सुकड न बांधता आपणहून विहिरीत उडी टाकली. श्यामने व त्याच्या मित्रांनी ही गोष्ट त्याच्या आईला सांगितली. आईने दह्याची कोंढी त्याला खायला दिली. श्यामला दही फार आवडे. मग आईने तेलाची वाटी आणली. श्यामच्या पाठीवर मारलेल्या शिपटीचे वळ होतेच. त्यावर तेल लावीत रडवेली होऊन म्हणाली, " श्याम, अरे तू भित्रा आहेस असे का जगाने तुला म्हणावे? तुला कुणी नावे ठेवू नयेत, तू धीट व्हावास म्हणून मी मारले. रागावू नकोस. चांगला धीट हो. निर्भय हो!"

तुळशीच्या अंगणात बेहड्याचे झाड होते. एकदा श्याम तिथेच खेळत होता. तेवढ्यात झाडावरून एक चिमणीचे पिल्लू टपकन खाली पडले. इवलेसे पिल्लू उंचावरून पडले. पार लोळागोळा होऊन गेले. श्यामने पाहिले. पिल्लाचे सारे चिमुकले शरीर थरथरत होते. छाती धडधडत होती. श्यामला वाईट वाटले. त्याने एका फडक्यावर ठेवून त्या पिल्लाला घरात आणले. मऊ कपसावर ठेवले. श्याम आणि त्याचा भाऊ पिल्लाची काळजी घेऊ लागले. पिल्लाच्या चोचीत तांदळाच्या बारीक कण्या भरवू लागले. झारीने पाणी पाजू लागले. पण इवलेसे पिल्लू त्यात ते घायाळ झालेले! ते कसे खाणार–पिणार? त्याने अखेरीस मान टाकली. श्यामला फार फार दुःख झाले.

श्यामने आईच्या जुन्या जरीच्या चोळीच्या रेशमी तुकड्यात त्या पिल्लाचा देह गुंडाळला आणि शेवंतीच्या व मोगऱ्याच्या झाडाच्यामध्ये खड्डा खणून पुरून टाकला.

कितीतरी वेळ श्याम बाजूला रडत बसला. म्हणाला, " आई, मी त्या पाखराचे सुतक पाळणार आहे." आईने समजूत काढली. म्हणाली, " तुम्ही या पाखरावर प्रेम केले तसेच पुढे एकमेकांवर करा. नाहीतर पशुपक्षांवर प्रेम कराल, परंतु आपल्याच भावाला पाण्यात पहाल. तसे नका हो करू! तुम्ही सारे भावंडे एकमेकांना कधी विसरू नका! तुमची एकच बहीण आहे. तिला अंतर देऊ नका. तिला भरपूर प्रेम द्या."

भूतदयेचा, प्रेमाचा पाठ श्याम शिकला.

'पत्रावळी आधी द्रोणा, तो जावई शहाणा', अशी कोकणात म्हणच आहे. तिकडे पूर्वी घरोघरी पत्रावळीवरच जेवत असत. झाडपानांची समृद्धी कोकणात आहेच. त्यामुळे पत्रावळ, द्रोण लावण्याचे काम घरोघरी सर्वजण करत असत. श्यामच्या वडिलांना-भाऊरावांना-पत्रावळीवरच जेवणे फार आवडे. ते पत्रावळ-द्रोणही फार सुरेख लावीत असत. शेतावरून येताना ते रोज देवासाठी फुले आणीत. भाऊरावांना फुलांची फार फार आवड होती. पूजेला मुबलक फुले त्यांना हवी असायची. ते गणपतीचे भक्त होते. दररोज २१ दूर्वांची जुडी ते गणपतीला वहायचे. खुरटलेल्या दूर्वा त्यांना चालायच्या नाहीत. हिरव्यागार हव्यात. त्यासाठी ते लांबवर जायचे. म्हणायचे, " देवाला साधी दूर्वा वहायची ती चांगली नको का?"

फुलांबरोबर ते भाजी आणि पत्रावळीसाठी पाने आणायचे. कधी वडाची, कधी कुडाची, कधी पळसाची, कधी धामणीची. नाना तऱ्हेच्या पानांच्या ते पत्रावळी करायचे. श्यामची आजी प्रत्येकाला पाने वाटून द्यायची. आणि ५-५ पत्रावळी लावायला सांगायची. सगळेजण पत्रावळ लावायचे. श्याम मात्र लावायचा नाही. आई एकदा म्हणाली, " श्याम, तू पत्रावळ लावायला शीक. नाहीतर जेवायला मिळणार नाही."

[अनुक्रमणिका](#)

“ मला नाही येत. मी नाही लावणार!” श्याम रागाने गुरकावला. त्या वेळी श्यामची आक्का माहेरपणाला आली होती. ती म्हणाली, “ ये श्याम, मी तुला पत्रावळ लावायला शिकवते.” पण हट्टी श्यामने तिचेही ऐकले नाही. पत्रावळ लावली नाही. आईने श्यामला धडा शिकवायचे ठरवले होते. ती म्हणाली, “ ज्याने त्याने आपली पत्रावळ घेऊन बसावे.” श्यामने पत्रावळ लावलीच नव्हती तर तो कुठून आणणार? तो फुरगटून ओसरीवर जाऊन बसला. पोटात भूक तर फार लागली होती. पुन्हा श्यामची आक्का त्याच्याजवळ आली. तिने त्याची समजूत काढली. म्हणाली, “ मी उद्या सासरी गेले म्हणजे थोडीच येणार आहे तुला समजवायला? चल उठ, लहानसे ठिकोळ लाव.”

श्याम आक्काच्या प्रेमळ शब्दाने विरघळला. आक्काच्या सांगण्याप्रमाणे त्याने एक ठिकोळ बनवले. हातपाय धुवून आला. आईने त्याला ठिकोळावर जेवायला वाढले. म्हणाली, “ पोटभर जेव. उगीच हट्ट करतोस!”

श्यामचा राग पूर्ण गेला नव्हता. तो भरभर जेवत होता. ठिकोळाचा एक टाका घासाबरोबर घशात अडकला. कसाबसा निघाला. श्याम म्हणाला, “ येत नाही तरी म्हणे तूच लाव. घशात टाका अडकला की!”

“ निष्काळजीपणा केला की असेच व्हायचे. नीट चांगली पत्रावळ लावायला शीक तोवर तुझी पत्रावळ तुला जेवायला दिली जाईल.”

श्याम तेव्हापासून पत्रावळ मन लावून लावू लागला. लवकरच त्याला छान पत्रावळ जमू लागली. एके दिवशी भाऊरावांना त्याने लावलेली पत्रावळ मुद्दामच मांडली. ती सुबक पत्रावळ पाहून त्यांनी विचारले, “ चंद्रे, तू लावलीस का ग ही पत्रावळ?

“ नाही भाऊ, ही श्यामने लावली आहे.”

“ अरे वा! इतकी चांगली यायला लागली का?” भाऊंनी श्यामला शाबासकी दिली. द्रोण कसा लावायचा हेही शिकवले.

श्यामच्या आजीने श्यामच्या हुशारीबद्दल श्यामला एक जर्दाळू खायला दिला. श्यामला तो फारच गोड लागला. तो म्हणाला, “ समुद्रमंथनानंतर देवाला अमृतही तितके गोड लागले नसेल.” गोडी वस्तूत नसून वस्तूसाठी केलेल्या श्रमात आहे. कर्मातच आनंद आहे!

श्याम आई-वडिलांच्या पंखाखाली वाढत होता. त्यांच्या बोलण्यातून, वागण्यातून श्यामला शिकायला मिळत होते. त्यांनी श्यामला जन्म दिला आणि त्यांनीच त्याचे जीवनकमळ फुलवले. त्यात प्रेमाचा रंग भरला. सेवेचा सुगंध दिला.

❑

अनुक्रमणिका

# ३. शुभ संस्कारांची शिदोरी

बाबुराव खोत हे वडवली गावचे खोत होते. गावचा शेतसारा वसूल करणे आणि तो सरकारकडे भरणे हे खोताचे काम असे. कोकणातील खोत हे तसे इतर समाजातील लोकांच्या मानाने श्रीमंत असत. एकेकाळी साने घराणेसुद्धा श्रीमंत म्हणून प्रसिद्ध होते, परंतु दैवगती फिरली आणि श्रीमंती गेली. ते कर्जबाजारी झाले.

बाबुराव हे तसे मोठे मानी गृहस्थ होते. खोताच्या घरीच वाढल्यामुळे ते आपल्या कुळांशी कडकपणाने वागत असत. परंतु मनाने अत्यंत भावनाशील होते. स्वदेशीचे कट्टे अभिमानी व पुरस्कर्ते होते. लोकमान्य टिळकांच्या स्वदेशीच्या चळवळीत त्यांनी भाग घेतला होता. सहा महिन्यांची शिक्षाही भोगली होती. आपल्या मुलांवर त्यांचे फार प्रेम होते. त्यांना शिकवावे, शहाणे करावे म्हणून त्यांची धडपड चालू असे. गरिबीतदेखील त्यांनी पोटाला चिमटा घेऊन आपल्या मुलांना शिक्षण देण्याची खटपट केली. स्वतः भाऊराव भल्या पहाटे उठून मुलांना श्लोक, भूपाळ्या, आरत्या, अभंग आदी शिकवायचे. त्यामुळे श्यामचे कितीतरी श्लोक आणि इतर पाठांतरही झाले होते. जेवणाच्या वेळी प्रत्येकाने श्लोक म्हणायचा अशी घरात पद्धतच होती. वडील श्लोक समजून द्यायचे आणि शिकवीतही असत. मोरोपंत, वामन पंडित वगैरे पंडित कवींचे कितीतरी श्लोक आणि आर्या श्यामच्या पाठ झाल्या होत्या. इतर देवांची स्तोत्रेही पाठ झाली होती. श्याम म्हणतो, “ कानी कुंडलाची प्रभा चंद्रसूर्य जैसे नभा हे चरण आजही मला मधुर वाटतात. ‘वक्रतुंड महाकाय, शांताकारं, वसुदेवसुतं देवं, कृष्णाय वासुदेवाय’ वगैरे संस्कृत श्लोक आम्हाला लहाणपणी पाठ येत. रोज एखादा नवीन श्लोक ते शिकवायचे. वडिलांच्या शिकवण्याच्या पद्धतीमुळे शेकडो संस्कृत शब्दांचा अर्थ समजू लागला.”

वडील पहाटे शिकवीत तर आई सायंकाळी शिकवी. ‘दिव्या दिव्या दीपत्कार। कानी कुंडल मोतीहार। दिवा देखून नमस्कार’ किंवा ‘ तिळाचे तेल कापसाची वात। दिवा तेवे मध्यान्ह रात। दिवा तेवे देवापाशी । माझा नमस्कार सर्व देवांच्या पायापाशी । वगैरे आई शिकवीत असे. त्यामुळे मुलांनाही ते पाठ करण्याचा नाद लागे.

एकदा घरातली गाय व्यायली असतानाची गोष्ट. त्या वेळी श्याम दापोलीला शिकायला होता. त्याला कच्च्या दुधाचा खरवस फार आवडत असे. आईला त्याची सारखी आठवण येऊ लागली. भाऊराव म्हणाले, “ उद्या पहाटे मी घेवून जातो त्याच्यासाठी खरवस.’’ आणि सहा कोस चालत ते खरवस घेऊन गेले. किती प्रेम! मुलासाठी कष्ट उपसण्यात आई-वडिलांच्या मनाला अपार आनंद होत असतो.

जेवणाचेदेखील शास्त्र आहे. भाऊराव सांगायचे, “ आपल्या पानाकडे पाहून जेवावे. पानात वस्तू असता पुन्हा मागू नये. पान कसे लख्ख करावे.” आणि वडील स्वतःही तसेच वागत असत.

एके दिवशी सारे जेवायला बसले होते. आईने रताळ्याच्या पानांची भाजी केली होती. ती भाजीत मीठ घालायला विसरली होती. परंतु वडील बोलले नाहीत म्हणून मुलेही बोलली नाही. जेवणे झाली. पसारा आवरून आई जेवायला बसली. पहिला घास घेतला तो भाजी अळणी! आई म्हणाली, “ अरे अळणी भाजी कशी रे खाल्ली? सांगावे की नाही? “ श्याम म्हणाला, “ भाऊ बोलले नाहीत म्हणून मी बोललो नाही.” सर्वांना अळणी भाजी खावी लागली याची रुखरूख आईला लागून राहिली. इतक्या खटपटीने चुलीजवळ राहून केलेला स्वयंपाक गोड करूनच घ्यावा ही वडिलांची दृष्टी! श्याम म्हणतो, “ मित्रांनो, दुसऱ्याचे मन दुखवू नये म्हणून स्वतःच्या जिभेवर ताबा ठेवणारे माझे वडील श्रेष्ठ की, स्वतःच्या मनाला लावून घेणारी माझी आई श्रेष्ठ? दोघेही श्रेष्ठ! संयम व

समाधानाप्रमाणेच कर्मकुशलतेवरही भारतीय संस्कृती उभारलेली आहे. हे दोन्हीही धडे मला आई-वडिलांनी दिले.”

लहानपणापासूनच श्याम देवभक्त होता. देवादिकांच्या कितीतरी गोष्टी त्याला येत असत. ऐकलेल्या व वाचलेल्या पुष्कळ गोष्टी त्याला ठाऊक होत्या. मुले गोष्टीवेल्हाळ असतातच. त्यामुळे आळीतील तसे शाळेतील मुले श्यामच्या घरी गोष्टी ऐकयला जमायची. श्याम त्याला देवांच्या, साधूसंतांच्या व वीर पुरुषांच्या गोष्टी तन्मय होऊन सांगायचा. श्यामने ‘रामविजय’, ‘हरिविजय’, ‘पांडवप्रताप’, ‘गणेशपुराण’, कथासारामृत’, शिवलीलामृत’ अशी खूप लहानमोठी पुस्तके मिळवून वाचली होती. एकदा पुण्याच्या मामाने श्यामला खाऊसाठी दोन आणे दिले होते. श्यामने त्याचे ‘शनिमहात्म्य’ व रामाचे चित्र विकत घेतले. अशा प्रकारे पालगडला आपल्या घरी आई-वडिलांच्या व निसर्गाच्या सानिध्यात ज्या वेळी श्याम लहानाचा मोठा होत होता, त्याच वेळी ही शुभ संस्काराची शिदोरीही मिळवीत होता.

❑

अनुक्रमणिका

# ४. शिक्षणाचा ध्यास

कोकणातले पालगड गाव तसे लहान खेडेच. त्या काळात तिथे माध्यमिक शिक्षणाची काहीही सोय नव्हती. प्राथमिक शाळेत पाचवीपर्यंतचे वर्ग होते. सहावीचा वर्ग नव्हता. तेव्हा पुढच्या शिक्षणासाठी गावापासून बाहेर जाणे भागच होते.

त्या वेळी श्यामची एक आत्या दापोलीत रहात होती. दापोलीत इंग्रजी शाळा होती. भाऊरावांनी श्यामला आपल्या बहिणीकडे शिक्षणासाठी ठेवण्याचे ठरविले. दापोली-पालगड अंतर सहा कोसांचे होते. श्यामने सर्वांचा निरोप घेतला. आई म्हणाली, " श्याम नीट रहा हो. मन लावून शीक."

श्याम दापोलीत आतेकडे शिकायला आला. १० जून १९१२ रोजी दापोलीच्या मिशन हायस्कूलमध्ये श्यामचे नाव घातले. टेकडीवर बांधलेल्या सुंदर इमारतीमधील ही शाळा श्यामला फार आवडली. श्यामची ही शाळा नामांकित होती. महर्षी कर्वे, रँग्लर परांजपे, म. म. पां. वा. काणे यांच्यासारखे विद्यार्थी या शाळेत शिकले होते आणि भारतामध्ये प्रारंभीच्या काळी ज्यांना भारतरत्न ही सर्वोच्च गौरवउपाधी प्राप्त झाली त्यातील महाराष्ट्रातील दोन्ही भारतरत्ने – महर्षी कर्वे आणि म. म. पां. वा. काणे – त्या हायस्कूलचेच विद्यार्थी. त्याच भाग्यवान भूमीत आणि शाळेत श्यामला चार वर्षे शिकायला मिळाले.

दापोलीत शिक्षणासाठी काढलेल्या या दिवसांविषयी श्याम म्हणतो, " आत्याकडल्या चार वर्षांच्या आयुष्यक्रमात माझा पुष्कळ फायदा झाला. मी कधी आजारी पडलो नाही. वेळ फुकट न दवडण्यास मी शिकलो. लौकर निजणे व लौकर उठणे हा नियम येथे सहज पाळला जाई. व्यवस्थितपणाची सवय लागली. कामाचा कंटाळा गेला. कोणतेही काम करण्याची लाज वाटेनाशी झाली. कितीही कष्ट पडले तरी ते विद्येसाठी केले पाहिजेत, हे शिकलो. माझ्या वर्तनामुळे माझ्या माय-बापांस पुष्कळ समाधान वाटू लागले."

आत्याच्या घरच्या वातावरणाचा जसा अनुकूल प्रभाव श्यामवर पडला तसाच शाळेतील वातावरणाचाही पडला. त्याच्या मनाचा आणि बुद्धीचाही विकास या काळात चांगल्या प्रकारे झाला. या शाळेत श्यामला राम भेटल्याचा उल्लेख मागे केलाच आहे. श्याम मन लावून शिकू लागला. " मी मोठा होईन. शिकेन, आईला सुखात ठेवीन." अशी महत्त्वाकांक्षा त्याच्या ठायी उत्पन्न झाली. तो मन लावून शिकू लागला. शाळेतल्या अभ्यासाबरोबरच त्याने शाकुंतलाची प्रस्तावना, काव्यदोहन, नवनीत, वृत्तदर्पण ही पुस्तके वाचून काढली. घरी आजोबांकडून वेदविद्या शिकत होताच. लोकमान्यांचा केसरी तो अधाशासारखा वाचून काढी. त्याचे मन फुलू लागले. बुद्धीला तेज चढू लागले. तो शाळेतल्या वक्तृत्व सभेत भाषणे करू लागला. कविताही लिहू लागला. भेंड्यांच्या खेळात तर तो आपल्या पाठांतराने, स्मरणशक्तीने साऱ्यांना हरवून टाकत असे. अभ्यासाबरोबरच खोड्याही चालू होत्या. एकदा वर्गात दोन मुलांच्या पिशव्यांना श्यामने गाठी मारून ठेवल्या. शिक्षक रागवले. " हे कृत्य कोणी केले?" त्यांनी दरडावून विचारले. पण वर्गात कोणीच कोणाचे नाव सांगेना. शेजारच्या वर्गातल्या मुलाने श्यामचे नाव सांगितले. शिक्षकांनी श्यामला उभे केले. निगडीच्या फोकाच्या छडीने उजवा-डावा हात फोडून काढला. छडी मोडली पण श्यामचा हात खालीसुद्धा झुकला नाही, की डोळ्यांतून पाण्याचा थेंबही ओघळला नाही. 'मोडेन पण वाकणार नाही' ही कणखर वृत्ती श्यामने प्रकट केली. शिक्षक अधिकच संतापले. त्यांनी वर्गाला विचारले, " आता याला कोणती शिक्षा करू"?

मुले म्हणाली, " श्यामला क्षमा करा !"

अनुक्रमणिका

वर्गबंधूंचे ते प्रेम पाहून मात्र श्याम विरघळला. त्याच्या डोळ्यांतून कृतज्ञतेचे अश्रू पाझरू लागले.

अभ्यास, खोड्या, खेळ आणि वाचन यांत श्यामचा वेळ जाई खरा, पण आईची आठवण मनात हुरहूर निर्माण करीत असे. ओढ लावीत असे. तो व्याकूळ होत असे. मग शनिवारची वाट पहात बसे. शनिवारी सहा कोस चालून श्याम पालगडला जात असे. रविवारचा दिवस आईजवळ राहून तो परत दापोलीला येत असे.

एकदा दिवाळीची सुटी सुरू झाली होती . श्यामला व धाकट्या भावाला भाऊरांवानी नवीन सदरे शिवले होते. पण भाऊरावांच्या नेसण्याच्या धोतरांच्या मात्र चिंध्या झालेल्या होत्या. आईची लुगडीही ती शिवून नेशीत होती. पण पतीला धोतरे नाहीत याचे तिला फार वाईट वाटे. तिच्याजवळ प्रपंचात काटकसर करून शिल्लक टाकलेले थोडेसे पैसे होते. पण तेवढ्यात कशी येणार धोतरे? तेवढ्यात पुण्याहून कोणीतरी गावी आले. पुण्याच्या भावाकडून बहीणीला तीन रुपये ओवाळणी झाली. त्या पैशातून श्यामच्या आईने व मुलांनी भाऊरावांसाठी धोतरजोडी आणली.

दिवाळीची आंघोळ झाल्यावर श्यामच्या आईने भाऊरावांच्या हातात नवीन धोतर दिले. ते चकीत झाले! त्यांनी नवीन धोतर पाहून चौकशी केली. श्यामच्या आईने सारे सांगितले. भाऊरावांना आनंद झाला आणि आपल्या गरीबीचे वाईटही वाटले. ते श्यामच्या आईला म्हणाले, “ तुझ्यासारखी जन्माची सोबतीण आणि अशी गोड व गुणी मुले असल्यावर मी का आनंदी होणार नाही?”

दुसऱ्यासाठी स्वतःच्या सुखाचा त्याग करण्याचे आईचे थोर उदाहरण श्यामपुढे होतेच. त्यानेही एकदा दापोलीहून येताना धाकट्या भावासाठी कोट आणला.

“ पैसे रे कोठले? कोणाचे कर्ज काढलेस की फीचे दडवलेस?” भाऊरावांनी विचारले.

“ कोणाच्या पैशांना हात तर नाही ना लावलास?” आईने कातर स्वरात विचारले.

श्यामने सांगितले, “ भाऊ, तुम्ही मला खाऊला आणा-दोन आणे देत असा, ते मी जमवले. त्यातून हा कोट शिवून आणला मी पुरूषोत्तमासाठी.”

हे ऐकून आईला गहिवरून आले. वडिलांनी त्याच्या पाठीवरून मायेचा हात फिरवला.

श्याम एकदा आईबरोबर लाडघरला चालला होता. लाडघर दापोलीपासून सहा मैलांवर आहे. दापोलीहून पहाटे बैलगाडीतून दोघे निघाली. निसर्गलावण्याने नटलेल्या त्या हिरव्याकंच झाडीतल्या लालचुटूक रस्त्यातून बैलगाडी चालली होती. श्याम आईच्या मांडीवर डोके टेकून पडला होता. आज तो आणि त्याची आई असे दोघेच होते. श्याम अपार मातृसुख अनुभवीत होता. खूप सुखावला होता. आई त्याच्या केसांतून बोटे फिरवीत ओवी म्हणत होती-

*घनदाट या रानात । धो धो स्वच्छ वाहे पाणी ।*
*माझ्या श्यामच्या जीवनी । देव राहो ॥*

ही ओवी ऐकताच श्याम ताडकन उठून बसला.

अनुक्रमणिका

“ का रे उठलास असा?”

श्याम म्हणाला, “ आई, श्यामच्या जीवनात तू देवाला बोलावीत आहेस, मी कसा निजू? देव येणे म्हणजे जागृती येणे.”

‘मी मोठा होईन, शिकेन आणि आईला सुख देईन’ असा ध्यासच श्यामला लागला होता. आई आणि वडील दोघेही पालगडला अत्यंत गरिबीत, हालात दिवस काढत होते. घरात भाऊराव आणि त्यांचे बंधू यांचे बिनसल्याने भाऊरावांना घर सोडून झोपडीत रहावे लागत होते. घरच्या वाटणीतले कर्जच फक्त भाऊरावांच्या डोक्यावर आले होते. मानी भाऊराव अपमानित जीवन जगत होते. श्यामची आई तर या भाऊबंधाच्या जाचाने काळवंडून गेली होती. घरप्रपंचाला थोडेफार ठिगळ लावण्यासाठी ती लोकांच्या घरचे दळणकांडण करू लागली होती. एकेकाळी वैभवात दिवस काढलेल्या आईला हे दुःख विलक्षण जाळीत होते. तिची प्रकृती दिवसेंदिवस खालावत चालली होती. श्याम घरी आला म्हणजे आईला दळू लागे. धुणे धुवायला, भांडी घासायला, केरवारे करायला, सारवायला तो आईला मदत करीत असे.

दापोलीला श्याम इंग्रजी पाचवी पास झाला. त्याचा मित्र राम आधीच पुण्याला आई व भावंडांबरोबर शिकायला गेला होता.

भाऊरावांची स्थिती दिवसेंदिवस बिकट होत चालली होती. त्यांना धनहीन स्थितीत प्रपंचाचा गाडा ओढणे फार जड जात होते. अशा परिस्थितीत श्यामला पुढे शिकवणे त्यांना जमलेसे दिसत नव्हते. म्हणून त्यांनी नाइलाजाने श्यामला ओळखीने रेल्वेत नोकरीला लावण्याचा विचार केला होता.

श्यामच्या मनोरथांचा चुराडा होत होता. त्याने शिकून मोठा होण्याची, कवी-ग्रंथकार होण्याची उमेद बाळगलेली होती. पण परिस्थितीने वाट अडविली होती.

श्यामला खूप शिकण्याची इच्छा होती. त्याने वडिलांवर भार न टाकता शिकावे, असा विचार केला. एवढ्या लहान वयात नोकरीची कल्पनाही त्याला रुचली नाही.

श्यामने दोन-तीन ठिकाणी चौकशी केली, तेव्हा कळले की औंध संस्थानात शिक्षणाची सोय आहे. गरीब विद्यार्थ्यांना अन्नछत्रातून मोफत जेवण मिळते. श्यामने औंधला शिकायला जायचे ठरविले.

देवासाठी रानावनात जाणारा बाळ ध्रुव हा त्याचा आदर्श होता. विद्येसाठी पडतील ते कष्ट सोसण्याचे, प्रसंगी माधुकरी मागून शिकण्याचे त्याने पक्के केले. श्यामच्या या शुभ विचाराला त्याच्या आईने व वडिलांनीही पुष्टी दिली. श्यामने वळकटी बांधली. ट्रंकेत चार कपडे, पुस्तके घेतली. भाऊरावांनी चांगला दिवस पाहिला आणि श्यामने त्या दिवशी औंधचा रस्ता धरला.

❑

अनुक्रमणिका

# ५. मातृवियोग

आजच्यासारखी प्रवासाची वाहने त्या काळी उपलब्ध नव्हती. रस्ते नव्हते. प्रवासही खडतर असायचा. श्याम पालगडहून निघाला, तो हर्णे बंदरापर्यंत बैलगाडीने आला. तिथून बोटीने मुंबई. मुंबईहून पुढे पुणे. पुण्याहून रहिमतपूर. औंध हे संस्थान रहिमतपूरपासून चौदा मैलांवर आहे. तिथे रेल्वेस्टेशन नाही. त्यामुळे श्यामला बैलगाडीने रहिमतपूरपासून औंधला यावे लागले. असा हा खडतर प्रवास श्यामने विद्येसाठी केला.

औंधला सखाराम दाते नावाचा पालगडचाच विद्यार्थी होता. श्याम सखारामकडेच उतरला. श्याम मोठ्या आशेने औंधला आला खरा पण आल्याबरोबर त्याच्या पदरी निराशा पडली. श्याम येण्याच्या काही दिवस आधीच तिथल्या बोर्डिंगमध्ये एक नवीन नियम जारी करण्यात आला होता. संस्थानाबाहेरच्या मुलांना अतःपर बोर्डिंग बंद करण्यात आले होते. श्याम कोकणातला. संस्थानच्या बाहेरचा. त्यामुळे त्याला बोर्डिंगचा फायदा मिळणार नव्हता. पोटाचा भीषण प्रश्न श्यामपुढे उभा राहिला. पण सखारामने धीर दिला. म्हणाला, " मला मिळणारी शिदोरी आपण दोघे खाऊ." दोन भाकऱ्या आणि दोन मुठी भात एवढे अन्न बोर्डिंगमधून सगळ्यांना मिळत होते. सखारामने मनाचा मोठेपणा दाखवला पण पोट भरणार कसे? परंतु श्यामचा निर्धार कायम होता. घरी परत जाण्याचा विचार त्याच्या मनाला शिवला नाही. 'उपाशी मरेन पण घरी परतणार नाही' असा निर्धार त्याने मनाशी केला. पण करायचे काय? माधुकरी मागावी? वार लावावेत? पण येथे ना कोणी ओळखीचे ना मायेचे! कोणापुढे तोंड उघडायचे? श्याम विचारात बुडून गेला.

औंधच्या श्रीयमाई श्रीनिवास विद्यालयात श्यामने नाव घातले. महिना आठ आण्याप्रमाणे भाड्याची एक लहानशी अंधेरी खोलीही ठरवली.

शाळेचा अभ्यास सुरू झाला. पोटासाठी माधुकरी मागण्याचे ठरवले. " ॐ भवति भिक्षां देही" म्हणत श्याम घरोघरी जाऊ लागला. पण दारोदारी होणारी हेटाळणी त्याच्या हळुवार मनाला मानवेना. मग त्याने हाताने स्वयंपाक सुरू केला. भाकऱ्या करता येईनात. एका वृद्ध माऊलीने भाकऱ्या करून दिल्या. तुकाराम नावाचा एक मित्र गिरणीत सांडलेले पीठ देऊ लागला. कधी कोरडी भाकरीच तर कधी नुसती भाजीच, कधी मक्याचे दाणे असे खाऊन श्याम शिक्षणासाठी खडतर तप आचरित होता. पण त्यातही विघ्न आले. औंधला प्लेग सुरू झाला. शाळा बंद पडली. जवळची घोंगडी व पुस्तके विकून श्याम पालगडला परत आला. भाऊरावांना वाटले तो शिक्षण सोडून आला, म्हणून ते रागाने बोलले. श्यामला याचे फार दुःख झाले. त्याने पुण्याला रामला पत्र लिहून मी तिकडे येऊ का म्हणून विचारले. रामने कळवले, 'निःशंकपणे निघून ये.' श्यामचा पुढचा प्रश्न तूर्त तरी सुटला होता. वळकटी-ट्रंक घेऊन तो पुण्याला दाखल झाला.

पुण्यात आल्यावर श्यामने नुतन मराठी विद्यालयात ६वीच्या वर्गात नाव घातले. तो रामकडे राहू लागला. अभ्यास सुरू झाला. पण पोटोबाचे काय? श्याम कधी डाळचुरमुरे खाऊन रहायचा, कधी रामच्या आईने दिलेले खाऊन रहायचा. त्याने खानावळीत जेवतो असे रामच्या आईला सांगितले होते. काही पुस्तके विकून त्याने खानावळीचे पैसे भरले होते. संध्याकाळी कुठेतरी चक्कर मारून येई आणि जेवण झाले म्हणून सांगे.

वार्षिक परीक्षा झाली. तेवढ्या अवधीतही श्यामने चांगला अभ्यास केला. तो पास झाला. मॅट्रिकच्या वर्गात गेला. पण जेवणाचा प्रश्न होताच. रामच्या आईने धरीच जेवायला सांगितले. श्यामला संकोच वाटे. त्याने काही वार मिळवले. तो वारावर जेवू लागला. रामच्या धरातली सर्व कामे करू लागला. रामची बहीण आजारी पडली तर

तिची सेवासुश्रूषा श्यामने केली. श्याम सेवाप्रिय होता. त्याने एकदा एका गरिबाला पायातली वहाण काढून दिली. अंगातला कोटही दिला.

*मुखास माझ्या न शिवो नकार।*
*निघो मुखातून सदा सकार।*

अशी श्यामची त्या वेळेही वृत्ती होती. आपल्याजवळचे आपल्याहून जो गरजू आहे त्याला देण्याचा व त्यागाचा अभ्यासही श्याम करू लागला होता. देहाला उपवास पडले तरी मनाला उपवास पडू नयेत म्हणून तो दक्ष असे. जुन्या बाजारात जाऊन चांगली पुस्तके पहात असे. विकतही घेत असे. त्यासाठी उपाशी रहात असे.

श्यामचे पुण्याला शिक्षण चालले होते त्याचवेळी पालगडला त्याची आई आजारी पडली. तिच्या सेवेसाठी श्यामची सखू मावशी तिकडे गेली. पण श्यामचा अभ्यास, शाळा बुडेल म्हणून त्याला कळवले नव्हते. तेवढ्यात दिवाळीची सुटी सुरू झाली म्हणून श्याम मुंबईला आला. तिथून बोटीने हर्णे बंदरावर उतरला. त्याला आईच्या निधनाची बातमी कळली. श्यामवर वज्राघातच झाला. दुःखाने तो विव्हळ झाला. श्याम म्हणतो, “ माझ्या जीवनातील आशा गेली, प्रकाश गेला. माझ्या जीवनाचे सूत्र तुटले.” श्यामने आईच्या आठवणींचे “ श्यामची आई” नावाचे अत्यंत सुंदर पुस्तक पुढे लिहिले. मराठी भाषेचे ते भूषणच आहे. पुस्तकाच्या अखेरीस श्यामने म्हटले आहे, “ मित्रांनो, अशी आई मोठ्या भाग्याने मिळते. माझी आई गेली परंतु भारतमातेच्या सेवेसाठी मला तयार करून गेली. श्याम माझ्या मोहात गुरफटेल, फक्त माझीच सेवा करेल, इतरांच्या सेवेसाठी तो धावणार नाही, म्हणून तर तिने स्वतःला दूर केले नसेल? दूर केले असेल! सर्व भारतातील माता माझ्या श्यामच्या हाऊ देत. एकच नव्हे तर अनेक आया श्यामला मिळू देत. या अनंत आया पाहण्याची दिव्य दृष्टी देऊन आई गेली. जिकडे तिकडे आता माझ्याच आया!”

याच थोर व पवित्र भावनेने श्यामने पुढल्या आयुष्यात देशसेवेचे व समाजसेवेचे कार्य केले.

जड व दुःखी अंतःकरणाने श्याम परत पुण्याला आला. अभ्यासाला लागला. मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाला. ते १९१८ साल होते. मॅट्रिकच्या प्रमाणपत्रावर श्यामला एखादी नोकरी त्या काळी मिळालीही असती; पण श्यामला उच्च महाविद्यालयीन शिक्षणाची तहान लागली होती. अनेक अडचणी पुढे होत्या, पण त्या सहन करायच्या, त्यांच्याशी दोन हात करायचे, झगडायचे पण शिकायचे असा निर्धार त्याने केला. ‘न्यू पूना कॉलेज’मध्ये तो दाखल झाला. आजचे सर परशुरामभाऊ कॉलेज म्हणजे त्या काळचे न्यू पूना कॉलेज होय.

१९१८ ते १९२२ अशी चार वर्षे त्या महाविद्यालयात श्यामने शिक्षण घेतले. श्याम रामकडेच रहात होता. वार लावून जेवत होता. प्रो. घारपुरे, प्रो. द. वा. पोतदार, प्रो. द. के. केळकर, प्रो. ना. सी. फडके, श्री. रा. कृ. लागू आदी प्रसिद्ध लेखक, वक्ते, संशोधक आदी विद्वानांच्या सहवासाचा व त्यांच्या शिकवण्याचा लाभ श्यामला त्या काळात लाभला.

❏

अनुक्रमणिका

## ६. श्याम पदवीधर झाला!

चार वर्षांच्या कॉलेजमधील शिक्षणाबरोबरच श्यामला अन्य सामाजिक कार्यातही भाग घेण्याची संधी लाभली. त्या वेळच्या म्युनिसिपालिटीच्या वतीने होणाऱ्या खानेसुमारीच्या कार्यात एक स्वयंसेवक म्हणून श्यामने भाग घेतला. घरोघर जाऊन ही नोंदणी करताना त्याला अनेक तऱ्हेचे भलेबुरे अनुभव आले. अज्ञान, दारिद्र्य, जीर्ण रूढी, विविध तऱ्हेचे मानवी स्वभाव ह्यांचे एक सामाजिक दर्शनच घडले. समाजस्थितीची थोडीशी कल्पनाही त्याला आली.

याच काळात पुण्यातील किर्लोस्कर नाटकगृहात व गायकवाड वाड्यात सभा होत असत. डॉ. ॲनी बेझंट, सरोजिनी नायडू, हॉर्निमन, चित्तरंजन दास, मोतीलाल घोष, बिपिनचंद्र पाल, कस्तुरीरंग अय्यंगार इत्यादी त्या काळातल्या प्रख्यात देशभक्तांची तेजस्वी भाषणे ऐकायची संधीही श्यामला लाभली. अशी व्याख्याने तो सहसा कधी चुकवत नसे.

श्यामचा मित्र राम एका मित्रमंडळात जात असे. या मंडळातील मुलांना श्याम संस्कृत शिकवायला जात असे. शिकवण्यासाठी नवीन, चांगले, काव्यमय, पण साधे असे श्लोक श्याम प्रयत्न करून शोधून ठेवीत असे. या मित्रमंडळात दर रविवारी व्याख्यानेही होत असत. श्यामने रामच्या आग्रहावरून रामतीर्थाच्या जीवनावर दीड तास अस्खलितपणे व्याख्यान दिले. अध्यक्षस्थानी असलेले प्रोफेसर म्हणाले, “ रामतीर्थांचे सारे वाङ्मय जणू आजच्या व्याख्याताच्या ओठांवर आहे. असेच वाचन, मनन, चिंतन त्यांनी चालू ठेवावे.”

राम आजारी पडला तेव्हा श्याम त्याच्याजवळ बसून त्याला वाचून दाखवीत असे. रात्रीच्या वेळी रस्त्यांवरच्या दिव्यांचा प्रकाश खिडकीतून खोलीत येत असे. त्याच प्रकाशात श्याम नेहमी अभ्यास करीत असे.

त्याच सुमाराची घटना. श्याम मुंबईला उन्हाळ्याच्या सुट्टीत आला होता. एके संध्याकाळी चौपाटीवर गेला. तेथे प्रचंड जनसमुदाय त्याला दिसला. स्वामी श्रद्धानंदांचा खून झाला होता आणि त्या निमित्ताने तेथे दुखवट्याची सभा होती. गांधीही त्या सभेत बोलले. श्याम म्हणतो, “ त्या वेळेस मी महात्माजींना प्रथमच पाहिले. भारताचा आत्मा पाहिला. भारताची पुण्याई पाहिली. भारताचे तप पाहिले. वैराग्य पाहिले. चालतीबोलती गीता पाहिली. सत्यप्रेमाचा नवा अवतार पाहिला. माझे डोळे भरून आले होते. मी सद्गदित झालो होतो. हृदय उचंबळून आले होते.”

गांधीजींचा श्यामच्या जीवनावर झालेला हा प्रथम संस्कार! पुढे तो अधिकाधिक दृढ होत गेला.

कॉलेजचा अभ्यास चालू असतानाच श्यामचे इतरही वाचन सुरू असे. त्या वेळी त्याला इंग्रजी वाङ्मयाचे जणू वेडच लागले होते. वाचनालयात बसून त्याने कितीतरी उत्तमोत्तम इंग्रजी ग्रंथ वाचले. श्री. अरविंदाचे ‘आर्य’ मासिक त्याला खूप आवडायचे. त्यात गीतेवर निबंध येत असत. तसेच योग, भारतीय संस्कृती, पाश्चिमात्य तत्त्वज्ञान यांवरही लेख असत.

कार्लाईल हा तर श्यामचा आवडता लेखक होता. कार्लाईलचे निबंध त्याने पाठ केले होते. तो नुकताच वाचीत नसे तर महत्वाचे टिपून घेत असे. श्याम म्हणतो, “ इंग्रजीतील सारे उत्तमोत्तम साहित्य मराठीत आणावे असे माझ्या मनात येई.” माय मराठी मातृभाषा सुंदर व समृद्ध करावी, अशी तळमळ तेव्हापासूनच श्यामला लागून राहिली होती.

अनुक्रमणिका

त्याच वेळी पुण्यात बालवीर चळवळ सुरू झाली होती. श्यामने शिवाजी पथकात प्रवेश मिळवला. दररोज संध्याकाळी खेळ-कवायत असे. तसेच प्रथमोपचार, आकाशदर्शन, संदेशवहन, वनसंचार इत्यादी विविध प्रकारचे शिक्षणही असे. श्याम बालवीर चळवळीत चांगलाच रमला होता.

बालवीरांना रोज दैनंदिनी लिहावी लागे. तिच्यात रोज एक तरी सत्कृत्य लिहावे अशी अपेक्षा असे. श्याम भल्या पहाटे उठून लकडी पुलाजवळ थांबत असे. सकाळच्या वेळी खेड्यांतून गाणी गात येणाऱ्या ओझेवाल्या बायका तिथे विसाव्याला थांबत असत. श्याम त्यांच्या डोक्यावर त्यांची ओझी पुन्हा उचलून देत असे. दैनंदिनीत हे सत्कृत्य नोंदवून ठेवत असे.

१९२०-२१ हा गांधीजींनी ब्रिटिशांविरुद्ध पुकारलेल्या असहकार चळवळीचा तेजस्वी काळ! गांधीजींच्या हाकेला स्मरून अनेक डॉक्टर्स, वकील, शिक्षक, विद्यार्थी इत्यादींनी आपापले व्यवसाय सोडून चळवळीत उडी घेतली होती. श्यामलाही राहवले नाही. त्यानेही कॉलेजला रामराम ठोकला. घरी वडिलांना पत्र लिहून कळवले, " तुमचा एक मुलगा देशासाठी फकीर झाला असे समजा!"

पत्र मिळताच भाऊराव पुण्याला धावत आले. त्यांनी श्यामला शिक्षण पूर्ण करण्याविषयी पुष्कळ समजावले. प्रो. द. वा. पोतदार यांनीही तसाच उपदेश केला. श्यामने पुनश्च शिक्षणास सुरुवात केली. प्रो. द. वा. पोतदार यांचे श्यामवर विशेष प्रेम होते. त्यांच्यासाठी त्यांनी एम. ए. ला मराठीत उपयोगी पडावे म्हणून 'मराठी गद्याचा इंग्रजी अवतार' नावाचे पुस्तक लिहिले. श्यामची एम. ए. ची मराठीची उत्तरपत्रिका वाचून ते इतके खूष झाले होते की, त्यांनी उत्तरपत्रिकेवर लिहून ठेवले की, 'हा मुलगा पुढे मोठा लेखक होईल!' त्यांचे हे निरीक्षण पुढे एखाद्या भविष्यासारखे तंतोतंत खरे ठरले.

अनेक तऱ्हेच्या अडचणी, संकटे यांच्याशी झुंजून श्यामने आपले शिक्षण पूर्ण केले. १९२२ साली तो संस्कृत ऑनर्स व मराठी हे विषय घेऊन बी. ए. झाला.

बी. ए. झाल्यानंतर श्यामने अंमळनेर येथील तत्त्वज्ञान मंदिरात तत्त्वज्ञानाच्या अभ्यासास जायचे ठरवले. तत्त्वज्ञानाच्या अभ्यासाकडे त्याचा ओढा होताच.

❑

# ७. छात्रानंद गुरुजी

१९२३ सालच्या जुलै महिन्यात तत्त्वज्ञानाचा एक विद्यार्थी म्हणून पी. एस. साने हे अंमळनेर येथील तत्त्वज्ञान मंदिरात दाखल झाले. आपण त्यांना आता साने गुरुजी म्हणूया. या संस्थेची कीर्ती दूरवर पसरलेली होती. तत्त्वज्ञान मंदिरात येण्यापूर्वी गुरुजींच्या मनीमानसी एक सुंदर स्वप्न होते. ज्या अद्वैताची शिकवण भारतीय संस्कृतीने, तत्त्वज्ञानाने दिली त्या अद्वैताची साधना त्या ठिकाणी चाललेली असणार. अद्वैत अभ्यासणारेच नव्हे तर, दैनंदिन जीवनात ते आचरणारे साधकही या मंदिरात असणार अशी गुरुजींची कल्पना होती. द्वैताने भरलेल्या या जगात अल्प प्रमाणात का होईना, अद्वैत स्वीकारलेले साधक पहायला मिळणार, त्यांच्या सोबत रहायला मिळणार, अशा आशेने ते आले होते. पण जेव्हा ते तत्त्वज्ञान मंदिरात प्रत्यक्ष राहिले आणि तिथली सगळी तऱ्हा पाहिली तेव्हा त्यांचा फारच भ्रमनिरास झाला. साबणाच्या वडीसाठी भांडणारे दोन प्रोफेसर पाहून त्यांना धक्काच बसला. परंतु निरनिराळ्या प्रांतातले लोक तिथे होते आणि त्यांच्याशी थोडाफार संबंध आल्याने आधीच प्रांतनिरपेक्ष असलेली गुरुजींची दृष्टी अधिक विशाल, भारतीय बनली. त्या त्या प्रांताची ओळख त्या त्या प्रांतातील माणसाकडून करून घेण्याची संधी लाभली. पुढे प्रतिपादलेल्या अंतरभारतीचे बीज मनोभूमीत रुजण्यास मदत झाली, हा एक आणि विविध तत्त्वज्ञानांचा अभ्यास करावयास मिळाला हा दुसरा असे लाभ पदरात पडले. बाकी बराचसा मनस्तापच झाला.

तत्त्वज्ञान मंदिरात असतानाच त्यांचे वडील भाऊराव वारले. गुरुजींचे पितृछत्र हरवले. ते पालगडला जाऊन आले. तत्त्वज्ञान मंदिरात गुरुजींचे मन रमले नाही, म्हणून १९२४ साली एम. ए. झाल्यानंतर अंमळनेर येथील खानदेश एज्युकेशन सोसायटीमधे ते पी. एस. साने सर म्हणून दाखल झाले. तेच हायस्कूल आता प्रताप हायस्कूल म्हणून ओळखले जाते.

काळी टोपी, ओठावर ठसठशीत मिशा, गळ्याभोवती उपरणे गुंडाळलेले, काळा गळाबंद कोट, पायघोळ धोतर, पायात पुणेरी जोडा आणि हातात एखादे पुस्तक. अशी त्या वेळी साने सरांची मूर्ती होती. शाळेत गुरुजी त्या वेळच्या पाचवीला इंग्रजी व संस्कृत, सहावीला मराठी आणि मॅट्रिकला इतिहास व मराठी हे विषय शिकवीत असत. जो विषय विद्यार्थ्यांना शिकवायचा, त्या विषयाची मिळतील तेवढी पुस्तके मिळवून वाचीत असत आणि मग शिकवायला विद्यार्थ्यांपुढे उभे राहत असत. म्हणजे अध्यापनापूर्वी अध्ययन करणारे हे खरेखुरे निष्ठावंत गुरुजी होते. अशा निष्ठेमुळेच त्यांनी ‘गुरुजी’ हे पद सार्थ केले.

‘साने सर उत्तम शिकवतात’ एवढी लोकप्रियता त्यांनी थोड्या दिवसात मिळवली. हायस्कूल मुख्याध्यापक श्री. गोखले यांनी गुरुजींच्या ठायीची विद्यार्थांविषयीची कळकळ व वात्सल्य ही श्रेष्ठ गुणसंपदा पाहिली आणि त्यांच्यावर तेथील वसतिगृहाची जबाबदारी सोपवली. शाळेच्या अभ्यासक्रमात व शिक्षणात ज्या गोष्टी अनेक अडचणीमुळे अपुऱ्या राहतात, त्या छात्रालयात बऱ्याचशा पूर्ण करता येतात. मुलांना शिक्षकांच्या सान्निध्याचा पुरेपूर फायदा मिळावा व मुलांच्या शीलसंवर्धनाकडे अधिक लक्ष देणे शक्य व्हावे; त्यांच्यात सहजीवन, सहकरिता, स्वावलंबन, सचोटी, स्वाभिमान, देशभक्ती व बंधुभाव या गुणाचे बीजारोपण व्हावे असाच उद्देश छात्रालय काढण्यामध्ये संस्थाचालकांचा होता. या उद्देशांची पूर्ती करायला गोखले यांना साने गुरुजीच सर्वथैव युक्त वाटले हे एका अर्थी सहज स्वाभाविक होते.

छात्रालयाचे काम अंगावर घेतल्यानंतर गुरुजींचा विद्यार्थ्यांशी अधिक जवळून संबंध येऊ लागला. गुरुजींची तेथील खोलीदेखील छात्रालय-विद्यार्थ्यांचीच बनली. सगळे तिथे यायचे, बसायचे. गुरुजींच्या भोवती

अनुक्रमणिका

मुलांचा गरडा सारखा असेच. बालमनात कसा प्रवेश करावा, बालकांच्या भावविश्वाशी कसे समरस व्हावे, याचे उपजत असे ज्ञान जणू गुरुजींना होते. एरवी थोरामोठ्यांत संकोचून जाणारे, कमी बोलणारे गुरुजी लहान मुलांत मात्र मूल होऊन जात.

छात्रालयात भल्या सकाळी लवकर उठावे लागे. मुलांची ती तर साखरझोपेची वेळ. मुले उठायला कुरकुरत. गुरुजी मातेच्या मायेने जवळ जाऊन अंगावरून हात फिरवून उठवत असत. कधी हलक्या प्रेमळ हाकेने तर कधी 'घनःश्याम सुंदरा श्रीधरा' अशा भूपाळीच्या स्वरांनी मुलांच्या अंगावरील पांघरूण दूर करीत असत.

मग प्रार्थना मंदिरात प्रार्थना व्हायची. गुरुजी तिथे सुंदर सुंगधी फुले आणून ठेवीत असत. सुरेल आवाजात प्रार्थना होई. भजने म्हटली जात. दिवसाची सुरुवात अशी प्रसन्न, सुंदर व्हायची.

खेड्यापाड्यांतून, ठिकठिकाणाहून आलेले विद्यार्थी छात्रालयात असत. त्या काळी आजच्यासारखी ठिकठिकाणी विद्यालये नव्हती. त्या विद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये कुणी श्रीमंतीत कुणी लाडात वाढलेले असत, नको त्या सवयी त्यांना असत. गुरुजींना त्यांना चांगल्या सवयी लावायच्या होत्या. त्यासाठी गुरुजींनी त्यांना उठता बसता रूक्ष कोरड्या उपदेशाचे घुटके पाजण्याएवजी वात्सल्यपूर्ण कृती करायला सुरुवात केली. मुले शाळेत किंवा क्रीडांगणावर गेली म्हणजे गुरुजी त्यांच्या खोल्यांतून जात असत आणि तशीच पडलेली अंथरुणे पांघरुणे नीट घड्या घालून ठेवीत असत. इकडे तिकडे पडलेले कपडे, पुस्तके, वह्या सर्व व्यवस्थित लावीत असत. काजळीने काळ्या पडलेल्या कंदिलाच्या काचा स्वच्छ पुसून ठेवीत असत. डबे, कपबशा, भांडी असतील तर ती घासून ठेवीत असत. गादीवरच्या मळक्या चादरी, दोरीवरचे कळकट कपडे धुवून वाळवीत असत. खोल्या स्वच्छ झाडून ठेवीत असत.

मुले बाहेरून आली म्हणजे आपल्या लखलखीत झाडलेल्या खोल्या आणि व्यवस्थित ठेवलेले सामान पाहून नवल करीत! कुणी केले हे सारे? कुणाचा येथे प्रेमळ हात फिरला? साने सरांचा! हे कळल्यावर त्यांना आपलीच लाज वाटे. दुसऱ्या दिवसापासून ते स्वच्छ, व्यवस्थित राहण्याचा प्रयत्न करू लागायचे. हळूहळू त्यांच्या वागणुकीत इष्ट तो बदल घडून येई.

कुणी आजारी पडला, कुणाला काही लागले-खूपले तर गुरुजी त्याची रात्र रात्र जागून सेवा करायचे. अडीअडचणीला धावायचे. गरीब विद्यार्थ्यांची फी थकायची. गुरुजी आपल्या पगारातून ती भरून टाकायचे.

छात्रालयाची इमारत शाळेच्या इमारतीपासून थोडी दूर होती. तो परीसरही रूक्ष, ओसाड होता. साप-विंचवांची वस्ती तिथे असायची म्हणून त्या भागाला 'अंदमान' म्हणत असत. गुरुजींनी या अंदमानचे 'आनंदभवन' करायचे ठरविले त्या ओसाडीत बगिचा फुलवायची योजना आखली. एका सुट्टीत छात्रालयातील तरुणांबरोबर खपून त्यांनी ती जमीन खणून साफ केली. वाफे तयार केले. फुलझाडे लावली. विहिरीचे पाणी उपसून बाग शिंपली.

मुलांना फुलांचा सहवास मिळाला पाहिजे, त्यांच्या दृष्टीसमोर सदैव फुलांची पवित्र, निर्मळ सृष्टी असली पाहिजे. फुले जशी सुंगधी, स्वच्छ व रसमय असतात. तशी आपली जीवने व्हावीत, ही भावना फुलांच्या दर्शनाने मुलांच्या मनात सहज निर्माण व्हावी अशी गुरुजींची इच्छा होती. हळूहळू बाग आकाराला आली. काही दिवसातच त्या ओसडीत हिरवळ दिसू लागली. गुलाब, निशिगंध, शेवंती, मोगरा नाना तऱ्हेची फुलझाडे तरारली. गुलबक्षी,

अनुक्रमणिका

कर्दळी, तुळशी डोलू लागल्या आणि काही दिवसांतच एका गुलाबाच्या रोपट्यावर एक कळी दिसू लागली. गुरुजींना केवढा आनंद झाला! फुलांच्या, झाडांच्या हिरव्या सृष्टीतच त्यांचे बालपण गेले होते. थोड्या दिवसातच कळीचे फूल झाले. त्या रात्री छात्रालयातील मुलांना घेऊन, बगिच्यात बसून गुरुजींनी त्या गुलाबाच्या फुलाचा जन्मोत्सव साजरा केला. त्या रोपट्याला त्यांनी रंगबेरंगी कापडाच्या तुकड्यांनी सजविले. मग मुलांनी गाणी म्हटली, बासरी वाजवली. गुरुजींची थोर निखळ सौंदर्यदृष्टी नि रसिकता यातून जशी प्रकट होते, तसेच फुलांवर, वृक्षवेलींवर, अवघ्या सृष्टीवरच प्रेम करावे, सृष्टीशी तद्रूप होऊन जावे, हा पाठ किती वेगळ्या तऱ्हेने त्यांनी मुलांना दिला होता, याचाही बोध होतो.

असाच एक प्रसंग गुरुजी वर्गात शिकवत होते. बाहेर पाऊस पडू लागला. गुरुजीनी हातातले पुस्तक बंद केले नि म्हणाले, " चला, पावसात भिजायला." इतर शिक्षक म्हणाले, " अहो साने, पावसात मुले भिजतील तर आजारी पडतील." गुरुजी म्हणाले, " प्रभूचे लक्षावधी हात आपल्याला कुरवाळायला येत आहेत, मग का बंद वर्गात शिकवत बसायचे?" पावसाच्या धारा म्हणजे प्रभूचे लक्षावधी हात! केवढी काव्यमय कल्पना! केवढी रसिकता!! गुरुजी असे जीवनस्पर्शी शिक्षक होते. जो पावसात मुलांना भिजायला, उन्हात तापायला, थंडीत कुडकुडायला, मातीशी मस्ती करायला नि आभाळाशी दोस्ती करायला शिकवतो, तोच खरा शिक्षक नि तेच खरे शिक्षण.

अडलेल्या-नडलेल्यांना मदत करण्यासाठी ते सदैव पुढे येत असत. जवळचे देण्याचा अभ्यास त्यांनी लहानपणापासूनच केला होता. शाळेत काही विद्यार्थी अत्यंत गरीब असत. घरच्या दारिद्र्यामुळे शिक्षण अर्ध्यावरच सोडण्याची पाळी काही जणांवर येई. वैद्य नावाचा असाच एक विद्यार्थी होता. गरीब पण हुशार त्याच्यावर अशी वेळ आली. बिचारा दुःखीकष्टी झाला. गुरुजींच्या कानावर हे गेले. त्यांना आपली विद्यार्थिदशा आठवली. विद्येसाठी सोसलेला वनवास आठवला. ते उपासतापास, ती मानहानी, सारे चटकन डोळ्यांपुढून गेले. गुरुजी उठले आणि वैद्यकडे गेले. म्हणाले, " तुला वर्षभर मी फी देईन, पण शाळा सोडू नकोस."

छात्रालयातील गोपाळ नावाचा गडी एकदा विषमज्वराने आजारी पडला. शाळेच्या गड्यांनाही तुच्छ न मानता आपल्या बरोबरीचे मानायला शिकविणारे गुरुजी! त्यांना गोपाळच्या आजारपणाची वार्ता कळताच ते जेवण कसेबसे संपवून उठले आणि गोपाळच्या खोपटात गेले. गोपाळला त्यांनी आपल्या खोलीत आणले. कॉटवर मऊ बिछाना अंथरून झोपवले. डॉ. म्हसकरांना बोलावून घेतले. डॉ. म्हसकर राष्ट्रीय वृत्तीचे सहृदय गृहस्थ होते. गुरुजींचा आणि त्यांचा ऋणानुबंध पुढे पुष्कळच वाढला.

डॉ. म्हसकरांनी सांगितल्याप्रमाणे औषधोपचार, पथ्यपाणी वगैरे गुरुजींनी चटकन सुरू केले. त्यांच्या मदतीला छात्रालयातील मुलेही असायची. गोपाळची सेवा-शुश्रूषा गुरुजींच्या सांगण्यानुसार करायची. कुणी गोपाळसाठी फळे आणून द्यायचा, कुणी औषधे आणायचा. गुरुजी गोपाळचे मलमूत्र साफ करायचे, पाय चेपून द्यायचे. रात्र रात्र त्याच्याजवळ जागत बसायचे. श्री. टी. के. जोशी हे श्यामच्या रामचे बंधू. ते व श्री. दत्तोपंत केसरी हे शिक्षकही मदत करायचे. गोपाळला २१ दिवसांचा ताप भरला. सर्वांनी सर्व प्रकारची काळजी घेतली. पण यश आले नाही. एकविसाव्या दिवशी गोपाळ हे जग सोडून गेला! गुरुजींना, मुलांना अंत्यत वाईट वाटले.

शाळेतल्या उच्च पदवीधर शिक्षकांनी गोपाळला खांदा दिला. गुरुजींनी मडके धरले. गुरुजींनीच अग्नी दिला. म्हणाले, " गोपाळ माझा धाकटा भाऊच होता."

अनुक्रमणिका

स्वतःच्या अशा आचरणातून गुरुजी विद्यार्थ्यांना समतेची शिकवण देत होते. श्रेष्ठ—कनिष्ठत्वाची भावना मनामधून पुसून टाकण्याचे प्रयत्न करीत होते. छात्रालयात जेवणखाण एका पंक्तीत होत असे. जातिधर्माचा भेदाभद मुळीच पाळला जात नसे.

याच काळात गुरुजींनी काही अभिनव असे उपक्रमही सुरू केले. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास कसा साधता येईल, याचा त्यांना ध्यासच लागलेला होता. या ध्यासातूनच त्यांनी 'छात्रालय दैनिक' सुरू केले. वहीच्या आकाराची पाच ते सहा पाने पाठपोट एवढा मजकूर गुरुजी पहाटे उठून लिहीत असत. त्या दैनिकात कितीतरी विविध विषयांवरचे लेख ते देत असत. धर्म, शिक्षण, इतिहास, संस्कृती, थोरांची चरित्रे, काव्य, कथा, असे अनेक प्रकारचे साहित्य असे. ते दैनिक मुलांना जणू विश्वदर्शन घडवीत असे. 'खरा शिक्षक मुलांना भूतकाळाची कल्पना देऊन भविष्याच्या दरवाज्यापर्यंत आणून ठेवतो.' गुरुजी आपल्या लेखणीने हेच कार्य करीत होते.

यानंतर थोड्याच काळात गुरुजींनी 'विद्यार्थी' नावाचे छापील मासिकही काढले होते. त्याला विद्यार्थ्यांनी चांगला प्रतिसाद दिला. खाऊचे पैसे साठवून काहींनी मासिकाची वर्गणी भरली. 'विद्यार्थ्यांची ज्ञानलालसा वाढवून तिची विविध प्रकारे तृप्ती करणे हाच 'विद्यार्थी' मासिकाचा उद्देश होता. गुरुजींनी आपल्या बहुप्रसव आणि बहुव्यासंगी लेखणीने विद्यार्थ्यांना या मासिकाद्वारे भरभरून दिले.

आशुतोष मुखर्जी, ईश्वरचंद्र विद्यासागर, इतिहासाचार्य राजवाडे, शिशिरकुमार घोष, रविंद्रनाथ टागोर, बेंजमीन फ्रँकलीन अशी काही चरित्रेही गुरुजींनी या काळात लिहून प्रसिद्ध केली. या थोरांच्या चरित्रकार्यापासून प्रेरणा व स्फूर्ती घेऊन तरुणांनी कार्यशील बनावे असा त्यांचा या लेखनामागचा हेतू होता. एक राष्ट्रकार्य म्हणूनच त्यांनी हे सर्व लेखन केले होते. ते म्हणत असत, " I am not a teacher, I am a preacher." शिक्षकाच्या पेशाकडे पाहण्याची त्यांची अशी उदात्त, पवित्र दृष्टी होती.

शिक्षक आणि छात्रालयप्रमुख म्हणून गुरुजी विद्यार्थ्यांत रमून गेले होते. या कामाचा त्यांचा हर्ष, आनंद, सुख, समाधान सर्व काही होते. छात्रालयातील त्यांच्या समरसतेमुळे त्यांना त्यांचे सहकारी 'छात्रानंद गुरुजी' असेच म्हणत असत.

❑

अनुक्रमणिका

# ८. स्व-तंत्र शिक्षक

साने गुरुजींची शिक्षणदृष्टी निसर्गप्रधानच होती. साने गुरुजी हे निसर्गशिक्षकच होते. शाळेच्या चार भिंतीत मावणाऱ्या ७-८ विषयांच्या शिक्षणालाच केवळ ते शिक्षण मानत नसत, तर मनुष्यमात्राचं शिक्षण जन्मापूर्वीपासूनच सुरू झालेलं असतं आणि ते अखंड अखेरपर्यंत चालू असतं असंच त्यांचं म्हणणं होतं.

गुरुजी स्वतः विद्यासंपन्न, बुध्दिमान होतेच; पण त्याशिवाय त्यांना आईचं मन, मातृहृदय लाभलं होतं. ते मातृधर्मी शिक्षक होते, त्यामुळं शिक्षणावर त्यांचं जसं प्रेम होतं, तसंच मुलांवरदेखील उदंड प्रेम होतं.

तसं पाहिल तर साने गुरुजींनी तथाकथित शिक्षणशास्त्र अभ्यासलं नव्हतं. शिक्षणशास्त्राची तथाकथित परीक्षाही त्यांनी कधी दिलेली नव्हती. म्हणून शिक्षणशास्त्राची तथाकथित पदवीही त्यांना चिकटलेली नव्हती. परंतु तरीही तथाकथित शिक्षण पंडितापेक्षा ते सरस आणि सुरस शिकवीत असत. अंमळनेरच्या शाळेत ते जेव्हा 'सर' होते, तेव्हा त्यांचा तास कसा रंगून जात असे त्याच्या अनेक आठवणी त्या काळातील त्यांचे विद्यार्थी आणि सहाध्यायी सांगत असतात.

साने गुरुजी हे तसे शिक्षणशास्त्रात शिकलेले पढिक, परतंत्र शिक्षक नव्हते. ते 'स्व-तंत्र' शिक्षक होते. त्यांनी आपल स्वतःचंच असं शिक्षणतंत्र शोधलं होतं, निर्माण केलेलं होतं. त्यांचं प्रत्येक कर्म हा त्यांच्या आत्म्याचा उद्‌गार असे! म्हणून त्यांना कर्मकांडी तंत्र कधीच मानवलं नाही. या स्वतंत्र, व्यापक वृत्तीमधूनच ते शिक्षणाकडे बघत असत. त्यांची शिक्षणदृष्टी आणि शिक्षणविचार सांकेतिक, पोथीबंद, परंपरागत जड स्वरूपाचे नव्हते आणि आपले विद्यार्थी हे चैतन्याचे पुंज होत आणि विविध प्रकारच्या जीवनदर्शनातून त्यांचे मनःपुंज फुलवायचे आहेत असा त्यांना ध्यास होता. त्यासाठीच त्यांचा श्वास होता.

पालगडला लहानपणी मराठी दुसरी—तिसरीत शिकत असताना त्यांना धोंडोपंत कुलकर्णी नावाचे एक शिक्षक होते. सकाळी शाळेत गेले की ते साऱ्या मुलांना ओळीत उभे करायचे. हातात छडी घ्यायचे आणि एकेकाला विचारायचे, 'दात घासले का? शौचास जाऊन आलास का? आंघोळ केलीस का? सूर्यनमस्कार घातलेस का?"

साने गुरुजींनी पुढे त्यांचा उल्लेख 'छडीनं आरोग्य शिकवणारे शिक्षक' असा केला आहे. शिक्षणात छडीचा, धाकाचा, रागाचा, संतापाचा, आदळआपटीचा प्रकार गुरुजींना मान्य नव्हता. इतकंच नव्हे, तर शिक्षक वर्गात मुलांना हेटाळणीनं बोलतात, हेटाळणीनं वागतात याचंही त्यांना दुःख होत असे.

दापोलीच्या शाळेत असताना त्यांचे एक वर्गशिक्षक त्यांना बावळ्या साने म्हणूनच हाक मारायचे. याविषयी गुरुजींनी पुढे लिहिले आहे, " हे शिक्षक मला नेहमी बावळ्या म्हणून संबोधित असत. हे शब्द ऐकून माझ्या हृदयाचं पाणी पाणी होई. खरोखरच का आपण बावळट आहोत? असं मनात येई. माझा बावळटपण दूर करणं हे त्या शिक्षकाच काम होतं. परंतु तो मार्ग मला न दाखवता नेहमी त्याच त्या विशेषणानं मला हाक मारीत गेल्यानं माझा बावळेपणा वाढला मात्र असेल! अशा रीतीनं आपण मुलांची मनं किती दुखवितो, याची शाळेतील शिक्षकांना खरोखर कल्पना नसते. त्यांचा खेळ होतो, परंतु मुलांचा जीव जातो!"

वर्गातील माझ्यासमोरची मुलं ही प्रभूच्या मूर्ती आहेत, अशी भावना शिक्षकांची हवी.

अनुक्रमणिका

शिक्षणाकडे पाहण्याचा गुरुजींचा दृष्टीकोण परमपवित्र, उदात्त, मंगल होता. यालाच वेगळं शब्दरूप देताना त्यांनी म्हटले :

*करी मनोरंजन जो मुलांचे।*
*जडेल नाते प्रभूशी तयाचे।*

या पद्यपंक्तीत गुरुजींचा शैक्षणिक दृष्टिकोण आणि मुलांविषयीची श्रद्धामय थोर भावना दोन्ही व्यक्त झालेली आहेत!

त्या प्रभूंना क्षुद्र मानू नका. उद्याच्या जगाचे नियंते तेच आहेत, असं भगवान येशूप्रमाणे त्यांनाही मनोमन वाटत होतं. गुरुजी एके ठिकाणी म्हणतात, " मला महत्त्व आहे, मला क्षुद्र लेखू नका, असं बालब्रह्म बाहू उभारून, पुकारून सदैव सांगत असतं. परंतु त्या बालब्रह्माला घरी-दारी सर्वत्र धिक्कारण्यात येतं, पायाखाली तुडवण्यात येतं आणि अशा या कृतीला शिक्षण हे पवित्र नाम देण्यात येतं.

" खरा शिक्षक होता होईतो मुलांना शारीरिक शिक्षा करणार नाही. त्यांना दमदाटी करणार नाही. त्यांच्यावर दात-ओठ खाणार नाही. पुस्तक फेकून मारणार नाही. खरा शिक्षक मुलांना भ्याड बनवणार नाही. मलीन होऊ देणार नाही. खरा शिक्षक हसत—खेळत शिकवील. तो मुलांच्या आत्म्याचं वैभव ओळखील व त्यावर दृष्टी ठेवून सदैव वागेल, बोलेल, चालेल. मुलं म्हणजे राष्ट्राचं खरंखुरं भांडवल! मुलं म्हणजे उद्याचं भव्य भविष्य! मुलं म्हणजे देवाघरचा संदेश आणणारा प्रेषित! मुलं म्हणजे मोदमूर्ती! आनंदाचे माहेरघर! मुलं म्हणजे चैतन्याचे कोंभ! स्फूर्तीच्या कळ्या! देवाला सर्वात जास्त प्रिय कोणी असेल, तर ती मुलं होत. मुलांजवळ राहण्याची, हसण्या-खेळण्याची, बोलण्या-चालण्याची संधी मिळणं. जो मुलांशी असहकार्य करतो, रडवितो तो प्रभूला मारतो, रडवितो.

" परंतु अशा पवित्र भावनेनं रंगलेले, या थोर दृष्टीनं बघणारे कितीसे शिक्षक आपणास आढळून येतील? ए गद्ध्या, ए बैला, ए शुंभा, ए मुर्खा, ए टोणग्या अशा शेलक्या संबोधनांनीच मुलांची पावलोपावली संभावना घरी-दारी, शाळेत सगळीकडे होत असते. वर्षानुवर्षे ज्या मुलांच्या कानावर या शिव्याशापांचा वर्षाव होत असेल ती मुलं गद्धे व बैल, मूर्ख व टोणगी न झाली तरच आश्चर्य!"

गुरुजींची शैक्षणिक दृष्टी शाळेच्या भिंतीपुरतीच मर्यादित नव्हती. ती फार व्यापक होती .

गुरुजींचे शिक्षणविचार असे मूलभूत स्वरूपाचे मौलिक आहेत. लिहिणे, वाचणे, घोकणे आणि परीक्षा देणे एवढ्या संकुचित अर्थाचे शिक्षण गुरुजींना कधीच अभिप्रत नव्हते. जीवन फुलविणाऱ्या, खुलविणाऱ्या व आनंदमय करणाऱ्या साऱ्या प्रवृत्ती आणि कला यांचाही त्यांच्या शिक्षणविचारात समावेश होता. उघड्या सृष्टीत मुलांनी फुलपाखरासारखे स्वच्छंदपणे बागडावे, विहरावे, लहरावे आणि झाडेझुडे, लताफुले, पशुपक्षी, नदीनाले, डोंगरदरी, शेतमळे, समुद्रआकाश या सर्व सृष्टीशी त्यांचा परिचय व्हावा आणि मैत्र जुळावे, निसर्गाशी मुलांना हृदयसंवाद साधता यावा, गुजगोष्टी करता याव्यात, अशी त्यांची शिक्षणदृष्टी होती!

गुरुजी म्हणत असत, 'मुले ज्याच्याभोवती पिंगा घालतात तो शिक्षक चांगला!' अंमळनेरच्या शाळेत काय किंवा पुढे महाराष्ट्रात काय, गुरुजींच्या भोवती शेकडो मुलं गुळाच्या ढेपीभोवती मुंगळे जमावेत तशी जमत असत आणि मग प्रभूशी नातं जोडण्याच्या भक्तीनं गुरुजी त्या मुलांना गोष्टी सांगत असत. त्यांना रिझवीत असत. हसवीत असत. त्यांच्या हृदयातील करुणा जागवीत असत. त्यांना आनंदविभोर करून टाकत असत! गोष्ट लहान, पण

अनुक्रमणिका

तिची शक्ती महान! हे गोष्टीतलं मर्म गुरुजींनी पूर्णपणानं जाणलेलं होतं. शिक्षण, संस्कार, शुभदृष्टी, भलं वळण, एकूण व्यक्तिमत्त्व विकासातील गोष्टींचं साधन किंवा माध्यम केवढ प्रभावी आहे, हे त्यांनी चांगल ओळखलं होतं. हसत-खेळत सांगितलेल्या गोष्टीतून मुल जेवढं शिकतं, तेवढं उपदेशाचे घुटके देणाऱ्या उपदेशपर व्याख्यानातून आणि तात्पर्य सांगणाऱ्या धड्यांतून शिकत नाही. बालांची ही आनंद-प्रवृत्ती त्यांनी हेरलेली होती. गोष्टीप्रमाणेच गाणी, खेळ, संगीत, नृत्य, नाट्य, चित्र इत्यादी बालांना प्रिय असणाऱ्या आनंद-प्रवृत्तींवरही शिक्षणात भर आसायला हवा, असं त्यांच मत होतं. त्यांनी लिहिलेल्या एका सुंदर पत्रात एके ठिकाणी ते म्हणतात, " शाळांतून असे नाट्यप्रवेश वरचेवर व्हावेत. त्यामुळे भावना वाढतात. कलासंवर्धन होते. शिक्षकांनीदेखील त्यात सामील व्हावे. महान शिक्षणशास्त्रज्ञ गिजुभाई बधेका मुलांबरोबर नाटकात काम करायचे. रवींद्रनाथही करीत. मुलांमध्ये मिळून-मिसळून पुन्हा एक प्रकारे अलिप्त राहण्याची कला खऱ्या शिक्षकाजवळ असायला हवी."

निसर्गाचा आणि मुलांचा सतत संबंध, सतत सानिध्य, याला साने गुरुजी फार महत्व देत असत. निसर्गप्रेम, मानवेतर सृष्टीशी मैत्री व मानवतेच्या प्रेमधर्माची शिकवण या गोष्टींचा त्यांनी रवींद्रनाथांप्रमाणेच सतत उद्घोष केलेला आहे. सदैव पुरस्कार केलेला आहे. रवींद्रनाथांनी आपल्या 'शांतिनिकेतन'मध्ये निसर्गाच्या उघड्या शाळेत मुलांना सर्व विषयांबरोबरच कला साधनेचेदेखील पाठ स्वच्छंदपणे घेण्याची उपलब्धता निर्माण केली होती. गुरूजींचीसुद्धा शैक्षणिक दृष्टी अशीच होती. शिक्षण, शिक्षक व शाळा या विषयी त्यांची कल्पनाही अशीच होती.

*Tounges in Trees*
*Books in Brooks*
*Sermons in Stones...*

वाहत्या झऱ्यातील पुस्तकं, पाषाणातील प्रवचनं, झाडांमधील संगीतसुद्धा मुलांना कळलं पाहिजे. असं शेक्सपियरनं म्हटल्याप्रमाणेच गुरुजींनाही वाटत होतं. तसंच व्हिक्टर ह्यूगोनं म्हटल्याप्रमाणे त्यांनाही वाटत असे,

*To grow flowers by day,*
*to see stars by night*

दिवसा आपण फुलं फुलवावीत आणि रात्री आकाशाच्या बागेतील देवाची फुलबाग बघावी!

गुरुजींचं निसर्गशिक्षण असं होतं. त्यांच्या दृष्टीने सृष्टीतील महाकाव्य म्हणजे समुद्र! ह्या सृष्टिवैभवानं वैभवी बनविणारं शिक्षण त्यांना प्रिय होतं.

पण या सौंदर्यसक्त मनाला श्रमाची श्रेष्ठता, महत्ता कळली पाहिजे व श्रमशिक्षणाचीही जोड शिक्षणात असली पाहिजे, असं गुरुजींना वाटे. ते म्हणत असत, " शिक्षण विशाल हवं, जीवनाशी संबद्ध हवं, डेन्मार्क वगैरे देशातील प्राथमिक शाळा शेतीशी जोडल्या आहेत. आपल्या देशातही शेती, विणकाम वगैरे खेड्यातील प्रमुख धंद्यांशी शाळा जोडलेल्या असल्या पाहिजेत. गांधीजींची शिक्षणदृष्टीदेखील अशीच होती आणि तिच्या आधारावरच नई-तालीम-नवीन शिक्षणाचा विचार उभारलेला होता."

❏

अनुक्रमणिका

# ९. स्वातंत्र्यलढ्यात उडी

साने गुरुजी छात्रालयाच्या कामात खूप रंगून गेले होते, त्यामुळे त्यांना सर्वजण 'छात्रानंद' असेच म्हणत असत. गुरुजी आपल्या विद्यार्थिविश्वाशी एवढे एकरूप झाले होते! जे हाती घेतले त्यात प्राण ओतायचा व ते तडीस न्यायचे हा त्यांचा स्वभावच होता. गुरुजी खरं तर सेवामूर्तीच होते! पण आपल्या हातून काहीच घडत नाही याची खंत मात्र त्यांना सदैव वाटत असे. त्यांच्या अंतःकरणात अशी एक रुखरूख होती, 'आपल्या हातून काही घडत नाही. देशासाठी आपला देह कारणी लागत नाही, देशसेवा करण्याची संधी मिळत नाही.' याची त्यांना तळमळ लागून राहिली होती. त्यांना वाटायचे, आपण इथे या शाळेच्या कामातच बुडून जाणार का? बाहेर स्वातंत्र्याचा लढा चाललेला आहे, त्यात आपण नाही का उडी घेणार? आणि अशा अस्वस्थ मनःस्थितीत असतानाच १९३० साल उजाडले. ३१ डिसेंबर १९२९ च्या मध्यरात्री लाहोर येथे काँग्रेसच्या अध्यक्षपदावरून भाषण करताना पंडित जवाहरलाल नेहरू यांनी 'संपूर्ण स्वातंत्र्य मिळवणे हेच आपले ध्येय आहे' असे घोषित केले. देशात नवचैतन्य उसळले!

संपूर्ण स्वातंत्र्याची घोषणा गुरुजींच्या वाचनात आली आणि ते हर्षभरित बनले. छात्रालयातील आपल्या खोलीत अतिशय आनंदाने मुलांबरोबर अक्षरशः नाचले. त्याच आनंदाच्या उर्मीत त्यांनी 'स्वातंत्र्याचे गाणे' ही रचून म्हटले –

*मंगल मंगल त्रिवार मंगल*
*पावन दिन हा धन्य अहो।*
*भारत प्यारा स्वतंत्र झाला।*
*जय बोला – जय बोला हो॥*

*मेवाडाच्या रणशार्दूला।*
*उठा, उठा शिवराया हो॥*
*माता आपुली स्वतंत्र झाली।*
*जय बोला – जय बोला हो॥*

*दिशा आज का प्रसन्न दिसती।*
*निर्मळ दिसती सांगा हो॥*
*भारत झाला स्वतंत्र म्हणुनी।*
*जय बोला – जय बोला हो॥*

*पवन आजचा पावन वाटे।*
*कारण मजला सांगा हो।।*
*भारतमाता मुक्त म्हणोनी*
*जय बोला – जय बोला हो॥*

*पाषाणांची फुले जाहली।*
*का ते मजसी सांगा हो*

अनुक्रमणिका

*गतबंधन भू झाली म्हणुनी ।*
*जय बोला – जय बोला हो ॥*

*मातीची ही माणिकमोती ।*
*झाली का मज सांगा हो ॥*
*भारत झाला स्वतंत्र म्हणुनी ।*
*जय बोला – जय बोला हो ॥*

अशा तऱ्हेचा उत्तुंग कल्पनाविलास गुरुजींनी आपल्या कवितेत खेळवला असून मुक्त जयजयकारातच ही कविता संपते.

ह्या उद्धृत काव्यपंक्तवरूनदेखील गुरुजींच्या चित्तवृत्ती कशा मोहरून आल्या होत्या हे दिसते. त्याच वेळी २६ जानेवारी हा दिवस स्वातंत्र्यदिन म्हणून सर्व देशभर साजरा करावा वा स्वातंत्र्याची प्रतिज्ञा हिंदी जनतेने घ्यावी असा ठराव कॉंग्रेस अधिवेशनात करण्यात आला होता. तेव्हापासून ते १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र होईपर्यंत प्रतीवर्षी २६ जानेवारीलाच 'स्वातंत्र्यदिन' सभा-मिरवणुकी-प्रतिज्ञावाचन अशा कार्यक्रमांनी देशभर साजरा केला जात असे. त्यानंतर स्वतंत्र भारताची घटना सिद्ध झाल्यावर २६ जानेवारी १९५० पासून हा दिवस 'प्रजासत्ताक दिन' म्हणून साजरा करण्यात येऊ लागला.

१९३० सालच्या २६ जानेवारीला गुरुजींनी छात्रालयाचा परिसर सडारांगोळ्यांनी सुशोभित केला. झेंडावंदन झाले. स्वातंत्र्याची गीते म्हटली. गुरुजींनी या निमित्ताने –

*अजि घुमघुमली स्वतंत्रतेची भेरी*
*दुमदुमली दुनिया सारी*
*अजि राष्ट्राने स्वतंत्रतेची केली*
*घोषणा धीर या काळी...*

असे एक गीत लिहिले होते. 'प्राण अर्पावे स्वातंत्र्यसौख्य मिळवावे' अशी स्वातंत्र्याची महती गाणारी आणि प्रकट करणारी आणखी पुष्कळ गाणी गुरुजींनी लिहिली होती. ध्यानी–मनी–स्वप्नी त्यांना जणू स्वातंत्र्याचा ध्यासच लागलेला होता. त्यांच्या ध्यासाचा संस्कार विद्यार्थ्यांवरही आपोआपच होत असे. त्यांच्यातही स्वातंत्र्यप्रेम उदित होत असे.

दुसऱ्या दिवशीच्या छात्रालय दैनिकात गुरुजींचा लेख झळकला. त्यांनी लिहिले होते, " कालचा दिवस मोठ्या भाग्याचा! मोठ्या सोहळ्याचा!! मोठ्या कौतुकाचा!!! मोठ्या आनंदाचा!!!! ज्यांनी आयुष्यात हा दिवस पाहिला ते लोक धन्य होत. १८५७ नंतर एवढा भाग्याचा दिवस उगवला! कालची प्रभातवेळ मंगल होती. काल शिवनेरीस जन्म पावलेला, स्वातंत्र्यमंदिर उभारणारा, स्वातंत्र्यदेवीचा लाडका बाळ शिवाजी याला परमानंद झाला असेल व त्या प्रिय महाराष्ट्र भूमीवर, त्या हिंदी भूमीवर आनंदाश्रूमोचन त्यांनी केले असेल.

" परंतु कालचा दिवस हा आरंभ आहे. कालच्या दिवसापासून स्वातंत्र्य मिळवण्यासाठी जोराने खटपट सुरू करायची आहे. काल स्वातंत्र्याचे जाहीरनामे सभांमधून ऐकले असाल, पण सर्वात मोठी गोष्ट स्वतःच्या मनाला तो

अनुक्रमणिका

वाचून दाखवणे ही होय. आपले मन धडधडून साफ केले पाहिजे. स्वतंत्र केले पाहिजे. आपण तेव्हाच स्वतंत्र होऊ जेव्हा आपली मने आधी स्वतंत्र होतील!"

स्वातंत्र्यासाठी गांधीजी आणि इंग्रज व्हॉइसरॉय यांच्यात पत्रव्यहार सुरू होता. गाधीजींनी हिंदी जनतेसाठी ११ मागण्या व्हॉइसरॉयकडे केल्या होत्या, पण त्याला साफ नकार मिळालेला होता. गांधीजी म्हणाले, " मी भाकरी मागितली, परंतु दगड मिळाले."

आता लढा अटळ ठरला होता. गांधीजींनी या वेळी लढ्याचा अभिनव असा मार्ग काढला. त्यांनी ज्या अकरा मागण्या मागितल्या होत्या, त्यात 'मिठावरला कर रद्द करावा' अशी एक मागणी केलेली होती. गांधीजींनी ह्याच मागणीवर सत्याग्रह करण्याचा निर्णय केला.

सत्याग्रहाची सर्व देशभर तयारी सुरू झाली. देशात पुनश्च उत्साहाची लाट पसरली. मिठाचा कायदा मोडून मीठ बनवायचे! लुटायचे! केवढी लहानशी वस्तू मीठ! पण गांधीजींनी त्याला स्वातंत्र्याच्या महान प्रतीकाचा आशय दिला. ठिकठिकाणी समुद्रकिनारी मिठाचा कायदेभंग होणार असे सरकारला गांधीजींनी कळवले. स्वतः गांधीजी गुजरातमधील दांडी या गावी जाऊन कायदेभंग करणार होते.

गुरुजींना या लढ्यात भाग घ्यावा, अशी तळमळ लागून राहिली होती. पण शाळा-छात्रालयाचे काम हाती होते. गुरुजींनी मनावर ताबा ठेवून ते दिवस कसेबसे लोटले आणि मग २९ एप्रिल १९३० रोजी गुरुजींनी शाळेचा निरोप घेतला. गुरुजी स्वातंत्र्यलढ्यात सामील झाले.

❑

अनुक्रमणिका

# १०. सक्रिय राजनीती

साने गुरुजींनी शाळेच्या चिमुकल्या जगाचा निरोप घेतला आणि ते मराठी मुलुखाच्या मोठ्या जगात आले. त्यांच्या मनातील अतिविशाल व व्यापक ध्येयसृष्टीची ते वाटचाल करून आले. प्रारंभी ते जळगावजवळील पिंपराळ इथल्या आश्रमात दाखल झाले. आश्रमातील मुले चटकन त्यांच्याभोवती जमा झाली. गुरुजीही मुलांत मूल होऊन गेले.

आश्रमातील सफाई, दळण, कताई, रसोई इत्यादी कामे गुरुजी करू लागले. मुले त्यांना आणि ते मुलांना प्रत्येक कामात सहकार्य करू लागले. गुरुजींना चरख्यावर सूत काढता येत होते, पण टकळीवर काढता येत नव्हते. म्हणून आश्रमातील मुलांकडून त्यांनी त्याचे धडे घेतले.

काही दिवसांतच आश्रमाच्या संचालकांनी गुरुजींची वृत्ती व वाणी हेरून त्यांना बाहेर खेड्यापाड्यांत प्रचारासाठी पाठवले. सत्याग्रहाची मोहीम चालविण्यासाठी सत्याग्रही स्वयंसेवकाची आणि आर्थिक मदत गोळा करण्याची आवश्कता होती. तरुणांना आकर्षित करून घेण्याची हातोटी गुरुजींनी साधलेली होती.

५-६ मुलांचा गट घेऊन गुरुजी निघाले. सावदा-फैजपूरकडे गेले. बाहेरचे मुक्त वातावरण मुलांनाही आवडले. त्यातून गुरुजी बरोबर! त्यांचा उत्साह वाढला. सावद्याला जाताना रेल्वेच्या डब्यातून लढ्यासाठी निधी जमा करायला सुरुवात केली. गांधीजींनी देशात असे अनुकूल वातावरण निर्माण केले होते की, लोकही यथाशक्ती मदत चटकन देत असत.

गुरुजींबरोबर मुले गावोगावी जात असत. गावात फिरून दवंडी देत असत. संध्याकाळी सभा घेत असत. सभेत गुरुजी बोलू लागले की भारताचा सारा स्वातंत्र्यलढा त्यांच्या जिभेवर अवतरत असे. एकेक शब्द त्यांच्या अंत:करणाच्या तळमळीतून उतरत असे. श्रोत्याच्या हृदयाचा ठाव ते घेत असत. सभेनंतर लढ्यासाठी निधी जमा करीत असत. गुरुजींच्या ओजस्वी भाषणाने लोकांची मने भारून जात असत. ते भराभर पैसे तर देत असतच पण काही जणांनी बोटातील अंगठ्याही काढून दिल्या. गुरुजींना एक नवीनच दर्शन घडले. त्यांचा आत्मविश्वास वाढला. कारण त्यांना वाटे, कोण आपल्याकडे लक्ष देणार? कोणाला वेळ? पण घडले होते मात्र निराळेच!

सभेच्या आधी गुरुजी स्वरचित अशी राष्ट्रीय गाणी म्हणत असत. त्या वेळी रचलेले त्यांचे पुढील गाणे फारच लोकप्रिय झाले होते –

*आम्ही मांडू निर्भय ठाण । देऊ हो प्राण ।*
*स्वातंत्र्य–सुधेचे निज जननीला घडवू मंगल पान ॥*
*स्वार्थाची करुनी होळी*
*छातीवर झेलू गोळी*
*करू मृत्यूशी खेळीमेळी*
*मातृभूमीच्यासाठी मोदे करू सारे बलिदान ॥*
*श्रीकृष्ण बोलुनी गेला*
*जय अखेर सत्पक्षाला*
*ना पराभूती सत्याला*

अनुक्रमणिका

*जयजयकारा करुनी पुढती घुसू होऊ बेभान ॥*
*ही मंगल भारतभूमी*
*करू स्वतंत्र निश्चित आम्ही*
*हा निश्चय अंतर्यामी*
*मातृमोचना करूनी जगी निज अर्पू पहिले स्थान ॥*
*येतील जगातील राष्ट्रे*
*वंदितील भारतमाते*
*करितील स्पर्श चरणाते*
*धन्य असा सोन्याचा वासर दाविल तो भगवान ॥*

खानदेशात असा गावोगावी स्वातंत्र्याचा संदेश देत गुरुजी फिरले. नंतर ते कोकणात शिरोड्यालाही गेले. शिरोडा येथे मोठी सत्याग्रही छावणी उघडलेली होती. ते एक धारातीर्थच बनले होते. महाराष्ट्रातून ठिकठिकाणाहून शेकडो सत्याग्रही मिठाच्या सत्याग्रहासाठी शिरोड्याला गोळा झाले होते. गुरुजींना तिथे परत खानदेशात जाऊन निधी गोळा करण्याचा आदेश मिळाला. गुरुजी परत खानदेशात आले. गावोगावी हिंडून सभा घेऊ लागले. निधी जमा करू लागले. कुंझर-पाचोरा-उतराण-एरंडोल असे गुरुजी या गावाहून त्या गावाला झंझावाताप्रमाणे लोकांच्या चित्तात स्वातंत्र्यभावना चेतवीत चालले होते. त्यांच्या प्रचाराने सरकारी अधिकारी खवळले. त्यांनी गुरुजींना पकडून तुरुंगात डांबण्याचे ठरवले. गुरुजीही त्यांना चुकवीत चालले.

एके दिवशी संध्याकाळी अंमळनेरला सभा होती. नदीच्या वाळवंटात प्रचंड जनसमुदाय जमलेला होता. सभेच्या आधी अटक होऊ नये म्हणून गुरुजी टांग्यात बसून आले. सभेत उभे राहिले. त्या दिवशी गुरुजींची वाणी साम्राज्यशाहीवर अग्निवर्षाव करीतच अवतरली. विदेशी मालावर बहिष्कार टाकण्याची कळकळीची विनंती गुरुजींनी केली.

सभा संपता संपताच गुरुजींना फौजदाराने अटक केली. खटला भरण्यात आला. गुरुजींना १५ महिने सक्तमजुरी आणि २०० रु. दंड, दंड न भरल्यास आणखी तीन महिने सक्तमजुरी अशी शिक्षा ठोठावण्यात आली.

गुरुजींना धुळे तुरुंगात पाठवण्यात आले. १७ मे १९३० पासून गुरुजींचा पहिला कारावास सुरू झाला. गुरुजी राजकीय कारणामुळे तुरुंगात आले, पण ते स्वतःला तथाकथित राजकीय नेते वगैरे समजत नसत. त्यांचा पिंड विधायक, रचनात्मक कार्य करण्याचा होता. ते म्हणत असत, " मी प्रेम धर्माचा, बंधुभावाचा प्रचारक होईन. अस्पृश्यता नाहीशी व्हावी, हिंदू-मुस्लिम ऐक्य व्हावे, साक्षरता वाढावी इत्यादी प्रकारची कामे मी करीन. मी तसा पोलिटिकल माणूस नाही."

तुरुंगातही थोरामोठ्यांपेक्षा गुरुजींची मैत्री जमली ती तीन सत्याग्रहींशी. कुणाला ते आपले मित्रच वाटत असत. त्यांचा धाक त्यांना मुळीच वाटत नसे. गुरुजी या तरुण सत्याग्रही मुलांना तुरुंगात स्फूर्तिदायक गोष्टी सांगत असत, स्वातंत्र्याची गाणी शिकवीत असत, नवविचार देत असत.

चक्कीवर दळताना मुलांच्या हाताला फोड यायचे. दळताना त्यांना त्रास व्हायचा. मग गुरुजी आपले दळण दळून त्यांच्याही वाट्याचे दळण दळून द्यायचे.

अनुक्रमणिका

धुळ्याच्या तुरुंगात गुरुजी दोन—अडीच महिने होते. नंतर त्यांना त्रिचनापल्लीच्या तुरुंगात हलविण्यात आले. धुळ्याच्या तुरुंगात असताना तेथील कामधाम आटोपल्यावर गुरुजी लिहित असत.

*स्वातंत्र्याचे आम्ही शिपाई ।*
*सुखवू प्रियतम भारतमाई ॥*

हे प्रसिद्ध गीत त्यांनी तिथेच लिहिले.

'खरा सत्याग्रही' नावाचे नाटकही त्यांनी लिहिले होते. शिवाय 'अस्पृश्यता', 'खरी ग्रामसुधारणा' इत्यादी विषयांवर त्यांनी निबंधही लिहिले होते.

त्रिचनापल्लीचा सेंट्रल जेल हा दक्षिण भारतातील एक फार मोठा तुरुंग. त्या वेळी ३००० कैदी तिथे होते. केरळ, तामिळनाडू, आंध्र, कर्नाटक, बंगाल, महाराष्ट्र अशा विविध प्रांतातील सत्याग्रही तिथे होते. त्यामुळे निरनिराळ्या भाषा कानावर पडू लागल्या. या विविध भाषा संमेलनामुळे गुरुजींना भारतातील भिन्नतेमधील अभिन्नतेचा जवळून परिचय होण्याची संधी लाभली. एका कन्नड मित्राकडून त्यांनी कानडीचे धडे गिरवायला सुरुवात केली. एका तमिळ मित्राने 'बेबी सरोजची' गोष्ट सांगितली. पुढे गोड गोष्टीत तीच गुरुजींनी लिहून काढली. व्हिक्टर ह्यूगो या फ्रेंच कादंबरीकाराच्या 'ला मिझराबल'वर आधारित 'दुःखी' नावाची गोष्ट त्यांनी इथेच लिहिली.

त्रिचनापल्लीच्या कारावासात गुरुजींच्या ठायीची आंतरभारतीची भावना अधिक परिपुष्ट झाली. चांगली रुजली.

'तिरूवल्लुवर' या तमिळ पंडिताच्या 'कुरल' नामक ग्रंथाचा अनुवादही गुरुजींनी येथे केला. तमिळ वाङ्मयात कुरलची प्रतिष्ठा तमिळ वेद म्हणून सर्वमान्य आहे!

त्या वास्तव्यात गुरुजींनी बऱ्याच कविता लिहिल्या, नाटके लिहिली, निबंधही लिहिले. त्याच वेळी आचार्य भागवतही तिथे होते. आचार्य भागवत यांच्यासारख्या विद्वान, रसिक, साहित्य समीक्षकाचा सहवास गुरुजींना फारच लाभदायक ठरला. आचार्यांनीच पुढे गुरुजींच्या 'पत्री' नामक कवितासंग्रहाला सुंदर व दीर्घ प्रस्तावना लिहिली.

१९३० साली अखेरपर्यंत निरनिराळ्या स्वरूपात, निरनिराळ्या ठिकाणी कायदेभंगाची चळवळ सुरूच राहिली. हजारो सत्याग्रहींनी तुरुंग भरून गेले. परंतु गांधीजींना मुक्त करून सरकारने वाटाघाटी सुरू केल्या. ५ मार्च १९३१ पर्यंत वाटाघाटी होऊन अखेरीस गांधी-आयर्विन करार झाला. या करारानुसार सरकारने सत्याग्रहींची सुटका केली. २३ मार्च १९३१ रोजी साने गुरुजींना त्रिचनापल्लीच्या तुरुंगातून मुक्त करण्यात आले.

त्या दिवशी रात्री लाहोरच्या तुरुंगात सरकारने भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरू या क्रांतिकारकांना फाशी दिले होते. गांधीजींनी त्यांच्या सुटकेसाठी केलेली रदबदली सरकारने धुडकावून लावली होती. या वार्तेने गुरुजी अशांत, अस्वस्थ झाले आणि त्या मनःस्थितीच ते अंमळनेरला आले.

❑

अनुक्रमणिका

# ११. स्वदेशीचे व्रत

साने गुरुजी अंमळनेरला आले आणि त्याच दिवशी त्यांनी भगतसिंग, सुखदेव, राजगुरू यांच्या फाशीचा निषेध करण्यासाठी मोठी सभा घेतली. या सभेत पुनश्च दहा-साडेदहा महिन्यांनी गुरुजींची ओजस्वी वाणी अंमळनेरकरांना ऐकायला मिळाली. या सभेत आणखी एक चित्तथरारक प्रसंग घडला.

शिरोड्याच्या मिठाच्या सत्याग्रहाच्या वेळी १५ मे १९३० रोजी अंमळनेरच्या मल्हारी चिकाटे या बहाद्दराने भीम पराक्रम केला होता. पोलीसांच्या लाठ्या झेलून मिठागरावर हल्ला चढवला होता. त्या वेळी भयंकर लाठीमाराने मल्हारी बेशुद्ध पडला होता. जखमी झाला होता. मल्हारीचा अतुल पराक्रम पाहून त्या वेळच्या महाराष्ट्र सत्याग्रही मंडळाने त्याला 'कॅप्टन' अशी पदवी बहाल करून त्याचा गौरव केला होता. मल्हारी त्या सभेत होताच. गुरुजींनी त्या वेळी रक्ताने माखलेला मल्हारीचा सदरा सभेत आणला होता. तो लोकांना दाखवून साम्राज्यसत्तेची राक्षसी अमानुषता वेशीवर टांगली होती. गुरुजींनी मल्हारीच्या धैर्याचे गुणगान केले. आणि त्या रक्ताने भरलेल्या सदऱ्याचा लिलाव पुकारला, सभेतल्या लोकांच्या भावना साम्राज्यविराधी रोषाने सळसळत होत्या. तप्त झाल्या होत्या. एका महाभागाने १५०० रुपयांना तो सदरा घेतला.

गुरुजींची वाणी खानदेशात पुनश्च नवतेजाने घुमू लागली. दरम्यान गुरुजी तुरुंगातून सुटून आल्यानंतर एकदा पालगडला घरी जाऊन आले. गजाननदादा व वहिनी यांना भेटले.

गुरुजींना १५ महिन्यांच्या शिक्षबरोबरच २०० रुपये दंडाची शिक्षाही झाली होती. गांधी—आयर्विन करारामुळे गुरुजींची सुटका दहा-साडेदहा महिन्यांत जरी झाली होती, तरी ते तुरुंगात गेल्यावर त्यांच्या दंडाची रक्कम मात्र पोलिसांनी गजाननदादांकडून वसूल केली होती. कारण त्या वेळी गुरुजी आणि त्यांचे बंधू यांचे एकत्र कुटुंबच मानलेले होते. हा त्रास आपल्यामुळे आपल्या भावांना होऊ नये व असा भुर्दंडही पुन्हा पडू नये या हेतूने गुरुजींनी या मुक्कामात गजाननदादाला स्वतःच खरेदीखत करून देऊन एकत्र कुटुंबातल्या आपल्या वाटणीवरचा हक्क सोडून दिला.

आणखी एक घटना याच मुक्कामात घडली. गुरुजींनी कायदेभंगाच्या चळवळीत भाग घेतला आणि शिक्षाही भोगली, याचा अभिमान व कौतुक पालगडच्या ग्रामस्थांना वाटले आणि म्हणून गुरुजी गावात आलेले पाहून ग्रामस्थांनी आपल्या या पंढरीचा गणपतीच्या खेळात सभा भरवून सत्कारही केला. ५१ रूपयांची थैली पंढरीला त्यांनी या वेळी प्रेमाने दिली.

गुरुजींनी ती थैली गावकार्यासाठी तिथेच ग्रामस्थांच्या हवाली करून टाकली.

ग्रामस्थांनी त्यांचा गौरव केला होता आणि वर्षातून एकदा तरी आपल्या गावाकडे येत जा असा प्रेमळ आग्रहदेखील केला होता.

गुरुजी परत खानदेशात आले. त्यांच्या पायाची चक्रे फिरू लागली. लोकजागृतीची मशाल घेऊन ते खेड्यापाड्यांतून भाषणे देत, गाणी म्हणत फिरू लागले.

अनुक्रमणिका

१९३१ सालचा २ ऑक्टोबर जवळ येत होता. तो दिवस गांधी जयंतीचा. गांधीजींनी सांगितले होते, वाढदिवस पाळावयाचा असेल तर तो 'चरखा जयंती' म्हणून पाळावा. सर्वत्र सूतयज्ञ व्हावेत. हजारो चरखे फिरावेत. चरखा-संगीत घुमावे.

पूर्व खानदेश म्हणजे आताच्या जळगाव जिल्ह्याने गांधीजींना त्यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने एक कोटी वार सूत अर्पण करण्याचा संकल्प केला होता. पण जिल्ह्यांतील कार्यकर्त्यांची जेव्हा सभा झाली, तेव्हा आपापल्या तालुक्यातून सूत देण्याचे आकडे कार्यकर्ते कमी देऊ लागले. अशा कमी आकड्यांनी एक कोटी वाराचा संकल्प कसा सिद्धीस जाणार?

सभेत गुरुजी उठले आणि त्यांनी जाहीर करून टाकले, 'अंमळनेर तालुका २० लाख वार सूत देईल.' वीस लाख वार सूत हा काही कमी आकडा नव्हता. सहकारी चिंताग्रस्त झाले, पण आपल्या सोबत्यांना गुरुजी म्हणाले, 'तोंडून शब्द गेला तो गेला. आता माघार नाही. चला, कामाला लागा.'

आणि तरुण सोबत्यांसह गुरुजींनी सूतयज्ञाच्या प्रचारासाठी खेडोपाडी पिंजून काढली. सूतशाळा उघडल्या. नांदेड, मारवड, डांगरी अनेक गावांतून चरखे व टकळ्या फिरू लागल्या. विणकामाचीही व्यवस्था केली.

एकदा एक काम हाती घेतले म्हणजे त्यात सर्वस्वाने झिजायचे, कष्टायचे, हे तर गुरुजींचे ब्रीद! सुतयज्ञाच्या कामालाही ते असेच भिडले आणि गांधी जयंतीपर्यंत वीस लाखच नव्हे, तर त्याहूनही कितीतरी अधिक वार सूत अंमळनेर तालुक्याच्या वतीने अर्पण करून त्यांनी आपला संकल्प सिद्धीस नेला.

त्या वेळी ठिकठिकाणी खादीभांडारे नव्हती. गुरुजी खादीचे गठ्ठे कधी खांद्यावर घेऊन तर कधी एखाद्या हातगाडीवर घालून खादी विक्रीसाठी अंमळनेर शहरातून आणि खेड्यापाड्यांतूनही फेरी काढीत असत. गुरुजी शाळेत नसले, तरी विद्यार्थ्यांचा गराडा त्यांच्याभोवती सदैव असेच. त्यांनाही गुरुजी या कामाला लावत असत. खादी-प्रचारासाठी गाणी म्हणत, घोषणा देत या मुलांसह फेरी काढत असत. त्या काळात स्वदेशाबद्दल त्यांची भावना किती तीव्र असे हे त्यांनी त्या वेळी लिहिलेल्या अनेक गीतांमधून, लेखातून दिसून येते. असेच एक गीत-

*हृदय जणु तुम्हा ते नसे*
*बंधु उपाशी लाखो तरीही*
*सुचती विलास कसे?*
*परदेशी किती वस्तु घेता*
*बंधुस घास नसे।*

विनोबांनी गुरुजींना डांगरीच्या आश्रमात ठेवले होते. डांगरीच्या आश्रमात किंवा अंमळनेरच्या सूतशाळेत असले म्हणजे गुरुजी हातानेच स्वयंपाक करून जेवत असत. डांगरीच्या आश्रमात तर मातीचीच गाडगीमडकी होती. पण गुरुजींचे कशावाचून काही अडत नसे. त्यांनी आपल्या गरजा अत्यंत थोड्या, आवश्यक तेवढ्याच ठेवलेल्या होत्या. कपडे, खाणेपिणे वगैरे बाबतीतला त्यांचा साधेपणा फारच होता. जेवणाच्या बाबतीत तर ते बेफिकीर होते म्हटले तरी चालेल. कधी स्वयंपाक करायचे, पण पुष्कळवेळा दौऱ्यामुळे, कामामुळे वेळच नसायचा. अशा वेळी डाळ-चुरमुरे-फुटाणे-शेंगदाणे यावरच ते भागवीत असत. कुणाकडे गेले आणि त्यांनी 'गुरुजी जेवायला

अनुक्रमणिका

बसा' म्हटले की, 'जेवूनच आलो' असे ते दडपून सांगायचे. त्यांनीच एकदा म्हटले आहे, 'जेवणाच्या बाबतीत मी अनेक वेळा खोटे बोललो आहे.' गुरुजीचा स्वभावच अतिभिडस्त आणि संकोची होता. आपल्यामुळे दुसऱ्यांना एवढासाही त्रास होऊ नये, अशी त्यांची त्यामागची भावना असे.

२ ऑक्टोबर १९३१ रोजी गुरुजींनी गांधी जयंतीच्या दिवशी सूतयज्ञाचा संकल्प पूर्ण केला होताच. पण त्या दिवशी गांधीजींना अत्यंत प्रिय असा दुसराही एक कार्यक्रम गुरुजींनी अंमळनेरमध्ये आखला. तो म्हणजे सफाईचा. विद्यार्थ्यांची त्यांनी पथके तयार केली. झाडू, खोरी, घमेली, कुदळी, फिनेल इत्यादी साधने जुळवली. गिरणीकामगारांच्या वस्तीतील संडास सफाई केली. मोऱ्या उपसल्या, फिनेल वगैरे टाकून स्वच्छ केल्या. एका चाळीतही असाच कार्यक्रम झाला. चाळीचे मालक म्हणू लागले, 'गुरुजी, हे काय?' गुरुजींनी उत्तर दिले, 'आज गांधी जयंती, लोकं 'महात्मा गांधी की जय' म्हणत असतात. त्यांना गांधीजींचा सेवाधर्म कळावा म्हणून मुद्दाम हा कार्यक्रम ठेवला.'

नंतर काही खेड्यातूनही स्वच्छता पथके गेली. गुरुजींनी या सफाई कार्यक्रमासाठी गाणी, संवादही लिहिले होते. निरनिराळ्या विषयांवरची आकर्षक अशी पोस्टर्स पुढे ठेवून गुरुजी भाषणे देत असत. समाजशिक्षणाचे व्रतच त्यांनी अंगीकारलेले होते.

त्याच सुमारास पूर्व खानदेशात अतिवृष्टी झाली. त्यामुळे शेतकऱ्यांचे रानातले कपाशी, ज्वारी आदी पीक पार हातचे गेले. सगळीकडे चिंतेची परिस्थिती निर्माण झाली. आधीच दैन्य, दारिद्य त्यात ही आपत्ती. गुरुजींनी खेड्याकडे धाव घेतली. ते एकेका गावात जायचे. लोकांना देवळात, चावडीत जमायचे. सुरुवातीला लोक सांगूनही यायचे नाहीत. गुरुजी मग चिडायचे. रागवायचे, त्यांना वाटायचे, 'एवढे आम्ही यांच्याकरता येतो. राबतो. पण यांना याचे काहीच वाटत नाही. भेटतही नाहीत...'

पण लवकरच त्यांचा हा रागही ओसरे. मग अंतर्मुख होत ते म्हणायचे, 'चूक त्यांची नाही, आमचीच आहे. या आधी आम्ही त्यांना कधी भेटून त्यांची विचारपूस केली होती का? कधी त्यांना विश्वासात घेतले होते का?मग कसा त्यांचा एकदम आमच्यावर विश्वास बसावा?'

गुरुजींनी चिकाटीने हे काम सुरू ठेवले. जवळ जवळ एकशेदहा खेड्यांतून ते गेले. शेतकऱ्यांना भेटले. पूर्वीचे पिकाचे मान, या सालची परिस्थिती या संबंधी आवश्यक ती माहिती गोळा केली. त्या आधारे कलेक्टरकडे अर्ज करून मदतीसाठी लिहिले. एक वेगळ्या तऱ्हेचे काम या वेळी गुरुजींनी केले होते. त्यामुळे खानदेशातील खेड्यांचे आणि खेडूत जीवनाचेही अत्यंत जवळून दर्शन त्यांना घडले होते. ग्रामीण जीवनातील विविध प्रश्नही विविध तऱ्हेने पुढे आले होते. एक कार्यकर्ते म्हणून गुरुजींनी हे लाभदायक असे शिक्षणच मिळाले होते. याचा उपयोग त्यांना पुढे पुष्कळच झाला.

१९३० सालच्या कायदेभंगाच्या चळवळीत भाग घेतलेल्या खानदेशातील सत्याग्रहींचे एक संमेलन असोदा येथे घेतले होते. या संमेलनाला अध्यक्ष म्हणून विनोबाजी आले होते. गुरुजींची आणि विनोबांची ही पहिली भेट. विनोबांचे संमेलनात फार सुंदर भाषण झाले. गुरुजींची या पहिल्या भेटीतच विनोबांवर भक्ती जडली. याच सुमारास विनोबांचा खानदेशात दौरा झाला होता. त्या वेळी गुरुजी त्यांच्याबरोबर होते. विनोबांच्या मुखातून नवविचार ऐकत होते; आत्मसात करत होते. गुरुजींनी पुढे 'विनोबाजी भावे 'नावाचे छोटे चरित्रही लिहिले आहे. गुरुजी म्हणत असत, " विनोबांनी माझे वैचारिक पोषण फार मोठ्या प्रमाणावर केले आहे." विनोबांच्या व्यक्तिमत्वाची आणि

अनुक्रमणिका

बुद्धिमत्तेची विलक्षण छाप गुरुजींवर या वेळी पडली होती आणि विनोबांच्या चित्तावरही गुरुजींच्या सौजन्यशील, सेवाभावी व भावनाशील चारित्र्याचा ठसा उमटल्याशिवाय राहिला नाही.

विनोबाही या वेळची आठवण सांगताना म्हटले, ‘गुरुजी आणि मी खानदेशाच्या दौऱ्यात होतो. मोटारने चाललो होता. त्या वेळी गुरुजींनी आपली एक कविता मला म्हणून दाखविली होती. ती ऐकली आणि मी म्हणालो, ‘गुरुजी, तुमची कविता आहे मराठी, पण वाटली बंगालीसारखी.’ तेव्हा ते हसले आणि म्हणाले, ‘बरोबर आहे. तिचे बंगाली टोन आहेत.’

त्रिचनापल्लीस असताना गुरुजींनी काही कविता बंगाली चालीवर लिहिल्या होत्या. गुरुजींची आंतरभारती दृष्टी नि विनोबांची सूक्ष्म रसिकता यातून प्रकट होते.

❏

अनुक्रमणिका

# १२. धुळ्याच्या तुरुंगात

गांधीजी लंडन येथील गोलमेज परिषद फसल्यानंतर २८ डिसेंबर १९३१ रोजी भारतात परत आले. मुंबईत उतरताच त्यांनी लोकांना लढण्यासाठी सावध राहण्याची सूचना दिली. करबंदीचा आदेश दिला. वातावरण प्रक्षुब्ध झाले. ४ जानेवारी १९३२ रोजी सकाळी गांधीना अटक झाली. विनोबांनाही जळगावला अटक झाली. त्यांना धुळे तुरुंगात पाठवण्यात आले.

गुरुजी मात्र पोलिसांच्या तडाख्यात लवकर सापडले नाहीत. शक्यतो लवकर अटक करून घ्यायची नाही, असेच त्यांनी ठरवले होते. गांधीजींच्या अटकेचा निषेध करण्यासाठी त्यांनी अंमळनेरला सभा घेतली. सभा खूपच धामधुमीची झाली. गुरुजींचे भाषण फारच स्फूर्तिदायक झाले. लोकांनी लढ्यासाठी भराभर पैसे दिले. एका गरीब गुजराती बाईने हातातली पाटली काढून दिली.

गुरुजींना सभा संपताच अटक करण्याची तयारी पोलिसांनी केली होती, पण गर्दीत घुसून गुरुजी पसार झाले. पारोळ्याला आले. एरंडोलला पोहोचले.

८-१० दिवसांनी पुन्हा गुरुजींनी गुप्तपणे येऊन अंमळनेरला वाळवंटात सभा घेतली. प्रचंड सभा झाली. या वेळी मात्र पोलिसांनी फारच सावध राहून बंदोबस्त कडक ठेवला होता. त्यामुळे त्यांनी सभा संपताच गुरुजींना अटक केली.

दुसऱ्या दिवशी खटल्याचे नाटक झाले आणि १७ जानेवारी १९३२ रोजी गुरुजींना दोन वर्षांची सक्तमजुरीची शिक्षा ठोठावण्यात आली.

गुरुजींनाही धुळे तुरुंगात पाठवण्यात आले. विनोबाजी तिथे होतेच. इतरही पुढारी खेड्यातील कार्यकर्ते, मुले, स्त्रिया आदी सत्याग्रही होते.

गुरुजींनी तुरुंगात आल्यावर विनोबांच्या चक्की पथकात आपले नाव नोंदवले. त्यांच्या वाट्याला जे काही २५-३० पौंड धान्य दळण्याचे येई ते धान्य ते अतिशय वेगाने दळून टाकीत. या कामात गुरुजींचे जोडीदार थकून जात. दळण एकदा सुरू झाले म्हणजे त्यांचा हात गिरणीतील यंत्राप्रमाणे सारखा फिरत राही. विनोबा म्हणायचे, ‘गुरुजी, तुमची पंजाब मेल आहे.’

धुळ्याच्या तुरुंगात असताना गुरुजी ‘कडी बरॅक’ मध्ये होते, तर विनोबाजी ‘बारा कोठा’मध्ये होते. दळताना गुरुजी आपल्याबरोबर असावेत असे सर्वच तरुण सत्याग्रहींना वाटे. दळताना गुरुजी गाणीही म्हणायचे—

*निवडावे तण शेती करावी राखण ।*
*निवडावे खडे तेचि दळण नोझे पडे ।*

गुरुजी स्वतःच्या कोट्याचे दळण दळतच, पण ज्या कुणाचे बाकी राहिले असेल त्याचेही दळून देत असत आणि ते केवळ सत्याग्रही राजबंद्यांचेच नव्हे, तर इतर गुन्हेगार कैद्यांनाही दळू लागायचे. एकदा त्यांना थोडे बरे

अनुक्रमणिका

नव्हते. सोबती म्हणाले, " गुरुजी, आज नका दळायला येऊ. आम्ही दळून टाकतो." पण त्यांना ऐकले नाही. म्हणाले, "मी काय इथे आयते बसून खायला आलो आहे काय?"

चक्कीवर दळताना घाम यायचा, अंग चिकचिकून जायचे अशा वेळी जर गार वाऱ्याची झुळूक आली तर किती बरे वाटायचे. गुरुजी आनंदून म्हणायचे, " आईचा वारा आला रे आला!"

जेलच्या अन्नासंबंधीच्या जेव्हा सत्याग्रहींच्या तक्रारी वाढू लागल्या, तेव्हा साऱ्या जेलचा स्वयंपाक विनोबांनी आपल्या हाती घेतला. त्यांनी स्वयंपाकघरात ठाण मांडल्याचे पाहून गुरुजींसारखे लोकही त्यांना येऊन मिळाले. त्या वेळी धुळे जेलचे वरण फारच प्रख्यात झाले होते.

धुळे जेलची सर्वांनाच सर्वोत्तम अशी निरंतरची जर कोणती अपूर्व देणगी मिळाली असेल तर ती म्हणजे विनोबांजींची 'गीता-प्रवचने'. तुरुंगातील सहकऱ्यांनी विनोबांना त्यांच्या 'गीताध्ययना'चा लाभ मिळावा, अशी विनंती केली आणि विनोबांनी ती मान्य केली. दर रविवारी एक याप्रमाणे ही प्रवचने देण्याचे ठरले. त्यानुसार २१ फेब्रुवारी १९३२च्या रविवारी विनोबांचे पहिले प्रवचन झाले. गीतेची अठरा प्रवचने १९ जून १९३२ रोजी समाप्त झाली, या वेळी श्रोत्यांत गुरुजी होतेच. पण केवळ त्यांनी श्रवणभक्तीच केली नाही, तर ती सर्व प्रवचने त्यांनी शब्दशः टिपून घेतली. दिवसा ऐकलेली व भरभर लिहून घेतलेली प्रवचने गुरुजी रात्री बसून परत लिहून काढीत असत. गुरुजींसारखा सिद्धहस्त लेखक त्या वेळी तिथे उपस्थित होता म्हणूनच केवळ विनोबांची ती प्रवचने वाऱ्यावर न जाता अक्षरबद्ध झाली आणि पुढे ती काही त्यांच्या 'काँग्रेस' नामक साप्ताहिकातून व नंतर पुस्तकरूपाने सर्वांना उपलब्ध झाली. पुढे तर सर्व भारतीय भाषांमधून ही प्रवचने अनुवादित झाली असून इंग्रजीतही 'Talkson Gita' या नावाने ती उपलब्ध आहेत. विनोबांनीच म्हटले आहे, "गीता प्रवचने हे आता भारतीय जनतेचे पुस्तक झाले आहे."

त्या वेळची आठवण गुरुजी सांगतात, " ती अपूर्व मेजवानी होती. अमृतधारा स्रवत होती. गीता म्हणजे विनोबाजींचा प्राण. ते म्हणायचे, 'आईच्या दुधावर मी पोसलो आहे, त्यापेक्षा गीतेच्या दुधावरच मी अधिक पोसलो आहे. मी नेहमी गीता-समुद्रातच डुंबत असतो.' गीता विनोबाजींच्या रोमरोमी आहे. गीतेवर प्रवचने देताना ते तन्मय होत."

दररोज चक्कीचे काम संपले म्हणजे गुरुजी स्नान आटोपून विनोबांच्या कोठडीत जाऊन बसायचे. बोलायचे नाहीत. विनोबांकडे येणाऱ्यांचे बोलणे ऐकत रहायचे. वहीत टिपून ठेवायचे.

संध्याकाळी गुरुजींच्या भोवती तरुणांचा वेढा असायचा. गुरुजी त्यांना काँग्रेसचा इतिहास सांगायचे. इतरही कितीतरी गोष्टी सांगायचे. कविता, गाणी म्हणून दाखवायचे. त्यांची मायेने विचारपूस करायचे. त्यामुळे प्रत्येकालाच गुरुजी हवेहवेसे वाटायचे.

काही मुले तर फार लहान होती. १४-१५ वयाचीच होती. त्यांना कापूस पिंजणे वगैरे कामे दिली होती. गुरुजी त्यांच्या 'छोकरा फाईल' मध्ये जाऊन त्यांनाही मदत करायचे. गोष्टी सांगायचे. पिंजणाऱ्या ध्वनीने रंगून जायचे नि नाचायलाही लागायचे कधी-कधी. गुरुजींच्या जवळ रहायला मिळावे अशी सर्वांचीच इच्छा असे. मग एकेका बराकीत आठ आठ दिवस याप्रमाणे गुरुजींची वाटणी होई. गुरुजींच्या सानिध्यामुळे त्या लहानग्या मुलांना तुरुंगाचे खडतर जीवन सुसह्य होई.

अनुक्रमणिका

तुरुंगात असले तरी बाहेरच्या चळवळीशीदेखील जमेल तसे अनुसंधान गुरुजी ठेवत होते. कोणी सुटला तर त्याच्याबरोबर पत्र-निरोप धाडून गुरुजी मार्गदर्शन करत होते. असेच एक आपले मित्र चंद्रोदय भट्टाचार्य यांना गुरुजींनी लिहिले होते. त्यातील त्यांची तेजस्वी भावना व तीव्र तळमळ पाहण्यासारखी आहे. गुरुजी लिहितात

" मी शाळेतील विद्यार्थ्यांना काय सांगणार? वल्लभभाईंच्या एका वाक्याची मी त्यांना आठवण करून देतो. मागच्या चळवळीच्या वेळेस वल्लभभाई मुंबईत म्हणाले, 'माझा मुलगा आज शाळा—कॉलेजात शिकत असता तर मी त्याला गोळी घालून ठार केला असता.' सर्वजण एकजात देशासाठी हा जो झगडा चालला आहे त्यासाठी उठून पुढे या! तुम्हा मुलांकडे, तुमच्या निर्मळ, उघड्या व उदार हृदयांकडे भारतमाता पहात आहे. अरे, शिकता काय? शिकून शिकून जे कर्तव्य करायचे, ते तुम्हाला आज हाक मारीत आहे. गंगा आली असता घरात कसे रहावते? आगडोंब पेटला असता शाळेत कसे वाचवते? मैदानावर कसे खेळवते? घरी कसे खाववते? अरे, पहा त्या उत्तर हिंदुस्थानाकडे, तो बंगाल पहा, कसा पेटला आहे! तो गुजरात पहा, कशा भगिनी शेकडोंनी तुरुंगात जात आहेत! तुम्हाला महाराष्ट्राचा अभिमान नाही का? महाराष्ट्राची मान वर धरता यावी म्हणून आता कोण पुढे येणार? तुम्हा तरुण मुलांवर सारी भिस्त आहे. ज्या राष्ट्रातील तरुणही म्हाताऱ्यासारखे वागतात. त्या राष्ट्राच्या उद्धाराची आशा नाही. आता परिक्षेचा विचार नको. घरादाराचा विचार नको. सारे मोह झडझडून जाळा. विलायती कपडे जाळा. झेंडे हाती घ्या आणि विजेसारखे तळपून उठा! सर्वत्र जे दुबळेपणाचे, भित्रेपणाचे, मेलेपणाचे वातावरण आहे ते बदलून प्रचंड तेज निर्माण करा! मी लहानसा जीव पण माझ्या हृदयाची तगमग होते. मी तुम्हाला माझे हृदय कसे उघडून दाखवू? उठा सारे, घ्या झेंडे, बना निर्भय आणि लाठीकाठी, तुरुंग, गोळी यासाठी या पुढे! हेच खरे शिक्षण!"

पुस्तकी शिक्षणापेक्षा जीवनस्पर्शी शिक्षण गुरुजींना प्रिय वाटे. राष्ट्र स्वातंत्र्यासाठी लढत असताना मुलांनी शालेय, पुस्तकी शिक्षणाचे स्तोम माजवू नये, तर राष्ट्रीय कर्तव्य करण्यास सिद्ध व्हावे. असे त्यांना वाटे, 'मुलामुलींनी लढा आता चालवावा! भारतमातेचा कलंक घालवावा!' असे एक गाणेही त्यांनी केले होते. मुलांच्या 'वानरसेना' गावोगावी काढाव्यात अशी त्यांची कल्पना होती. त्यासाठी त्यांनी केलेले गीत सर्वत्र म्हटले जाई-

*वानर वानर हुप्या रे । वानर वानर हुप हुप हुप ॥*
*महात्मा गांधी आले राम*
*त्यांचे करूया चला काम*
*त्यांनी मारली आहे हाक*
*चला उठा लाख लाख*
*नका बसू गुपचुप । वानर वानर हुप हुप हुप ॥*

अशाच एका गुरुजींच्या पत्रावरून मुंबईचा गव्हर्नर सर फ्रेड्रिक साइक्स हा त्या वेळी भुसावळला येणार होता म्हणून मुलांनी निदर्शने करण्याचे ठरवले. गुरुजींनी लिहिले होते, " जिल्ह्याची शान राखा. काळी निशाणे दाखवा. त्याला 'परत जा' म्हणून सांगा." पोलिसांचा बंदोबस्त कडेकोट असतानाही गुरुजींच्या प्रेरणेने पेटलेल्या मुलांनी काळे झेंडे दाखवून 'साइक्स गो बॅक' अशा आरोळ्या ठोकल्या. मुलांना फटके बसले. तुरुंगवासही घडला. पण त्यांनी ते धैर्याने, निष्ठेने सोसले. गुरुजींना मुलांच्या या धैर्याचे फार फार कौतुक वाटले.

❏

अनुक्रमणिका

## १३. नाशिकच्या कारावासात

१९३२ सालच्या ऑगस्ट महिन्यात धुळे तुरुंगातील काही सत्याग्रही नाशिकच्या तुरुंगात पाठवण्यात आले. त्यात गुरुजींचाही समावेश होता.

नाशिकचा तुरुंग हवापाण्याच्या दृष्टीने चांगला होता. शिवाय गुरुजींच्या प्रिय श्रीरामाच्या वास्तव्याने पुनित झालेली ही भूमी.

*तुझ्या धूळिमाजी वाटे लोळणे सुखाचे ।*
*इथे पाय पावन फिरले राम-जानकीचे ॥*

अशी गुरुजींची उत्कट श्रद्धा. भक्ती. त्यामुळे मनातून ते सुखावले होते. परंतु नाशिकच्या कैदखान्यात येऊन दाखल होताच, तेथील परिस्थिती पाहून त्यांना उद्वेगच आला. त्या रामभूमीतल्या बंदीशाळेत रोच नामक इंग्रज रावणाचे अन्यायी अधिराज्य चालू होते.

नाशिकच्या तुरुंगात गेल्याबरोबर त्या सर्व सत्याग्रहींना तेथील शिपायांनी आणि वॉर्डर्सनी करड्या स्वरात धमकावले, “ यह धुलिया की धरमशाला नहीं, नासिक सेंट्रल जेल है। यहां रोच साहब का हुकुम चलता है।” रोच तिथला डेप्युटी जेलर होता. भलताच कडक आणि निष्ठुर होता. तुरुंगातली शिस्त बिघडू नये म्हणून त्याने दहशतीचे तंत्र अवलंबिले होते. नाना तऱ्हेने जाचक नियम आणि बंधने त्याने सत्याग्रही कैद्यांवर लादलेली होती. हुकुमाशिवाय उठायचे नाही की बसायचे नाही. हुकुम मिळाल्याशिवाय खायचे नाही, शेजारच्या कैद्यांशी बोलायचे नाही. चक्की पिसण्याचे काम तर फारच त्रासाचे केले होते. तेथील राजबंद्यांनी शिस्त म्हणून हे सर्व पाळले होते. सहन केले होते. पण रोचने जेव्हा आणखी एक अपमानकारक फर्मान काढले तेव्हा मात्र राजबंद्यांतही खळबळ माजली.

रोचचे नवे फर्मान असे होते की, सायंकाळी जेव्हा कैद्यांची मोजदाद होते, गिनती होते, त्या वेळी राजबंद्यांनी पायावर हात ठेवून मान गुडघ्यात घालून उकिडवे बसले पाहिजे. हा अपमानास्पद निर्बंध पाळण्याचे राजबंद्यांनी जेव्हा नाकारले, तेव्हा पोलीस आणि वॉर्डस त्यांच्या डोक्यावर, त्यांनी मान खाली घालावी म्हणून, थपडा व दंडा मारू लागले.

गुरुजींनी ‘अशा प्रकारे मान खाली घालणार नाही,’ असे तेजस्वी निर्भयपणे सांगितले.

राष्ट्राची मान उंच करण्यासाठी आलेल्या राजबंद्यांवर असली सक्ती होता कामा नये,’ असे ते म्हणाले. त्यांच्यावर दंड्याचे प्रहार पडले, पण गुरुजींची मान खाली झुकली नाही.

गुरुजींच्या या तुरुंगातील सत्याग्रहाने इतर राजबंद्यांना बळ मिळाले. तेही या निर्बंधाचा प्रतिकार करायला सज्ज झाले.

गुरुजींमुळे हे घडले, हे लक्षात आल्यावर रोचने गुरुजींनाच छळायला सुरुवात केली. त्यांना सेपरेटमध्ये ठेवले. खटल्यावर बोलावले. त्यांच्यावर फितुरीचा आरोप ठेवला. अंगात गोणपाटाचे टोचरे कपडे-गंजीकपडा-

घालायला दिले. हातापायांत साखळदंडाच्या बेड्या-दंडा-बेडी ठोकली. जेलअंतर्गत, कैद्याला छळायच्या म्हणून ज्या ज्या शिक्षा असतात त्या त्या गुरुजींना भोगाव्या लागल्या. परंतु त्यांनी त्या मोठ्या धैर्याने आणि शौर्याने सहन केल्या. गुरुजींना फटके मारण्याचा दुष्ट विचारही रोचने केला होता. परंतु असे फटके मारले तर सारे राजबंदी बिथरतील आणि जेलची काहीच शिस्त राहणार नाही, असे जेव्हा तेथील काँग्रेसच्या वरिष्ठ पुढाऱ्यांनी रोचला सांगितले, तेव्हा रोचने तो विचार सोडून दिला.

पण लवकरच या राक्षसी वृत्तीच्या रोचची शंभर पापे भरली. बार्डोलीच्या एका युवकाला त्याने मरेमरेतो मारल्याची बातमी बाहेर पसरली. रोचवर खटला झाला आणि त्याला सजा झाली. त्यानंतर नाशिकच्या तुरुंगातील वातावरण बदलले. आधिकारी मऊ वागू लागले.

नाशिकच्या तुरुंगात गुरुजींना स्वामी आनंद यांचा सहवास लाभला. स्वामी आनंद हे गांधीजींच्या परिवारामधले. गांधींजींच्या वर्तमानपत्रांचे मुद्रक-प्रकाशक व व्यवस्थापक स्वामी आनंद यांच्या आग्रहावरूनच गांधींजींनी 'सत्याचे प्रयोग अथवा आत्मकथा' लिहिली. स्वामींनी गुरुजींवर 'भावनामूर्ती' नावाचा लेख गुरुजी गेल्यानंतर १९५० साली लिहिला होता. त्या लेखात त्यांनी गुरुजींच्या नाशिक जेलमधील हृद्य आठवणी लिहिल्या आहेत. स्वामी आनंद लिहितात, " एक दिवस सकाळी अंमलदाराची फेरी पुरी झाली होती. इतक्यात दोन वॉर्डर एका कैद्याला घेऊन आले. दंडा बेडी ठोकलेला तो कैदी नुसत्या बेड्यांच्या घर्षणाने सोलल्या गेलेल्या घोट्यावर आणखी त्रास होऊ नये म्हणून दोन्ही हातांनी बेड्या वर सारण्याचा प्रयत्न करीत होता. जड पावलांनी मोठ्या कष्टाने तो चालला होता. माझ्यासमोर येताच आपल्या त्या सर्व साजशृंगारासह त्याने माझ्यापुढे साष्टांग नमस्कार घातला. मला संकोचल्यासारखे झाले. मी त्याचे बाहू धरून त्याला उठवले. म्हणालो, 'हे काय? या, फार छान झाले तुम्ही आलात. येथे कोणी नाही. सगळे शांत आहे आणि मी तुमचा मित्र आहे.'

" माझी नजर इतका वेळ दंडा बेडीमुळे सोलल्या गेलेल्या त्याच्या घोट्यावर खिळली होती. मी त्यांच्याकडे कुतूहलाने पाहिले. ३०-३२ वर्षाचे वय. ठेंगणा मराठी बांधा. केविलवाणा चेहरा. त्यावर वैष्णव स्त्रियांची विव्हलता. पण डोळे मात्र तेजाचे दोन पुंज! वेधक बुद्धिमत्ता डोळ्यांत जणू मावत नव्हती. मी त्यांच्याकडे पहातच राहिलो. डोळ्यांत नि चेहऱ्यात एवढा फरक! मनात आले, हा कोटीतला पुरुष असावा! ह्या प्राण्याचे नाव साने गुरुजी!

जेलमध्ये शिस्तभंग केल्यामुळे त्याला शिक्षा झाली आहे अशा कैद्यांच्या पत्रलेखन, वाचन, भेटीसाठी इत्यादी सवलती काढून घेतल्या जात. गुरुजी असे रोचच्या दृष्टीने शिस्तभंगाची शिक्षा झालेले कैदी होते. म्हणून त्यांना लिहायला, वाचायला जेलकडून काही मिळत नसे. पण स्वामी आनंद आपल्याजवळील पुस्तके, वह्या, पेन त्यांना देत असत. स्वामीजी लिहितात,

" संध्याकाळी आम्हाला कोठड्यात बंद करीत. त्यापुर्वी ते १२० पृष्ठांची वही मागून घेत. सकाळी मी विचारी, 'काय लिहिलेत' ते सासरहून परतलेल्या एखाद्या नववधूप्रमाणे लाजून एकशे वीस पाने भरलेली वही माझ्या हाती ठेवीत. अक्षरे म्हणजे मोती. प्रत्येक ओळ म्हणजे एकेक मोत्याचा सर! सारी पाने उलटून पाहिली तर एखाद्या ठिकाणी एखादा शब्द की अक्षरही खोडलेले आढळायचे नाही. हिमालयातून बेभान होऊन सहस्रधारांनी बाहेर पडणाऱ्या गंगेप्रमाणे सरस्वती जणू त्यांच्या लेखणीतून वाहू लागे. अक्षरांचा मागोवा घेताना अर्थ, उपमा, काव्य आणि सुभाषिते थकून जात. पाचवीच्या दिवशी त्यांचा प्रारब्ध लेख लिहायला विधात्री आली तो ती काय लिहिते ते पाहण्यासाठी कुतूहलाने सरस्वतीही आली आणि विधात्रीने लिहिलेले वाचून ती इतकी खूष झाली की गुरुजींच्या

बोटांवरच कायमचा ठिय्या तिने दिला. या बोटांतून जे जे काही लिहिले जाई ते ते मराठी वाङ्मयात चिरंजीव होण्याची सनद घेऊनच जणू येत असे."

नाशिकच्या तुरुंगात असताना गुरुजींनी पुष्कळ साहित्यनिर्मीती केली. त्यांच्या ठायीच्या साहित्यसृजनतेला या वेळी भरतीच आली होती!

गुरुजींचे त्यांच्या सर्व साहित्यात चिरसुंदर ठरलेले पुस्तक म्हणजे 'श्यामची आई.' हे पुस्तक म्हणजे मातेच्या महतीचे स्त्रोतच आहे. ' श्यामची आई' वाचताना डोळे ओलावले नाहीत, असा वाचक विरळाच! गुरुजी लिहितात, 'हृदय भरलेलेच असे. भराभरा शाईने कागदावर ओतायचे एवढेच उरलेले असे."

'धडपडणारी मुले' ही त्रिखंडात्मक कादंबरी गुरुजींनी याच वेळी लिहिली. या लेखनाबद्दल ते म्हणतात, " माझ्या मनात ज्या शेकडो कल्पना येत असत. ज्या विचारांची गर्दी उसळे, जी स्वप्ने दिसत, ज्या स्मृती येत, जी दृश्ये आठवत, ज्या व्यक्ती उभ्या रहात त्या सर्वांतून हे पुस्तक तयार झाले आहे. माझ्या मनाच्या समाधानासाठी हे सारे मी लिहीत असे. प्रत्यक्ष सृष्टीत अतृप्त राहिलेल्या शेकडो हृदयांच्या भुका शांत करण्याचा हा एक मार्ग होता... लिहून झाल्यावर याला काय नाव द्यावे, असे मनात असे. प्रस्तावनेत शेकडो ठिकाणी आलेला 'धडपडणारी मुले' हा शब्द माझ्या डोळ्यांसमोर आला व तेच नाव या भारुडाला द्यावे असे मी ठरवले."

इंग्रजी भाषेत सुंदर विचार देणारे कितीतरी साहित्य आहे. एकदा एका खेड्यातले सत्याग्रही धुळे जेलमध्ये असताना विनोबांना म्हणाले होते, 'इंग्रजी आम्हाला येत नाही. आम्ही ते कसे वाचणार?' त्यावर विनोबाजी म्हणाले होते, 'गुरुजींसारख्यांचं हे काम आहे.' विनोबांचे हे शब्द गुरुजींनी निरंतर लक्षात ठेवले होते आणि तुरुंगात असताना जे जे सुंदर असे परभाषेतील पुस्तक त्यांच्या हाती आले, ते ते त्यांनी मराठीत अनुवादित किंवा रूपांतरित करून प्रसिद्ध केले.

नाशिकच्या कारावासातच त्यांनी 'पुनर्जन्म', 'क्रांती व आस्तिक' ह्या कादंबऱ्या, 'निळा पक्षी' हे नाटक, 'विश्राम', 'मोलकरीण', 'शशी' ह्या कथा इत्यादी पुष्कळ विविध प्रकारचे साहित्यही लिहिले. 'पत्री' काव्यसंग्रहातील पुष्कळशा कवितादेखील गुरुजींनी या काळातच लिहिलेल्या आहेत.

साहित्यनिर्मीती अशी उत्साहाने चाललेली होती. तरीदेखील गुरुजींना अधूनमधून उदास, एकाकी वाटे. आशा वेळी 'अश्रू' हाच एकमेव आधारसखा आहे, असे त्यांच्या मनात येई. उदास एकाकीपणात ह्या अश्रूसख्याची तरी सोबत मिळावी, तो तरी कुणी आपल्यापासून हिरावून नेऊ नये, असे त्यांना वाटे आणि अतिआर्तपणाने ते अश्रुसूक्त आळवीत-

*नको माझे अश्रू कधी नेऊ देवा*
*हाच थोर ठेवा माझा एक ॥*
*बाकी सारे नेई धन-सुख-मान*
*परी हे लोचन राखी ओले॥*
*माझे रुप मज अश्रू दावितात*
*हेचि तात-मात प्राणदाते॥*
*अश्रू माझे थोर ज्ञानदाते गुरू*

अनुक्रमणिका

*अश्रू कल्पतरू माझे खरे॥*

'अश्रू' नामक ही कविता गुरुजींच्या 'पत्री' काव्यसंग्रहात असून ती बरीच मोठी आहे. गुरुजींनी अश्रुमहात्म्यच गायलेले आहे. दीन-दलितांच्या अपार करुणेतून स्वामी विवेकानंदांना 'दरिद्रनारायण' हा शब्द स्फुरला. गांधीजींनी तो उचलला. गुरुजींना आपल्या असहाय स्थितीत 'अश्रू-नारायण' हा शब्द स्फुरला. अश्रूतच त्यांना नारायण दिसला. अश्रूंचे सामर्थ्य गुरुजींनी चांगले जाणले होते. वैयक्तिक जीवनातील रडारड करणारे त्यांचे अश्रू नव्हते, तर 'बुडते हे जन न देखवे डोळा' अशा करुणार्द्रतेतून ते आलेले होते.

अश्रूतून अशी चैतन्यशाली स्फूर्ती घेऊन गुरुजी आपले ध्येयजीवन जगत होते. आपले जीवनध्येयदेखील त्यांनी एका गीतात सांगितले आहे.

*करीन सेवा तव मोलवान ।*
*असो अहंकार असा मला न ॥*
*कधी कुणाचे मजला पुसू दे ।*
*जलार्द्र डोळे मग तो हसू दे ॥*
*अनाथ दीनाजवळी वदेन ।*
*सुखामृताचे प्रभु शब्द दोन ॥*

नाशिकच्या कारागृहातून गुरुजी १९३३ सालच्या ऑक्टोबर महिन्यात सुटले. सुटल्यावर ते अंमळनेर या आपल्या कर्मभूमीत आले.

❏

अनुक्रमणिका

## १४. भावनाशील छायाप्रकाश

गुरुजी परत खानदेशात आले. कामाला लागले. पायाची भिंगरी फिरू लागली. खेड्यापाड्यातून वाणी घुमू लागली. याच सुमारास सरकारने कुप्रसिद्ध जातीय निवाडा जाहीर केला. तो जाहीर होताच गांधीजींना अपार वेदना झाल्या. त्यांनी येरवड्याच्या कारागृहात उपोषण आरंभिले. सर्वत्र खळबळ माजली. देशभरचे मोठमोठे नेते येरवड्याला आले. डॉ. आंबेडकरही आले. हिंदू समाजात फूट पाडणाऱ्या ह्या निवाड्याला विरोध केला पाहिजे, असे गांधींचे म्हणणे होते. डॉ. आंबेडकरांशी वाटाघाटी झाल्या. त्याही महापुरूषाने समजूतीने घेतले. ब्रिटिशांचा कुटील डाव ओळखला आणि गांधी-आंबेडकर यांच्यात तडजोड झाली. 'पुणे करार' म्हणून ती ओळखली जाते. गांधीजींनी उपोषण सोडले.

गांधीजींनी " चळवळ चालू ठेवलीच पाहिजे, मात्र ती कायदेभंगाच्या स्वरूपात न ठेवता वैयक्तिक सत्याग्रहाच्या स्वरूपात चालावी, तरच सत्याग्रहाचा स्फुलिंग जिवंत राहील आणि तो जिवंत राहिला तरच पुढे काही पेटण्याची आशा आहे." असे चळवळीच्या संबंधाने आपले मत व्यक्त केले होते. गांधीजींचा हा सल्ला सर्वच देशभक्तांनी मानला. गुरुजींनीही असा सत्याग्रह २६ जानेवारी १९३४ रोजी केला. त्यांना चाळीसगाव तालुक्यात अटक झाली.

मॅजिस्ट्रेटने त्यांना चार महिन्यांची शिक्षा दिली. दिलेला 'ब' वर्ग नाकारून गुरुजींनी धुळे तुरुंगात 'क' वर्ग स्वीकारला. या वेळीही तिथे चक्की पिसली.

या कारावासातही गुरुजींचे लेखन चालूच होते. महर्षी टॉलस्टॉय यांच्या 'What is Art?' या प्रसिद्ध ग्रंथाचा अनुवाद केला. काव्यलेखनही चालू होते.

*विपत्ति ही चित्त-विकास माता ।*
*दुजा नसे सदगुरु बोध-दाता ॥*
*विपत्ति मानीन सदा पवित्र ।*
*विपत्ति माझे घडवी चरित्र ॥*
*विपत्ति मानीन मनी अमोल ।*
*विपत्ति माझे बनवील शील ॥*
*विपत्ति आकार मनास देई ।*
*विपत्ति खोटे भ्रम दूर नेई ॥*

असे एक प्रकारचे 'विपत्ति-स्तोत्र'च त्यांनी या कवितेत गायलेले आहे. 'देवा, तुझी सदैव आठवण रहावी म्हणून आपदाच दे' असा जसा वर कुंतीने श्रीकृष्णाकडे मागितला होता, तशीच ही विपत्तीची मागणी विकासासाठी गुरुजी करीत आहेत.

देशभक्तीप्रमाणेच ईश्वरभक्तीचीही गाणी गुरुजींनी लिहिली आहेत. त्यांचे पुढील प्रसिद्ध गीत याचवेळी लिहिलेले आहे-

*असो तुला देवा । माझा सदा नमस्कार ।*
*तुझ्या दया-मातृत्वाला अंत नाही पार ।*

*तुझ्या कृपेने रे होतिले फुले फत्तराची*
*तुझ्या कृपेने रे होतिले मोती मृत्तिकेची*
*तुझ्या कृपेने रे होतिले सर्व रम्य हार*
*असो तुला देवा । माझा सदा नमस्कार ॥*

*तुझ्या कृपेने रे होईल उषा त्या निशेची*
*तुझ्या कृपेने रे होईल सुधा त्या विषाची*
*तुझ्या कृपेने रे होईल पंगु सिंधुपार*
*असो तुला देवा । माझा सदा नमस्कार ॥*

*तुझ्या कृपासिंधुमधला बिंदु जरि मिळेल*
*तरी प्रभो! शतजन्माची मत्तृषा शमेल*
*तुझे म्हणुनि आलो राया । बघत बघत दार*
*असो तुला देवा । माझा सदा नमस्कार ॥*

गुरुजींच्या जीवनातील छाया-प्रकाश, आशा-निराशा त्यांच्या साहित्यातूनही प्रकट झाल्याशिवाय राहिलेली नाही. ते अतिहळुवार, भावनाशील होते. अत्यंत संवेदनशील मन त्यांना लाभलेले होते. त्यांच्या काव्यातून त्यांच्या वृत्तींचे दर्शन होते, 'येवो वसंतवारा' नावाची अशीच एक सुंदर कविता 'पत्री संग्रहा'त आहे. ही कवितादेखील गुरुजींनी या काळात कारावासातच लिहिलेली आहे-

*नवजीवन प्रदाता । चैतन्य ओतणारा*
*सुकल्यास हासविता । आला वसंतवारा*
*आला वसंतवारा । वनदैन्य हारणारो*
*सुटला सुगंध गोड । भरला दिंगत सारा*
*रानीवनी बहार । आला फुलांफळांस*
*समृद्धी पाहुनिया । आनंद पाखरांस...*

वसंत-स्पर्शाने सारी सृष्टी कशी नटली आहे, नव्या जोमाने उठली आहे, सगळीकडे कसा आनंद भरून राहिला आहे, संगीत कसे भरले आहे, हे सांगता सांगताच एखादी कळ यावी तसे गुरुजींचे कवीमन म्हणते-

*सृष्टीत ये वसंत । परि मन्मनी शिशिर*
*मम जीवनी वसंत । येण्यास का उशीर*
*का अंतरी अजून । नैराश्य घोर राहे*
*का लोचनांमधून । ही अश्रुधार वाहे*

अनुक्रमणिका

परंतु ही नित्याची व्यथाही इथे घडीभराच्याच वस्तीला आलेली आहे. अंतर्मुख होऊन आपली असहायता निवेदिल्यावर पुढे प्रार्थना दिलेली आहे ती आशावंताची —

*मम जीवनात देवा । येवो वसंतवारा*
*गळु देत जीर्ण पर्णे । फुटु दे नवा धुमारा*

आणि असा वसंतवारा जीवनात आल्यावर कसे चैतन्य सळसळले ते पुढील ओळींत व्यक्त झाले आहे-

*फुलतील वाळवंटे । हसतील शुष्क राने*
*नटतील भू उजाड । गातील पक्षी गाणे*
*जरी त्वत्कृपा वसंत । येईल जीवनात*
*चंडोलसा उडेन । संस्फूर्त गीत गात*
*त्वस्पर्श अमृताचा । मजला मृता मिळू दे*
*मम रोमरोमि रामा । चैतन्य संचरू दे*
*आता सदा दयेचा । सुटू दे वसंतवारा*
*फुलू देच जीवनाचा । जगदीश भाग सारा ।*

तुरुंगातील कर्मे करता करता व लिहिता-वाचता चार महिने संपले आणि गुरुजींची धुळे तुरुंगातून १९३४ सालच्या जूनमध्ये सुटका झाली.

❑

अनुक्रमणिका

# १५. भारतीय संस्कृती : अंतरंग दर्शन

धुळे जेलमधून सुटल्यावर गुरुजी अंमळनेरला आले. त्या वेळी तिथे यात्रा सुरू होती. गुरुजींनी यात्रेत गीतेवर प्रवचने दिली. त्याच सुमाराला वरिष्ठ कायदेमंडळाच्या निवडणुका होणार होत्या. काँग्रेसतर्फे श्री. काकासाहेब गाडगीळ आणि श्री केशवराव जेधे उभे होते. गुरुजींनी काँग्रेसच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी पुनश्च खेडोपाडी पायी फिरून पिंजून काढली. 'काँग्रेसला मत म्हणजे स्वातंत्र्याला मत' हे लोकांना तेजस्वी भाषणाने पटवून दिले. आपल्या कर्तव्याचे भान करून दिले. गुरुजींचा पायी फिरण्याचा लोकांच्या मनावर एवढा चांगला प्रभाव पडला की, मोटारीतून प्रचारासाठी येणाऱ्या विरोधकांना ते म्हणत, "ते काँग्रेसचे लोक पायी पायी उन्हातान्हातून येतात, तुम्ही मोटारीतून हिंडता. तुम्हाला का म्हणून आम्ही मत द्यावे?"

काँग्रेसचे दोन्ही उमेदवार निवडून आले. गुरुजींना आनंद झाला.

पुढे विनोबा खानदेशात आले. गुरुजींची भेट झाली. तेव्हा त्यांनी विचारले, " गुरुजी, आता पुढे काय करणार?" गुरुजींनी तरी कुठे काय ठरविले होते? मग विनोबांनीच पूर्व आणि पश्चिम खानदेशाच्या सिमेवर नावरा-नावरी येथे आश्रम काढून दिला. परंतु गुरुजींचे मन तिथे रमेना. एके ठिकाणी बसून तेच तेच कर्मकांड करीत राहण्याचा त्याचा पिंड नव्हता. आश्रमातील यमनियम, कर्मकांड, बांधीलपणा गुरुजींना मानवणारा नव्हता. त्यांचे मन तिथे गुदमरू लागले. म्हणून एके दिवशी कुणाला न सांगताच ते तिथून निघाले नि पुण्यास आले. विनोबांना कळवले. त्या पत्रात असेही लिहिले की, " कुठेतरी देवासाठी जाऊन बसावे, असे मनात येते."

विनोबांनी उत्तर लिहिले, " कुठे जाणार? तीर्थाचे पावित्र्यही राहिले नाही. आणि देव सभोवती नाही का? आजूबाजूचे लोक म्हणजे परमेश्वर, अशी भावन नसती तर मी कधीच हिमालयात निघून गेलो असतो!"

विनोबांच्या पत्राने 'जनीजनार्दन' पाहून 'दरिद्रनारायणाची सेवा करीत राहण्याचे गुरुजींनी ठरविले. पुण्यात ते खानदेशातील मुलांची सेवा करू लागले. अंमळनेरला त्या वेळी कॉलेज नव्हते. त्यासाठी पुण्यात यावे लागे, पुण्यातला खर्च गरीब विद्यार्थ्यांना परवडत नसे. गुरुजींनी अशा चार मुलांच्या शिक्षणास हातभार लावला. एका खोलीत पुण्यास त्या विद्यार्थ्यांसह ते रहात असत. एकदा खानदेशातील मित्र आले. त्या वेळी गुरुजी पंचा नेसून स्वयंपाक करत होते. मित्र चकित झाले. म्हणाले, " गुरुजी, हे काय चालले आहे?" गुरुजींनी सांगितले, " इथे मी मुलांची आई होऊन राहिलो आहे."

जेवू-खाऊ घालून मुले कॉलेजात गेली, म्हणजे आवराआवरीनंतर गुरुजींना दुपारचा वेळ लिहायला मिळत असे. या काळात गुरुजींनी लिहिलेले महत्त्वाचे पुस्तक म्हणजे 'भारतीय संस्कृती'.

साने गुरुजींनी मुलांसाठी उदंड लिहिले. तसेच तरुण-प्रौढांसाठी कादंबऱ्या, कविता, चरित्र आणि रवींद्रनाथ, राधाकृष्णन, भगिनी निवेदिता, टॉलस्टॉय आदी थोरांच्या चिंतनात्मक ग्रंथांचे अनुवादही केले. गुरुजींची 'श्यामची आई' तर महाराष्ट्राच्या घराघरांत गेली. ती सर्वांचीच आई झाली. 'श्यामची आई' या पुस्तकाच्या खालोखाल गुरुजींचे अत्यंत लोकप्रिय असे पुस्तक म्हणजे 'भारतीय संस्कृती' हे होय. भारतीय संस्कृतीचे एवढे सुलभ, सुबोध दर्शन कुणीच घडवलेले नाही. भारतीय संस्कृतीच्या प्रास्ताविकातच गुरुजींनी प्रारंभास म्हटले आहे, " एका सामान्य माणसाने सामान्य जनांकरिता लिहिलेले हे पुस्तक आहे. ह्या पुस्तकात पांडित्य नाही, विद्वत्ता नाही. शेकडो ग्रंथांतील आधार व संदर्भ वचने वगैरे येथे काहीएक नाही. येथे प्राच्यविद्या, विशारदत्व नाही, घनगंभीर, गूढ काही नाही.'' या पुस्तकात एक विशिष्ट दृष्टी मात्र आहे आणि ही दृष्टीच गुरुजींनी या ग्रंथात आपल्या रसाळ आणि

काव्यात्म भाषेत विशद केली आहे. या ग्रंथात काय नाही, या नकाराची मोठी यादी दिल्यानंतर गुरुजींनी या ग्रंथात काय आहे हे मात्र थोडक्यातच पण अत्यंत मार्मिक शब्दात सांगितले आहे. ते म्हणतात, " भारतीय संस्कृतीच्या आत्म्याची येथे भेट आहे. तिच्या अंतरंगाचे येथे दर्शन आहे. भारतीय संस्कृतीच्या गाभाऱ्यात प्रवेश आहे."

या गाभाऱ्यात प्रवेश करताना गुरुजींनी मातृहृदयाच्या जिव्हाळ्याने व वात्सल्याने नवागतांचे हळुवारपणे बोट धरून नेलेले आहे.

'भारतीय संस्कृती' असा शब्दोच्चार आपण उठता-बसता किंवा चालता-बोलता करीत असतो. पण भारतीय संस्कृतीचा नेमका आशय सर्वसामान्यांना क्वचितच ठाऊक असतो. गुरुजींनी हेही ध्यानात धरून या ग्रंथाच्या प्रास्ताविकात आपला हा ग्रंथ लिहिण्यामागील हेतूच स्पष्ट केला आहे. गुरुजी लिहितात, " भारतीय संस्कृती हा शब्दसमुच्चय आपण अनेकदा ऐकतो. 'हे भारतीय संस्कृतीस शोभत नाही,' 'हे भारतीय संस्कृतीस हानिकारक आहे' वगैरे वाक्ये लेखात व भाषणात आपणांस वाचावयास व ऐकावयास मिळतात. अशा वेळेस 'भारतीय संस्कृती' या शब्दांचा अर्थ काय असतो? तिथे भारतीय संस्कृतीचा इतिहास अभिप्रेत नसतो. भारतीय संस्कृतीची एक विशेष दृष्टी तेथे अभिप्रेत असते. ही दृष्टी कोणती? भारतीय संस्कृतीची ही दृष्टी दाखवण्याचा येथे मी प्रयत्न केला आहे."

अशा प्रकारे ज्या धन्याचा हा माल आहे, त्याची कृतज्ञतापूर्वक पावती दिल्यावर भारतीय संस्कृतीची मी पुढे सविस्तर निबंधातून ओळख करून दिलेली आहे, तीच किंवा तिचे वैशिष्ट्यरूप-स्वरूप या प्रास्ताविकातच गुरुजींनी नोंदवून ठेवले आहे, ते असे : " भारतीय संस्कृती हृदय व बुद्धी यांची पूजा करणारी आहे. उदारभावना व निर्मळ ज्ञान यांच्या योगाने जीवनास सुंदरता आणणारी ही संस्कृती आहे. ज्ञान-विज्ञानास हृदयाची जोड देऊन संसारात मधुरता पसरू पाहणारी ही संस्कृती आहे. भारतीय संस्कृती म्हणजे कर्म-ज्ञान-भक्तीचा जिवंत महिमा. शरीर, बुद्धी व हृदय यांना सतत सेवेत झिजवण्याचा महिमा.

" भारतीय संस्कृती म्हणजे सहानुभूती, भारतीय संस्कृती म्हणजे विशालता, भारतीय संस्कृती म्हणजे सत्याचे प्रयोग, भारतीय संस्कृती म्हणजे स्थितिशील न रहाता सारखे ज्ञानाचा मागोवा घेत पुढे जाणे. जगात जे जे काही सुंदर, शिव व सत्य दिसेल ते ते घेऊन वाढणारी ही संस्कृती आहे. जगातील सारे ऋषीमहर्षी ती पुजील. जगतील सर्व संतांना ती वंदील. जगातील सर्व धर्मसंस्थापकांना ती आदरील. मोठेपणा कोठेही दिसो, भारतीय संस्कृती त्याची पूजा करील. आदराने व आनंदाने त्याचा संग्रह करील.

" भारतीय संस्कृती संग्राहक आहे. ती सर्वांना जवळ घेणारी आहे.

" सर्वेषां विरोधनं ब्रह्मकर्म समारभे असे म्हणणारी ती संस्कृती आहे. संकुचितपणाचे वावडे असणारी ही संस्कृती आहे आणि म्हणूनच भारतीय संस्कृती म्हणताच माझे हात जोडले जातात. भारतीय संस्कृती म्हणताच सागर व अंबर या दोन महान वस्तू माझ्या डोळ्यांसमोर उभ्या राहतात. प्रकाश व कमळ या दोन दिव्य वस्तू डोळ्यांसमोर उभ्या राहतात. त्याग, संयम, वैराग्य, सेवा, प्रेम, ज्ञान, विवेक या गोष्टी आठवतात. भारतीय संस्कृती म्हणजे सान्तातून अनंताकडे जाणे, अंधारातून प्रकाशाकडे जाणे, भेदातून अभेदाकडे जाणे. चिखलातून कमळाकडे जाणे, विरोधातून विकासाकडे जाणे. विकारातून विवेकाकडे जाणे, गोंधळातून व्यवस्थेकडे जाणे, आरडाओरडीतून संगीताकडे जाणे. भारतीय संस्कृती म्हणजे मेळ, सर्व धर्मांचा मेळ, सर्व जातींचा मेळ, सर्व ज्ञानविज्ञानांचा मेळ, सर्व काळांचा मेळ. अशा प्रकारचा महान मेळ निर्माण करू पाहणारी, सर्व मानवजातीचा मेळा मांगल्याकडे घेऊन जाऊ

पाहणारी अशी जी थोर संस्कृती तिचाच लहानसा निदान मानसिक तरी उपासक मला जन्मोजन्मी होऊ दे, दुसरी कोणतीही इच्छा मला नाही."

साने गुरुजींच्या मनीमानसी भारतीय संस्कृतीची अमूर्त अशी मूर्तीस्थापना कशा प्रकारची झालेली होती व ज्या मांगल्याचा ध्यास त्यांनी आपल्या हृदयाशी आयुष्यभर जतन केला होता. तोही कशा प्रकारचा होता, हे त्यांच्या शब्दाशब्दांतून सहज सुंदर, सुलभपणे प्रकट झालेले आहे.

या पुस्तकात गुरुजींनी अव्दैत बुद्धी, वर्ण, कर्म, भक्ती, ज्ञान, संयम आदी विषयांवर सुबोध सुंदर निबंध लिहिलेले आहेत.

समाजपुरुषाची कर्ममय पूजा करणारे सर्व श्रमजीवी लोक भारतीय ऋषींना कसे वंदनीय वाटत होते, हे गुरुजींनी रूद्रसूक्तातील सूक्तांचा दाखला देऊन पटवून दिले आहे-

*'चर्मकारेभ्यो नमो, रथकारेभ्यो नमो, कुलालेभ्यो नमो।*

अरे चांभारा, तुला नमस्कार, अरे सुतारा तुला नमस्कार, अरे कुंभारा तुला नमस्कार. हे सारे श्रमजीवी त्या थोर ऋषीला वंद्य वाटत आहेत. तो चांभाराला अस्पृश्य मानीत नाही. कुंभाराला तुच्छ लेखीत नाही. समाजाला जिवंत विचार देणाऱ्या विचार-द्रष्ट्यांइतकीच मडकी देणाऱ्यांचीही तो योग्यता मानीत आहे.

*"There is nothing great or small in the eyes of God."*

कर्ममय भक्तीचा महिमा वर्णन करताना गुरुजी सहज लिहून जातात-

*एक हात भू नांगरणे*
*शत व्याख्यानांहुन थोर*
*एक हात खादी विणणे*
*मंत्र जपाहुन ते थोर*

*एक वस्त्र वा रंगविणे*
*तव पांडित्याहुन थोर*
*शेतकरी, तसे विणकारी, तसे रंगारी बना देशाचे*
*आळशी न कुणी कामाचे, यापुढे*

*एक नीट मडके करणे*
*तव व्याख्यानाहुन थोर*
*एक नीट जोडा शिवणे*
*तव श्रीमंतीहुन थोर*

*चाकास धाव बसविणे*

अनुक्रमणिका

*तव विद्वतेहून थोर*
*कुंभार, तसे चांभार, तसे लोहार बना देशाचे*
*आळशी न कुणी कामाचे, यापुढे॥*

गुरुजींनी घडवलेले भारतीय संस्कृतीचे दर्शन असे दिव्य, भव्य आणि कर्ममय आहे.

याच सुमारास गुरुजींनी आणखी एक मोठे वाङमयीन कार्य पार पाडले आणि ते म्हणजे मराठी लोकसाहित्यातील स्त्रीधनाची जपणूक. 'ज्यात्यावर बसले की ओवी सुचते' अशी म्हणच रूढ झाली आहे. कितीतरी मायबहिणींनी दळताना, कांडताना अगणित ओव्या रचलेल्या आहेत. त्यात भावा-बहिणींच्या, लेकी-सुनांच्या, माय-लेकरांच्या, सुख-दुःखाच्या, लग्नकार्याच्या, शेत-मळ्याच्या, गाई-गुरांच्या सणावारांच्या कितीतरी विषयांवरच्या ओव्या आहेत. अक्षराशी ज्यांनी ओळखही नाही आणि काव्यशास्त्र ज्यांना ठाऊकही नाही, अशा खेड्यापाड्यांतील ग्रामीण भगिनींनी आपल्या अनुभवातून, जीवनातून हे अस्सल, जिवंत वाङ्मय निर्मिलेले आहे. गुरुजी म्हणतात, " ज्या वाङ्मयात स्त्रियांनी आपला आत्मा संपूर्णपणे ओतला आहे, असे वाङ्मय म्हणजे ओवी वाङ्मय. या ओव्या सहजस्फूर्तीने रचल्या गेल्या आहेत. त्यातील अकृत्रिम सह्रदयता अपूर्व आहे. या ओव्यात वत्सलतेचा सिंधू आहे. कोठे कोठे विनोदाची सुंदर छटाही आहे. इतरही रस आहेत."

रामची आई, आक्का, मावशी आणि इतरही स्त्रियांकडून गुरुजींनी या ओव्या टिपून घेतल्या. त्या निवडल्या, पाखडल्या, त्यांचे वर्गीकरण केले आणि सुंदर रसग्रहणासोबत 'स्त्री-जीवन' या नावाने त्या पुस्तकरूपाने प्रसिद्ध केल्या. लोकसाहित्याची जमवाजमव आणि निवड करून ते प्रसिद्ध करणे, हे फार मोलाचे काम गुरुजींनी केले आहे.

गुरुजींना अशा प्रकारे ओव्या जमविण्याचा छंद आहे म्हणून पालगड या त्यांच्या जन्मगावी जेव्हा त्यांनी गीताप्रवचने दिली, तेव्हा समारोपाच्या वेळी गावातल्या एका आजीबाईंनी तिथेच एक ओवी रचून, गुरुजींचे नाव गोवून म्हटली-

*पालगडच्या गणपतीला ।*
*बेदाण्याचा आवडे शिरा ।*
*कॉंग्रेसमध्ये शोभे हिरा ।*
*पंढरीनाथ ॥*

❑

अनुक्रमणिका

# १६. किसान-कामगारांचे कैवारी

काँग्रेसचे ५० वे सुवर्ण महोत्सवी अधिवेशन महाराष्ट्रात आणि तेही फैजपूरसारख्या खानदेशातील एका खेड्यात घेण्याचे ठरले होते. अधिवेशनासाठी देशातून हजारो लोक व मोठे नेते येणार, तेव्हा पिण्याच्या पाण्यापासून ते सर्वांचे रहाणे-जेवणे, स्वच्छता, सभामंडप अशा सर्वच गोष्टी कराव्या लागणार होत्या आणि त्यासाठी खर्चही बराच येणार होता. काँग्रेसचे विरोधक तर म्हणून लागले होते, " फैजपूरचे फजितपूर होणार।"

गुरुजी त्या वेळी पुण्यात होते. पण त्यांना जेव्हा ही वार्ता कळली तेव्हा ते अस्वस्थ झाले. 'खानदेशात काँग्रेस येत असता मी का इथे राहू?' असे म्हणून ते निघाले आणि फैजपूरला दाखल झाले.

फैजपूरला 'टिळक नगर' बसवण्याची तयारी चाललेली होती. गुरुजी आले आणि त्यांनी तुफानी प्रचाराचे काम हाती घेतले. गुरुजींची वाणी खेड्यापाड्यांतून दुमदुमू लागली. गाणी, भाषणे यांचा त्यांनी नुसता पाऊस पाडला! उन-वाऱ्याची किंवा आपल्या शरीराची त्यांनी पर्वाच ठेवली नव्हती. बघता बघता त्यांच्याभोवती तरुणांची सेना उभी राहिली. पदयात्रेने गुरुजींनी गावनगाव टिपले. स्वयंसेवक मिळवले. निधीही जमा केला.

गुरुजींच्या प्रेरणादायी वक्तव्याने घराबाहेर न पडणाऱ्या भगिनीही पथक स्थापून गावोगावी निघाल्या. सारा खानदेश काँग्रेसच्या पाठीशी उभा राहिला.

*भारतमाता माझी लावण्याची खाण ।*
*गाइन तिचे गान, मी गाइन तिचे गान ॥*

गुरुजी अशी स्वरचित गाणी म्हणत असत आणि सांगत असत, " फैजपूरला चला. काँग्रेसची गंगा आपल्या घरात आली आहे. आपल्या देशाचे मोठेमोठे पुढारी येणार, गांधीजी येणार, त्यांच्या दर्शनाला आणि त्यांचे विचार ऐकायला फैजपूरला चला. फैजपूरला जाऊ नका म्हणून पोलीस पाटील सांगतील पण त्यांचे ऐक नका... आपली काँग्रेसमाता आपल्या घरी येत आहे. तिच्या स्वागताला आपण फैजपूरला नाही येणार?"

गुरुजींच्या या भावनाशील कळकळीच्या आवाहनाला लोकही तेवढ्याच उत्साहाने प्रतिसाद देत असत. गुरुजींचा विनोबांशी या वेळी पुन्हा निकटचा संबंध आला. खेड्याखेड्यांतून गुरुजी भाषणे देत फिरत होते. मन चैतन्यपूर्ण होते, पण शरीर थकून जायचे. बोलून बोलून गुरुजींचा घसा बसायचा. दुखायचा. विनोबा हे सारे पहात होते. मग ते गुरुजी येण्याची वाट पहात थांबायचे. रात्री कधीतरी गुरुजी यायचे. विनोबा त्यांना गाईचे तूप आणि थोडे मीठ घालून ते गरम पाणी प्यायला द्यायचे. गुरुजींचा घसा दुसऱ्या दिवशीच्या प्रचारासाठी मोकळा होई.

१९३६ चा डिसेंबर महिना होता. थंडीचा कडाका वाढू लागला. गुरुजी पहाटे उठले. प्रार्थना झाली. कुणीतरी शेकण्यासाठी निखाऱ्याने रसरसलेली शेगडी विनोबांपुढे आणून ठेवली. गुरुजी लांबच बसलेले. कुडकुडत. विनोबा शेगडी घेऊन त्यांच्याजवळ आले. हसत हसत म्हणाले, " महंमद पर्वताकडे आला नाही, तर पर्वतानेच महंमदकडे गेले पाहिजे!" गुरुजी संकोचून गेले.

अधिवेशनाचे दिवस जवळ येऊन ठेपले. बाहेरचे लोक येऊ लागले. प्रचार थांबला. गुरुजींनी हातात झाडू घेतला. अप्पासाहेब पटवर्धन यांच्या नेतृत्वाखालील सफाई पथकात सामील झाले. सफाईचे काम गुरुजींना फार आवडे. त्यांनीच म्हटले आहे. “ लेखणीच्या लालित्यापेक्षा मला झाडूचे लालित्य प्रिय आहे.”

अधिवेशनाच्या आधी कुणीतरी तरुणांनी गुरुजींना स्वागताध्यक्ष करावे असे म्हटले होते. पण गुरुजींना ते पसंत पडले नाही. स्वागताध्यक्ष होऊन भाषण करण्यापेक्षा त्यांना हे सफाई कार्य अधिक मनापासून प्रिय होते.

२७-२८ डिसेंबर १९३६ असे दोन दिवस अधिवेशन झाले. अध्यक्षपदी पं. जवाहरलाल नेहरू होते. गांधीजी, राजेंद्रप्रसाद, वल्लभभाई पटेल, मालवीय आदी नेत्यांची भाषणे झाली. अधिवेशन अत्यंत उत्साहाने, आनंदाने पार पडले. यशस्वी झाले. ‘फैजपूरचे फत्तेपूर झाले!’ या यशासाठी इतरांबरोबरच गुरुजींनी अपार श्रम घेतले होते.

फैजपूरचे फत्तेपूर झाले आणि पुढे विधीमंडळाची निवडणूक आली. काँग्रेसने या निवडणुका लढवण्याचे ठरविले होते. गुरुजींनी यावेळी उभा खानदेश हीच आपल्या प्रचाराची समरभूमी मानली होती. खानदेशच्या भूमीत काँग्रेस विजयी झाली पाहिजे. यासाठी गुरुजी पुन्हा सर्व शक्तीनिशी सिद्ध झाले. गावोगाव हिंडून भाषणे देऊ लागले.

“ मी तुमचा उत्साह पाहून पवित्र होण्यासाठी आलो आहे. तुम्ही जागे आहात पण तेवढ्याने भागणार नाही. सर्वांना जागे केले पाहिजे.

“ तुम्ही उठा व दुसऱ्यांना उठवा. स्वतः पेटा व दुसऱ्यांना पेटवा, स्वयंसेवकांच्या हातात झेंडे द्या. आजूबाजूच्या गावांतून हिंडा. काँग्रेसचा सर्वत्र जयजयकार करा.”

अशी भाषणे गुरुजी देऊ लागले. अशी गाणीही गाऊ लागले.

*मतदार बंधू, तुम्ही काँग्रेसला मते सारे द्या रे*
*काँग्रेस सदा मरे, तुमच्यासाठी झुरे*
*तुमच्यासाठी ती लाठ्याही खाय रे ॥*

निवडणूक संपली. प्रांतात काँग्रेसला बहुमत मिळाले. ना. बाळासाहेब खेर मुख्यमंत्री झाले. प्रांतात काँग्रेसचे मंत्रिमंडळ राज्य करू लागले. गुरुजी आपल्या कर्तव्यकर्मात बुडून गेले.

खानदेशात अंमळनेर, धुळे, जळगाव व चाळीसगाव येथे कापडगिरण्या आहेत. गिरण्यातील कामगारांचे गिरणीमालक शोषण करीत होते. ना भरपूर पगार, ना रहायला जागा. कामगारांत असंतोष धुमसत होता. कामगार संघटनेची न्याय हक्कासाठी लढा देण्याची तयारी चाललेली होती. अंतरीच्या कळवळ्याने गुरुजी त्या लढ्यात उतरले. ‘पगारवाढ ताबडतोब’ अशा घोषणांनी अंमळनेर, जळगाव, धुळे, चाळीसगाव ही सारे शहरे दणाणली. गुरुजींनी पुन्हा आपल्या शक्तीनीशी झुंज घेतली. कामगारांची मागणी मान्य झाली. कामगारक्षेत्रात उतरून गुरुजींनी भांडवलशहांशी दिलेला हा पहिला लढा यशस्वी झाला.

अनुक्रमणिका

८ एप्रिल १९३८ रोजी हा लढा संपला. त्या आधी दोनच दिवस म्हणजे ६ एप्रिल १९३८ रोजी गुरुजींच्या 'काँग्रेस' पत्राचा जन्म झाला होता. प्रचारासाठी अशा पत्राची गुरुजींना फार आवश्यकता वाटू लागली होती. कितीतरी प्रश्न होते. त्यावर लिहिणे आवश्यक होते. गुरुजींनी पैशाची कशीबशी तुटपुंजी जुळणी केली होती. काँग्रेस साप्ताहिक दर सोमवारी अंमळनेरहून प्रसिद्ध होऊ लागले. गुरुजी त्यासाठी रात्र रात्र जागून लिहून देत असत. दिवसभर इतर संघटनांची कामे चालत. खेड्यापाड्यांत जात असत. साप्ताहिक काढले, पण आर्थिक ओढाताण फार होऊ लागली. खप आणि खर्च यांचा मेळ जमेना. पण साप्ताहिकासाठी गुरुजी आपल्या सहकाऱ्यांच्या शहराच्या निरनिराळ्या भागांत झोळी घेऊन भिक्षा मागत असत. या वेळी म्हणण्यासाठी गुरुजींनी श्लोकही केला होता.

*आम्ही सात वारातुनी एक वारी ।*
*असे येत जाऊ तुमच्याच दारी ।*
*विनंती अशी एक आहे तुम्हाला*
*स्वदेशार्थ भिक्षा घाला आम्हाला ॥*

यावेळी 'काँग्रेस' पत्राचे अंकही खपवीत असत. दारुबंदी, साक्षरता, अस्पृश्यता निवारण, सफाई, काँग्रेसचा संदेश, स्थानिक प्रश्न अशा अनेक विषयांवर गुरुजी लिहित असत. किसान-कामगारांच्या गाऱ्हाण्यांना, अन्यायाला वाचा फोडीत असत.

त्याच सुमारास असेच एक टोल-टॅक्सचे प्रकरण उद्‌भवले होते. अंमळनेरच्या म्युनिसिपालिटीने खेड्यापाड्यांतून येणाऱ्या बैलगाड्यांवर टोल-टॅक्स लागू केला होता. त्यामुळे गरीब शेतकऱ्यांना भुर्दंड पडणार होता. आधीच हलाखीची स्थिती. गुरुजींना हा टॅक्स अन्यायी आहे असे वाटले व त्यांनी त्याविरुद्ध 'काँग्रेस' साप्ताहिकात जोरदार टीका केली. हा टॅक्स रद्द करावा अशी मागणी केली. म्युनिसिपालिटीने दाद दिली नाही, तेव्हा त्याविरुद्ध चळवळ करण्याची तयारी गुरुजींनी सुरू केली. त्यामुळे टॅक्स रद्द झाला. पण गुरुजींवर वरिष्ठ काँग्रेसवालेच रूष्ट झाले. 'आपले मंत्रिमंडळ असताना अशा चळवळी करू नयेत' असे त्यांचे म्हणणे होते. गुरुजींचे त्यावर म्हणणे असे की, " देवाजवळही आपण हट्ट धरतो, गाऱ्हाणी मांडतो; मग काँग्रेस-मातेकडे प्रार्थना केली तर गुन्हा कसा ठरतो?गरिबांना न्याय मिळालाच पाहिजे."

गुरुजींनी अशा प्रकारे अनेक तऱ्हेच्या अन्यायांना निर्भयपणे वेशीवर टांगले.

परंतु 'काँग्रेस' साप्ताहिकाची आर्थिक स्थिती काही ठीक नव्हती. गुरुजींना सारखी चिंता करावी लागे. तशातच एका लेखाबद्दल गुरुजी व प्रेसकडून सरकारने रोख रकमेचा जामीन मागितला. गुरुजींनी नाईलाजाने साप्ताहिक बंद करण्याचा निर्णय घेतला. 'काँग्रेस' साप्ताहिक जवळ जवळ दोन वर्षे चालले होते.

मध्यंतरी धुळ्याच्या गिरणीकामगारांवर उपासमारीचे संकट उद्‌भवले होते. गिरणीमालकांनी कामगारांच्या मागण्या मान्य केल्या नाहीतच, परंतु गिरणीलाही कुलपे ठोकली. गिरणी बंद ठेवल्याने अनवस्था प्रसंग निर्माण झाला. गुरुजींनी या लढ्यात लक्ष घातले. वाटाघाटीचे सर्व मार्ग संपल्यावर व मालक हटवादी भूमिका सोडीत नाहीत असे पाहिल्यावर गुरुजींनी १३ सप्टेंबर १९३९ रोजी दुपारी बारापर्यंत गिरणीचे दरवाजे उघडले नाहीत तर तापी नदीत जलसमाधी घेण्याची घोषणा केली. ही बातमी सर्वत्र पसरली आणि मोठी खळबळ माजली. धुळे

अनुक्रमणिका

शहरातील वातावरण फारच तापले. गुरुजींच्या साहाय्याला सेनापती बापटही धावले. त्यामुळे पुन्हा वाटाघाटी होऊन गिरणीमालकांनी माघार घेतली. कामगारांवरचे संकट दूर झाले. गुरुजींनी हाही लढा जिंकला!

त्याच वर्षी १९३९ साली पूर्व खानदेशात बरीच अतिवृष्टी झाली. शेतातले पीक बुडाले. ओल्या दुष्काळामुळे शेतकऱ्यांवर हलाखीची स्थिती आली. ठिकठिकाणांहून हलाखीच्या बातम्या येऊ लागल्या. गुरुजी अस्वस्थ झाले. काँग्रेस कमेटीने पाहणी करून चार आणेसुद्धा पीक नाही, असा अहवाल दिला होता.

अशा परिस्थितीत सरकारने शेतकऱ्यांकडून शेतसारा वसूल करू नये, सारामाफी द्यावी, अशी मागणी गुरुजींनी एका कामगार परिषदेत ठरावाद्वारे केली होती. कलेक्टरलाही ही मागणी कळवली होती. शेतकऱ्यांच्या गाऱ्हाण्यांना वाचा फोडण्यासाठी व शेतसारा माफ करून घेण्यासाठी जिल्ह्यात ठिकठिकाणी किसानपरिषदा भरविण्याचे ठरले. गुरुजींच्या पायांना पुन्हा पंख फुटले. ते सर्वत्र फिरू लागले. एका गावातील सभेत त्यांनी " येत्या २६ जानेवारीला स्वातंत्र्यदिनी पूर्व खानदेशातल्या हजारो शेतकऱ्यांचा मोर्चा जळगावला कलेक्टर कचेरीवर नेऊया; त्यासाठी तयार रहा!" अशी हाक दिली.

गुरुजींची ही हाक सर्व जिल्हाभर पोहोचली. १९३९ च्या जानेवारीत गुरुजी वाऱ्यासारखे जिल्हाभर फिरले. बोलले. या झंझावाती दौऱ्यात काही तरुणही बरोबर असत. याही वेळी गुरुजींनी प्रचारासाठी स्फूर्तिदायक गीते लिहिली होती. त्या वेळी पुढील किसानगीत फारच प्रसिद्ध झाले होते –

*येथून तेथून सारा पेटू दे देश, पेटू दे देश ॥*
*कोटि कोटि आता उठु दे किसान*
*निर्भयपणे अपुली उंच करा मान*
*मुक्तकंठे गावो स्वातंत्र्याचे गान*
*नष्ट करू आता आपले सारे क्लेश ॥*

*कमवता तुम्ही, गमवता कसे*
*सिंह असुन तुम्ही, बनलात रे ससे*
*तेजे उठा आता, पडा ना असे*
*माणसे बना आता, बनु नका मेष ॥*

*रात्रंदिवस तुम्ही करीतसा काम*
*जीवनात तुमच्या उरला नाही राम*
*घाम गळे तुमचा, हरामाला दाम*
*येवो आता तुम्हा थोडा तरी त्वेष ॥*

*मोर्चे काढा आता निघु दे फौजा*
*लुटारूंच्या आता थांबवू या मौजा*
*चालू देणार नाही कोणाच्या गमजा*
*कोटि किसानांचा फणा करी शेष ॥*

'आता उठवू सारे रान' हे दुसरे स्फूर्तिगीतही या किसान मोर्चासाठीच गुरुजींनी रचले होते-

*आता उठवू सारे रान । आता पेटवू सारे रान ।*
*शेतकऱ्यांच्या राज्यासाठी लावू पणाला प्राण ॥*
*किसान मजूर उठतील ।*
*कंबर लढण्या कसतील ।*
*एकजुटीची मशाल घेऊनि पेटवतिल हे रान ॥*
*कोण अम्हा अडवील?*
*कोण अम्हा रडवील ?*
*अडवणूक करणाऱ्यांची उडवू दाणादाण ॥*
*शेतकऱ्यांची फौज निघे ।*
*हातात त्यांच्या बेडी पडे ।*
*तिरंगी झेंडे घेती, गाती स्वातंत्र्याचे गान ॥*
*पडून ना राहू आता ।*
*खाऊ न आता लाथा ।*
*शेतकरी , कामकरी मांडणार हो ठाण ॥*

ही गाणी त्या वेळी साऱ्या खानदेशात खेड्यापाड्यांत घुमत होती, तिथून पुढे ती महाराष्ट्रभर पसरली. सुमारे तीन आठवडे असा धुवाधार प्रचार करीत गुरुजी सर्वत्र हिंडले. गावोगावचे लोक उठले. २३-२४ जानेवारीपासूनच गावोगावचे शेतकरी तिरंगी झेंडे फडकावीत जळगावच्या वाटेला लागले. वाटेतल्या गावात ते थांबत. प्रचार करीत. मग ती गावे त्याच्यांत मिसळत आणि किसानगंगेचा हा प्रवाह पुढे जाई. दाही दिशांनी असे प्रवाह येऊ लागले. पंढरीला जाणाऱ्या वारकऱ्यांप्रमाणे भाकरी बांधून घेऊन. तशाच निष्ठेने क्रांतीची गाणी गात, घोषणा देत खानदेशचे शेतकरी जळगावला आले. इतस्ततः विखुरलेला शेतकरी औद्योगिक कामगारांप्रमाणे संघटित नव्हता, त्यांची संघटना बांधणेही अवघड होते; परंतु गुरुजींनी हे महान कार्य करून दाखवले. केवळ पुरुषच नाही, तर शेतकरी महिलाही या वेळी पुढे सरसावल्या होत्या. गुरुजींचे गाणे गात होत्या-

*किसानांच्या बाया आम्ही शेतकरी बाया*
*नाही आम्ही रहाणार आता दीनवाणी गाया*
*दीनवाणी गाया ॥*
*सरकारला सांगू आम्ही*
*सावकाराला सांगू आम्ही*
*पोराबाळां हवे आमच्या पोटभर खाया*
*पोटभर खाया ॥*
*आजवरी खाल्ल्या लाथा*
*आता करू वर माथा*
*लुटारूंची दुनिया आता पडेल अमुच्या पाया*
*पडेल अमुच्या पाया ॥*
*अडाणी न राहू कोणी*
*साऱ्या आम्ही होऊ ज्ञानी*
*ज्ञान हवे जरी हवी दीनदशा जाया*
*दीनदशा जाया॥*

अनुक्रमणिका

*कडेवरी मुले घेऊ*
*क्रांतीमधी सामील होऊ*
*लाठी खाऊ, गोळी खाऊ, अर्पू अमुची काया*
*अर्पू आमची काया ॥*

किसान स्त्री-पुरुष आपल्या गाऱ्हाण्याची दाद लावून घेण्यासाठी एवढ्या निर्भयपणाने असे संघटित यापूर्वी कधी झाले नसतील! गुरुजींनी ही किमया करून दाखवली होती. मुक्यांना वाचा दिली होती. स्वातंत्र्य मिळवण्याच्या वाटचालीत एक ठोस पाऊल पुढे टाकले होते. सच्चा देशभक्ताला याचा केवढा अभिमान वाटायला हवा होता! आनंदाचे भरते यायला हवे होते! परंतु राज्यातले तथाकथित काँग्रेस श्रेष्ठी गुरुजींवर मात्र नाराज झाले. “आपलेच मंत्रीमंडळ असताना हा मोर्चा? हा उठाव? शिव शिव! अब्रह्माण्यम!” असे एखाद्या सनातन्यासारखे त्यांना वाटू लागले. ‘पेटू दे देश, पेटू दे देश, येथून तेथून सारा पेटू दे देश’ या स्फूर्तिगीताबद्दलही केवढे आक्षेप! हिंसा-अहिंसेचे नसते प्रश्न उपस्थित केले आणि मोर्च्याला विरोध करण्यासाठी हे महाभाग सरसावले. केवढे दुर्दैव! पक्षनिष्ठासुद्धा अशी अंधळी असते. आपल्या सत्तेने केलेला अन्यायदेखील न्याय्य वाटू लागतो. त्याच्या समर्थनार्थ विद्वता राबवली जाते.

गुरुजींची अमाप लोकप्रियता सहन होणे अहंकारी नेत्यांना शक्य नव्हते. त्यांनी त्यांच्या या कार्यात अडथळे आणले. ज्यांना निवडून देण्यासाठी गुरुजींनी जिवाचे रान केले होते, तेच आमदार वगैरे लोक विरोधासाठी पुढे सरसावले. गुरुजींना मिळवायचे काहीच नव्हते. त्यांना याचे फार वाईट वाटले. श्रेष्ठांनी मोर्चा रद्द ठरविला आणि जळगाव गावात किसान परिषद घेण्यात आली. शेतकऱ्यांच्या मागणीवरूनच गुरुजींना परिषदेत बोलू दिले. गुरुजींचे अत्यंत प्रभावी असे भाषण त्या वेळी झाले. खानदेशी हृदयात साने गुरुजींना एखाद्या मातृदैवतासारखे स्थान मिळाले होते.

❏

## १७. कर्मयज्ञ

'काँग्रेस' साप्ताहिकाचे प्रकाशन मार्च १९४० मध्ये थांबल्यानंतर गुरुजी काही दिवस बडोदा येथे मावशीकडे जाऊन राहिले. प्रकृती बरी नव्हती. मनही अशांत होते. पण त्या तीन-चार आठवड्याच्या काळातही त्यांनी काही लेखन केले. अर्धवट राहिलेली पुस्तके पूर्ण केली. नंतर ते अंमळनेरला आले. त्याच वेळी अंमळनेरच्या गिरणीकामगारांच्या महागाईभत्त्याचा प्रश्न उद्‌भवलेला होता. युरोपात दुसरे महायुद्ध भडकले होते आणि त्याची झळ सर्व जगाला लागलेली होती. हिंदुस्थानातही वस्तूंचे, धान्याचे भाव एकसारखे वाढत होते. तुटपुंज्या पगारात गरीब कामगारांना संसाराचा गाडा ओढणे बिकट होऊन बसले होते. त्यामुळे मुंबई प्रांतातल्या कामगार संघटनांनी महागाईभत्त्याची मागणी केली होती. ती न्याय्य होती. पण गिरणीमालकांनी ताठर भूमिका घेतलेली होती. ते ही मागणी मान्य करायला तयार नव्हते. म्हणून संपाचे हत्यार उपसणे कामगारांना भाग पडले होते. कामगारांवर अन्याय होत असताना, त्यांची उपासमार होत असताना गुरुजी स्वस्थ कसे बसणार? अंमळनेरचा गिरणीकामगार संघ तर त्यांचाच. 'संयुक्त खानदेश कामगार फेडरेशन'ची स्थापना गुरुजींच्याच प्रेरणेने झालेली होती. गुरुजी पुढे सरसावले.

धुळे-अंमळनेर येथे जाहीर सभा होऊ लागल्या. वातावरण तापू लागले. 'वेळ आलीच तर संपास तयार रहा' गुरुजी कामगारांना सांगू लागले. शेकडोंच्या संख्येने कामगार मंडळी त्यांच्या सभांना येत असत. गुरुजी त्यांनाही सांगत असत, " नुसते ऐकायला रोज येऊन बसू नका, तर ऐकता ऐकता सूत काता. उद्यापासून मला सभेत दोन अडीचशे तरी टकळ्या फिरताना दिसल्या पाहिजेत. आपण आपला लढा अशा विधायक मार्गाने लढला पाहिजे. अशा रीतीने आपण आपला लढा स्वावलंबनानेही चालवू शकू आणि गिरणीमालकांना नमवू शकू, अशी माझी खात्री आहे."

न्यायासाठी लढा लढवीत असतानादेखील त्यातील विधायक व स्वावलंबी दृष्टी सुटलेली नव्हती, हे गुरुजींचे वैशिष्ट्य होते. इतर कामगार पुढाऱ्यांप्रमाणे ते कामगारांना केवळ हक्कासाठीच लढायला भडकवीत नव्हते तर आपल्या कर्तव्यांची जाणीवही देत होते.

शेवटी तडजोड झाली; संप करण्याची पाळीच आली नाही.

मध्यंतरी काँग्रेसची सभासदनोंदणी सुरू झाली होती. परंतु त्या कामाला यावी तशी गती मिळालेली नव्हती. गुरुजींनी अशी गती देण्यासाठी आपण उपोषण करावे, असे ठरविले. त्या वेळी त्यांनी काढलेल्या पत्रकात म्हटले होते, " काँग्रेस आज राष्ट्रासाठी स्वातंत्र्य मागत आहे. कदाचित पुन्हा लवकरच लढा सुरू होईल. अशा वेळी काँग्रेसला लाखो लोकांचा पाठिंबा आहे, ही गोष्ट पुन्हा एकदा जगजाहीर झाली पाहिजे. बहुजन समाजाच्या मनात काँग्रेसविषयी आस्था आहे, आपलेपणा आहे. आपण शहरातून व खेड्यांतून जाऊ तर लाखो सभासद होतील. हजारो तरुणांनी, शेतकऱ्यांनी, कामकऱ्यांनी, विद्यार्थ्यांनी सर्वत्र हिंडून महाराष्ट्रात दोन लाख सभासद या वर्षी करावेत. अशी प्रचंड मोहीम जर महाराष्ट्रात सुरू झाली तर केवढे चैतन्य निर्माण होईल! लहानशा केंद्रीभूत कर्मातून शक्तीचा सिंधू निर्माण होतो. उद्या लढा असलाच तर हे उत्पन्न होणारे चैतन्य किती कामास येईल बरे!

" माझ्या मनात हे विचार घोळत होते. काय करावे? सुचेना. आपल्या मनातील संकल्प पुरा व्हावा तर त्यासाठी देवाला आवळणे हाच एक उपाय मजजवळ आहे. मी माझ्या देवाला म्हटले, देवा! उद्या ११ तारखेपासून

३१ ऑगस्ट १९४० पर्यंत मी केवळ पाणी घेऊन राहीन. १ सप्टेंबर १९४० रोजी पारणे करीन. महाराष्ट्रात दोन लाख काँग्रेस सभासद करण्याची लहान-थोरांस, गरीब-श्रीमंतांस, किसान-कामगारांना बुद्धी दे!"

११ ऑगस्ट १९४० रोजी गुरुजींनी २१ दिवसांचे उपोषण सुरू केले. उपोषणाच्या काळातही पहिले सात-आठ दिवस ते गावोगाव फिरून सभासद नोंदणी करीत होते. सोलापूर, येवले, नाशिक येथे जाऊन त्यांनी प्रचार केला. ३१ ऑगस्टला सायंकाळी त्यांनी उपोषण संपविले. गुरुजींचे २२ पौंड वजन घटले होते.

काही दिवासांनी अशक्तपणा कमी झाल्याबरोबर गुरुजींची भ्रमंती पुनश्च सुरू झाली. त्यातूनही वेळ काढून त्यांनी 'गोड गोष्टीं'चे पाच भाग लिहून पूर्ण केले. गुरुजींनी या गोड गोष्टींबद्दल म्हटले आहे, " तुरुंगात मी अनेक गोष्टी, कधी पाश्चात्य वाङ्मयातील, कधी इतर, अशा सांगत असे. पुष्कळ मित्र मला म्हणत, 'गुरुजी, या गोष्टी लिहून काढा म्हणजे खेड्यापाड्यांत मुलाबाळांना सांगायला उपयोगी पडतील.' मी म्हणत असे, 'वेळ होईल तेव्हा करीन सारे.' पाच भाग 'गोड गोष्टीं'चे देऊन त्यांना दिलेले वचन थोडेतरी पूर्ण करत आहे. मी आता तुरुंगाच्या दारात पुन्हा आहे. तुरुंगात वेळ मिळाला, दौत-लेखणी मिळाली तर आणखी 'गोड गोष्टी'चे भाग लिहीन, किंवा इतर काही लिहून आणीन व पुन्हा माझ्या आवडत्या महाराष्ट्रातील मुलाबाळांना देईन..."

गुरुजींनी नंतरच्या तुरुंगवासात 'गोड गोष्टीं'चे आणखी पाच भाग लिहिले. 'गोड गोष्टीं'च्या दहा भागांनी महाराष्ट्रातील मुलांना वाचनाचे वेड लावले. त्यांचे भावनिक, बौद्धिक भरणपोषण झाले आणि असे घडावे, अशीच गुरुजींची इच्छा होती. ही मातृहृदयाची मनीषाच होती. जे जे कुठे चांगले काही वाचले, ऐकले ते ते आपल्या भाषेत अनुवादित करून किंवा रूपांतरित करून – भारतीय साज चढवून – त्यांनी मुलांना दिले आहे. त्यातून कितीतरी मुलांनी स्फूर्ती, प्रेरणा व सद्विचार उचलले. गुरुजींची भूमिका मात्र अशी होती –

*करी मनोरंजन जो मुलांचे ।*
*जडले नाते प्रभूशी तयाचे ॥*

गुरुजींना अभिप्रेत असलेल्या 'मनोरंजना'ला निखळ, निकोप, सर्वस्पर्शी, सुंदर, आनंददायी, सौंदर्यशाली असा निर्मळ सांस्कृतिक आशय आहे. उठताबसता उपदेशाचे कडवट घुटके पाजणाऱ्या किंवा शिस्तीच्या नावाखाली सदाकदा डोळे वटारणाऱ्या, किंवा तात्पर्यावरच भर देऊन हातात छडी घेऊन वळण लावण्याच्या पंतोजी प्रकाराला मुलांपासून खूप लांब ठेवावे, असेच त्यांना वाटत होते आणि तसेच ते 'मुलात मूल' होऊन मुलांशी वागत होते. निखळ सांस्कृतिक मनोरंजनाला त्यांच्या मनीमानसी एक 'मूल्य' — व्हॅल्यू — अशी पदवी किंवा प्रतिष्ठा होती.

'नाशिक जिल्हा युवक परिषद' चांदवडला घेण्याचे तेथील तरुण कार्यकर्त्यांनी ठरवले आणि गुरुजींना अध्यक्ष म्हणून बोलाविले. गुरुजी त्या वेळी बडोद्याला होते. प्रकृती ठीक नव्हती, म्हणून त्यांनी 'अध्यक्ष' म्हणून येण्याचे नाकारले तरी युवकांसाठी ते परिषेदेपूर्वीच धावून आले. अध्यक्षपदासारखे मानसन्मान स्वीकारण्यापेक्षा स्वयंसेवक होऊन झटणे, खपणेच त्यांना प्रिय वाटे.

गुरुजी चांदवडला आले आणि जिल्ह्यातील गावोगावी त्यांची भ्रमंती सुरू झाली. नाशिक, निफाड, येवले, विंचूर, इगतपुरी, मालेगाव इत्यादी ठिकाणी त्यांच्या प्रचंड सभा झाल्या. परिषदेच्या तयारीसाठी तेथील कार्यकर्त्यांबरोबर गुरुजींनीही सर्व तऱ्हेचे कष्ट केले. युवकांची परिषद म्हणजे जणू त्यांच्या घरचेच कार्य. परिषदेच्या मांडवासाठी अंगातला शर्ट काढून गुरुजी खड्डे खणायलाही पुढे सरसावले. " सायकलवर या, झेंडे लावून या, पायी

अनुक्रमणिका

या, ट्रकमधून या, गाणी गात गात या." असे सांगत ते सर्वत्र वाऱ्यासारखे फिरले. ठिकठिकाणच्या सभांतून काँग्रेसचा संदेश दिला. कॉंग्रेसने त्या वेळी घेतलेली युद्धविरोधी भूमिका लोकांना समजावून सांगितली.

दिनांक २३-२४ नोव्हेंबर १९४० रोजी युवक परिषदेचे अधिवेशन पार पडले. खादी-ग्रामोद्योगाच्या प्रदर्शनाचे उद्‌घाटन गुरुजींच्या हस्ते झाले. सेवादल-संघटनेविषयीच्या ठरावावरही गुरुजी बोलले. त्यांचे ते भाषण अत्यंत प्रभावी झाले.

परंतु या परिषदेच्या निमित्ताने गुरुजी जे आधी जिल्ह्यात ठिकठिकाणी बोलले होते आणि विशेषतः १९ नोव्हेंबरला चांदवडलाच त्यांनी जे भाषण केले होते, ते सरकारच्या दृष्टीने आक्षेपार्ह ठरले होते. त्यावरून गुरुजींना अटक करण्याची कारवाई शिजू लागली होती. याची कुणकूण गुरुजींना लागली आणि तेही जेलयात्रेच्या तयारीला लागले. अंमळनेर, धूळे, पंढरपूर आदि ठिकाणी पाठीवर पोलीसी वॉरंट घेऊनच ते गेले. सभांतून बोलले. अखेरीस पेण येथे त्यांना पोलिसांनी २७ डिसेंबरला अटक केली. नाशिकच्या तुरुंगात पुनश्च गुरुजी आले. त्या वेळी तिथे सेनापती बापटही होते. गुरुजींवर खटला भरण्यात आला. त्यानुसार २ जानेवारी १९४१ रोजी त्यांना दोन वर्षांची शिक्षा ठोठावण्यात आली आणि धुळ्याच्या तुरुंगात त्यांना आणून ठेवले.

दरम्यान गुरुजींनी 'श्यामची पत्रे' नावाचे पुस्तक लिहून काढले. त्यातून सेवादलाची जातिधर्म निरपेक्ष भूमिका विशद करून सांगितली आहे. 'सेवादल हा माझा प्राणवायू आहे,' असे ते म्हणत असत. कारण स्वातंत्र्यलढ्यातील नवविचारांनी प्रेरित झालेल्या तरुणांच्या सेवादलासारख्या सर्वांगीण समतेचा पुरस्कार करणाऱ्या संघटनेचे महत्त्व ते जाणून होते. आपली ध्येयसृष्टी, स्वप्ने उद्या सेवादलातील क्रांतिनिष्ठ तरुणांकडूनच साकार होतील, अशी दुर्दम्य आशा ते बाळगून होते.

वर्णाश्रम पद्धतीच्या योगाने आलेले माणसामाणसांतील भेद गुरुजींना मुळीच मान्य नव्हते. म्हणूनच त्यांनी त्रै—वर्णिकांच्या श्रेष्ठत्वाचे निदर्शक असे यज्ञोपवित घालण्याचे सोडून दिले होते. 'जानवी तोडा नि माणसे सोडा' ही जयप्रकाशजींच्या सर्वांगीण क्रांतीमधली घोषणा पुढे झाली, पण गुरुजींनी तो विचार केव्हाच अमलात आणलेला होता!

अनेक वेळा गुरुजींनी स्वतःला 'मी शूद्र आहे' असेही म्हणवून घेतलेले आहे. अस्पृश्यतेविषयीचा त्यांचा कळवळा हा एका व्यापक मानवतेच्या उमाळ्यतून जन्माला आलेला होता. त्यांनी यज्ञोपविताचा त्याग केला आणि मौंजीबंधनाविषयी 'काँग्रेस' साप्ताहिकात लिहिले होते, 'राष्ट्राची मुंज होऊ दे!' ज्ञानाची समता व सार्वत्रिकता राष्ट्रातील सर्वांच्या वाट्याला आली पाहिजे; ज्ञान हे कोणा वरिष्ठ वर्गाची मिरास होता कामा नये, हाच विचार त्यांनी मांडला आहे. " मुंज म्हणजे काय? गुलामगिरीची कवची फोडून ज्ञान-सूर्याला मिठी मारायला जाणे. गुलामगिरीत ज्ञान नाही; ना विज्ञान ना आध्यात्मिक ज्ञान."

" सर्वांगीण विषमतेच्या संहारासाठी राष्ट्र स्वतंत्र झाले पाहिजे,'' असा विचार ज्या कळकळीने गुरुजींनी या पत्रांमधून मांडला आहे, तसाच " स्वातंत्र्योत्तर समताधिष्ठित समाज हा समाजवादी मूल्यांच्या प्रस्थापनेतूनच निर्माण होईल,'' ही श्रद्धाही तेवढ्याच तळमळीने त्यांनी व्यक्त केलेली आहे.

❑

अनुक्रमणिका

# १८. वैयक्तिक सत्याग्रह

गुरुजी धुळ्याच्या कारागृहात गेले, त्या वेळी राजकीयदृष्ट्या एका विमनस्क मनःस्थितीतच होते. कामगार चळवळीत गुरुजींचा कम्युनिस्ट मंडळींशी निकटचा संबंध आलेला होता. दुसरे महायुद्ध सुरू झाल्यानंतर ज्या घडामोडी झाल्या, त्यात भारतीय कम्युनिस्टांचे दुटप्पी धोरण लक्षात आल्यावर तर ते अस्वस्थ बनले होते. युद्धाच्या सुरुवातीला त्यांचे काँग्रेसप्रमाणेच युद्धविरोधाचे धोरण होते. परंतु जर्मनीने रशियावर हल्ला केला आणि रशियाला ब्रिटनशी दोस्ती करणे भाग पडले. रशियाने असा पवित्रा बदलताच रशियाकडेच डोळे लावून वागणाऱ्या येथल्या कम्युनिस्टांनीही लगेच ब्रिटिशांशी मैत्री जाहीर केली. कालपरवापावेतो जे युद्ध साम्राज्यशाही बळकट करणारे आहे म्हणून त्याविरुद्ध सामुदायिक लढा पुकारला पाहिजे, क्रांती केली पाहिजे, अशी गर्जना करणारे आणि स्वतःला आजन्म क्रांतिकारक म्हणवून घेणारे हिंदी कम्युनिस्ट महात्मा गांधींना प्रतिक्रांतिवादी ठरवून युद्ध सहकार्याची भाषा बोलू लागले! रशियावरील हिटलरच्या हल्ल्यामुळे साम्राज्यवादी युद्ध हे त्यांच्या दृष्टीने ताबडतोब 'लोकयुद्ध' झाले!

या घटनांनी गुरुजींचा हिंदी कम्युनिस्टांविषयी फार भ्रमनिरस झाला होता आणि याचवेळी काही समाजवादी मित्रांची संगत सोबत त्यांना कारावासात लाभलेली होती. राष्ट्रभक्ती, आर्थिक समता आणि बहुजन समाजाचे कल्याण या समाजवाद्यांच्या तत्त्वामुळे गुरुजींनीही समाजवादी वाट धरली. त्या वेळी काँग्रेसअंतर्गतच समाजवादी पक्ष होता. गुरुजी समाजवादी मंडळींबरोबर काम करू लागले. पण पक्षाचे कधी सभासद झाले नव्हते. कम्युनिस्ट पक्षाचेही सभासद झालेले नव्हते. खरे तर असे आहे की, गुरुजी निखळ मानवतावादी, प्रेमधर्मी होते. त्यांच्यासारख्या मानवतावाद्यांना काँग्रेस, कम्युनिस्ट, सोशालिस्ट आदी पक्षांची चौकट मानवणारीच नव्हती. गोरगरिबांकरिता जे कोणी झटतील त्यांच्याबरोबर रहायचे, काम करायचे, बहुजनांचे हित साधायचे ही त्यांची वृत्ती होती. रंजलेल्यांना, गांजलेल्यांना आपले म्हणणारे ते साधुवृत्तीचे सत्पुरूष होते! परपीडा जाणून ती दूर करण्यासाठी धडपडणारे ते खरे वैष्णव होते!

धुळ्याच्या या वेळच्या कारावासातही गुरुजींचा लेखन-यज्ञ चालूच होता. या कालावधीत त्यांनी डॉ. राधाकृष्णन् यांच्या दोन पुस्तकांचा अनुवाद केला. 'महात्मा गौतम बुद्ध' आणि 'संस्कृतीचे भवितव्य' या नावाने ती पुस्तके प्रसिद्ध झाली. टेनिसनच्या 'हनॉक ऑर्डन'चे 'तीन मुले' या नावाने कादंबरीत रूपांतर केले. के. के. मेनन यांच्या 'चिल्ड्रेन ऑफ काली' या कादंबरीचा अनुवादही 'कालीमातेची मुले' या नावाने केला. तो पुढे पुस्तकरूपाने प्रसिद्धही झाला. याशिवाय 'सध्या', 'गोड शेवट', 'चित्रकार रंगा' ह्या स्वतंत्र कादंबऱ्याही लिहिल्या.

या अवधीत देशातले वातावरण पुनश्च लढ्याच्या ईर्ष्येने तापू लागलेले होते. १९३९ साली युद्ध सुरू झाल्यावर प्रांतात काँग्रेस मंत्रिमंडळे असतानाही सरकारने त्यांना न विचारता हिंदुस्थानचे युद्धसहकार्य जाहीर करून टाकले. महात्मा गांधींना व काँग्रेसला हे पसंत पडणे शक्यच नव्हते. म्हणून काँग्रेसच्या मंत्रिमंडळांनी राजीनामे दिले. गांधीजींनी वैयक्तिक सत्याग्रह सुरू केला. पहिले सत्याग्रही म्हणून विनोबांची व दुसरे सत्याग्रही म्हणून जवाहरलाल नेहरूंची निवड गांधीजींनी केली होती. युद्धविरोधी भाषण करून ठिकठिकाणी देशभर सत्याग्रही तुरुंगात गेले. १९४१च्या अखेरीस गांधीजींनीही चळवळ मागे घेतली. त्यांच्या आधी १९४१च्या जानेवारीतच सुभाषबाबू गुप्तपणे अकस्मात देशाबाहेर गेले होते आणि जर्मनीत बर्लिनला पोहोचले होते. देशाबाहेर जाऊन जर्मन-जपानच्या साहाय्याने त्यांनी भारतीय स्वातंत्र्य संग्रामाची जुळवाजुळव सुरू केली होती. त्यांच्या या प्रयत्नातूनच पुढे 'आजाद हिंद सेना' निर्माण झाली आणि तिच्याद्वारा सुभाषबाबूंनी एक तेजस्वी असा इतिहास घडवला.

१९४२च्या मार्च महिन्यात स्वराज्याच्या वाटाघाटी करण्यासाठी म्हणून एक योजना घेऊन क्रिप्स् कमिशन भारतात आले होते. परंतु क्रिप्स् योजनेने कोणाचेच समाधान झाले नाही. गांधीजींसह सर्व नेत्यांनी क्रिप्स् योजना फेटाळली. त्यानंतर भारतीय स्वातंत्र्य मिळवण्यासाठी हीच वेळ योग्य आहे, अशा आशयाचे लिखाण गांधीजींनी 'हरिजन' पत्रातून सुरू केले होते. देशभर लढ्याचे वारे पुनरपि संचारू लागले होते. पुढील काही महिन्यांतच काँग्रेसच्या कार्यकारिणीची बैठक झाली आणि तिच्यात 'इंग्रज सत्तने हिंदुस्थानातील सत्ता सोडून जावे' असा ठरावच पास केला. ७ ऑगस्ट १९४२ रोजी मुंबईत अत्यंत प्रभावी असे भाषण झाले ते म्हणाले, " आता अधिक उशीर करून चालणार नाही. सरकारने एक तर अविलंब स्वराज्य आम्हास देऊन टाकावे, नाही तर निरूपाय म्हणून आम्हाला आंदोलन सुरू करावे लागले."

८ ऑगस्ट रोजी गांधीजींनी ब्रिटिशांना 'चले जाव—क्विट इंडिया—भारत छोडो' असे त्रिवार सांगितले आणि जनतेलाही या लढ्यात 'सर्व शक्तीनिशी लढा' असा आदेश दिला. 'डू ऑर डाय'-'करेंगे या मरेंगे' असे शब्द गांधीजींनी वापरले होते.

त्याच रात्री सरकारने गांधीजींसह सर्व वरिष्ठ नेत्यांना अटक करून गुप्तस्थळी नेऊन ठेवले होते. लढा सुरूच झाला होता. ९ ऑगस्टला सकाळी ही वार्ता सर्व देशभर पसरली. गावोगावी सरकारने धरपकड सुरू केली. जनताही प्रतिकारासाठी सज्ज झाली. अनेक कार्यकर्ते भूमिगत होऊन चळवळ चालवू लागले.

या दिवशी गुरुजी धुळ्याच्या तुरुंगात होते. पण दुसऱ्याच दिवशी म्हणजे १० ऑगस्टला त्यांच्या शिक्षेची मुदत संपून सुटका होणार होती. गावोगावी या वेळी धरपकड सुरू झाली असताना गुरुजींना कोण मोकळे ठेवणार होते? पण विलक्षण किंवा आश्चर्यजनक वाटावी अशी घटना घडली .

धुळ्याच्या कारावासात असताना गुरुजींना ब्लेक नावाचा एक मित्र मिळाला. मि. ब्लेक हे धुळे जेलचे जेलर होते. गुरुजींच्या सौजन्यपूर्ण, शांत व साधुवृत्तीच्या वागणुकीचा ब्लेक यांच्यावर खूपच प्रभाव पडलेला होता. ब्लेक यांनी गुरुजींचे 'श्यामची आई' हे पुस्तकही वाचले होते. 'फायनेस्ट मॅन आय मेट इन माय लाईफ' असे उद्गार मि. ब्लेक यांनी पुढे प्रस्तुत लेखकाजवळ गुरुजींबद्दल बोलताना काढले होते.

१० ऑगस्ट ही गुरुजींच्या सुटकेची तारीख, पण बाहेर तर धरपकड सुरू झालेली. ब्लेक यांनीही फोनवरून गुरुजींना न सोडण्याविषयी सूचना मिळाली होती. परंतु ब्लेक यांना गुरूजींसारख्या संत माणसाला तुरुंगात ठेवणे बरे वाटेना. तेच अस्वस्थ झाले आणि त्यांनी स्वता:शी 'एखाद्याला लेखी वॉरंटशिवाय जर अटक करता येत नाही, तर मग लेखी आज्ञेशिवाय एखाद्या राजबंद्याला आपण तुरुंगात तरी कसे ठेवून घ्यायचे?' असा युक्तिवाद केला आणि गुरुजींना मुक्त करण्याचा निर्णय ९ ऑगस्टलाच केला. पण ब्लेक यांना अशीही शंका आली की, उद्या १० तारखेला सकाळी गुरुजींना आपण सोडले आणि जेलबाहेर पडताच धुळ्याच्या पोलिसांनी अटक केली तर? त्यांनाही तशी बाहेर सूचना गेली असेच! मग ब्लेकनी त्यावरही तोडगा काढला तो असा : रात्री १२ नंतर ९ तारीख संपते आणि १० तारीख सुरू होते. गुरुजी त्याचवेळी — झीरो अवरलाच - मुक्त होतात; त्यांना त्यानंतरच मुक्त करायचे आणि त्याचप्रमाणे पहाटेलाच त्यांनी गुरुजींना मुक्त करून अंमळनेरला पोहोचवले.

गुरुजींच्या स्नेहशील, प्रेमळ व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव एका परकीय तुरुंगाधिकाऱ्यावरही झाला, ही खरी थोरवी!

❑

अनुक्रमणिका

# १९. बेचाळीसचा लढा

अंमळनेरला गुरुजी गुपचूपपणे आले. एका मित्राकडे वळकटी टाकली. देशातल्या समाजवादी मंडळींनी भूमीगत राहून लढा लढविण्याचे ठरविले होते. त्यानुसार देशात उठाव होऊ लागले होते. गुरुजींनी अंमळनेरमध्येही काही घडावे, असे प्रयत्न गुप्तपणे चालू ठेवले. अंमळनेर अजून कसे पेटत नाही, या विचाराने ते बेचैन बनले. तशाच मनःस्थितीत ते पुण्यास आले. येताना तेथील तरुणांसाठी एक चिठ्ठी लिहून ठेवली. गुरुजींनी लिहिले होते, " अशा गंभीर प्रसंगी माझा खानदेश शांत का? अंमळनेरची जनता जर काहीच करणार नसेल तर ह्या अंमळनेरच्या पाच कंदिलांसमोर मी माझ्या शरीराची होळी करीन."

गुरुजीची ही तरुण चिठ्ठी कार्यकर्त्यांनी वाचली मात्र, ते पेटून उठले. अंमळनेरमध्ये सर्वत्र ही वार्ता पसरली. प्रक्षुब्ध लोकांचा जमाव गोळा झाला. तिथेही गुरुजींची ही चिठ्ठी वाचण्यात आली. गुरुजींचा आदेश लोकांनी शिरोधार्य मानला. जवळच मामलेदारांचा टांगा उभा होता, लोकांनी तो पेटवून दिला. पोलीस चौकी, पोस्ट ऑफिस, कोर्ट, स्टेशन बघता बघता परकी साम्राज्याच्या ह्या खूणा आगीने धडाडू लागल्या. खानदेशात क्रांतीची ज्वाळा भडकली!

मुंबई-पुण्यात आल्यावर गुरुजींचा एस. एम. जोशी, अच्युतराव पटवर्धन, शिरुभाऊ लिमये, ना. ग. गोरे आदि समाजवादी मित्रांशी संबंध आला. भूमिगत अवस्थेत गुरुजी सातारा, खानदेश आदी भागात जाऊन आले. कार्यकर्त्यांच्या गुप्त बैठका घेऊन त्यांना त्यांनी मार्गदर्शन केले. लढ्यासाठी स्फूर्ती, प्रेरणा दिली.

मुंबईत गुरुजी भूमिगतांबरोबरच रहात असत. त्यांच्यासाठी स्वयंपाक करीत असत. त्यांना मायेने जेवू-खाऊ घालीत असत. 'संतवाडी', 'राजगड', 'हडळ हाऊस', 'मूषक महाल' अशी त्या काळातल्या भूमिगतांच्या निवासस्थानाची खुणेची नावे होती. प्रवासाच्या वेळी गुरुजी कधी धोतर, कोट, उपरणे, पगडी असा एखाद्या शेटजीसारखा पोशाख करीत, कधी पैरण-मुडांसे, घोंगडी असा शेतकरी वेश धारण करीत. गुप्तपणे सभा भरवित. कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करीत.

मुंबईत असले म्हणजे, राहत्या जागेची झाडलोट करणे, कपडे धुणे, स्वयंपाक करणे, भांडी घासणे ही कामेही ते करीत असत. एकदा तर डॉक्टरांच्या वेषात असलेल्या जयप्रकाशजींनाही गुरुजींनी रांधून जेवू घातले होते.

या क्रांतिकाळात गुरुजींनी भूमिगत असताना पुस्तके लिहूनही पैसे जमा केले आणि चळवळीसाठी कार्यकर्त्यांना दिले. 'गोड गोष्टी'चे ६ ते १० हे पाच भाग याच वेळी त्यांनी लिहिले, 'देशबंधू चित्तरंजन दास', 'विनोबाजी' अशी छोटी चरित्रेही लिहिली आणि मुख्य म्हणजे त्यांनी या काळात अनेक प्रकारची जळजळीत, तेजस्वी बुलेटिन्स लिहिली ही बुलेटिन्स चक्रमुद्रित होऊन ठिकठिकाणी गुप्तपणे जात असत. गुप्तपणेच त्यांचे वाटप होत असे. क्रांतीचा संदेश त्यात असे. गुरुजींनी लिहिलेल्या अशाच एका बुलेटिन्सचा हा थोडा नमुनाच पहा.

'स्वतंत्र महाराष्ट्र बलिदान पत्रिका' असे शीर्षक असलेल्या या पत्रिकेत म्हटले आहे,

" ९ ऑगस्टला हिंदी स्वातंत्र्य संग्राम हिंदुस्थानभर सुरू झाला. ब्रिटिश हिंदुस्थान व संस्थांनी हिंदुस्थान असा प्रश्न उरला नाही. संस्थानेही उठली. श्रीशिवछत्रपतींशी संबंद्ध असे कोल्हापूर संस्थानही बंड करून उठले.

कोल्हापूर प्रजापरिषदेने पुढील तेजस्वी जाहीरनामा काढला. इंग्रजांची व इंग्रजी सत्तेच्या तंत्राने चालणाऱ्या संस्थांनी सरकारची सत्ता यापुढे आम्ही मानणार नाही. आम्ही स्वतंत्र आहोत!'

१५ ऑगस्टला थोर महादेवभाई स्वर्गवासी झाले. १६ ऑगस्टला कोल्हापूरात प्रचंड मिरवणूक. ते पहायला पोलीस आले. लाठीमार सुरू झाला आणि बिंदुनारायण यांचे डोके शतचूर्ण झाले. जनतेत चैतन्यसिंधू उचंबळावा म्हणून बिंदुनारायणने स्वतःचा जीवनबिंदू अर्पण केला आणि खरोखरीच करवीर जनता पेटली. शेकडो तुरुंगात चालले. हजारोंना झळा लागल्या...

“ स्वातंत्र्यवाद्यांनो, उठा, प्रचार करा! उठाव करा!

“ हे हरामखोर सरकार, नाही जिवंत आम्ही ठेवणार! असे गर्जत गावोगाव जा. स्वातंत्र्याच्या शपथा घेणाऱ्यांच्या साहाय्याने पथके तयार करा. आता बसू नका. आपले वर्तुळ वाढवा. संघटना वाढवा.

“ शाळांतील अध्यापकांनो, कॉलेजातील प्राध्यापकांनो, बंद करा ह्या संस्था! काय त्यात राम आहे? या खुनी सरकारचे पोलीस तुमच्या आवारात आलेले तुम्हांस कसे बघवते? तुम्ही आपल्या दगडी संस्थांना जपता, पण त्यामुळे भारतमातेला मारीत आहात. तुम्ही मातृहत्यारे होणार का? पडा बाहेर. तुम्ही आणि तुमचे विद्यार्थी स्वातंत्र्याचा संदेश देत सर्वत्र हिंडा. 'सा विद्या या विमुक्तये!' तेच खरे ज्ञान, जे स्वतंत्र करते!”

आपल्या प्रिय खानदेशातल्या शेतकऱ्यांना उद्देशून लाल शाईत लिहिलेले असेच एक पत्रक त्या वेळी गुरुजींनी काढले होते. 'क्रांतीच्या मार्गावर' नावाचे पुस्तकही लिहिले होते.

१० फेब्रुवारी १९४३ रोजी गांधीजींनी आगाखान पॅलेस येथील बंदिवासातून २१ दिवसांचे उपोषण सुरू केले. ब्रिटिश सरकारने गांधीजींवर काही खोटे आरोप केले होते. त्याविरुद्ध हे उपोषण होते. सारे राष्ट्र चिंतामग्न झाले होते. निर्घृण ब्रिटिश सरकारने तर गांधीजींच्या अंत्यविधीची तयारी चालवली होती. अशा वेळीच जयप्रकाशजींच्या सांगण्यावरून गुरुजींवर 'गांधीजी गेले असे समजून मृत्युलेख लिहिण्याची' ही पाळी आली होती. कर्तव्य कठोर असते. गुरुजींनी डोळ्यांतून अश्रूंचा पूर वाहत असताना तो लेख लिहिला. जनतेला पुढला रस्ता दाखवणेही आवश्यक होते.

सुदैवाने गांधीजी या अग्निदिव्यातून सुखरूप बाहेर पडले!

१८ एप्रिल १९४३ रोजी 'मूषक महाला'वर पोलिसांनी धाड घातली. त्या वेळी साने गुरुजी, शिरुभाऊ लिमये, ना. ग. गोरे आदी १४ भूमिगत कार्यकर्त्यांना पकडण्यात आले. गुरुजींचे सुमारे सात-आठ महिन्यांचे भूमिगत जीवन संपले आणि ते येरवड्याच्या कारागृहात दाखल झाले. गुरुजी तेथे जाताच तरुणांचा घोळका त्यांच्याभोवती जमा झाला. त्यांना गोष्टी सांगणे, धीर देणे, दुखले-खुपले पहाणे, हे सर्व आईच्या वात्सल्याने गुरुजी करू लागले. गप्पागोष्टी, विनोदही चालत असत. त्यामुळे कारावासातील कंटाळवाणे जीवन सुखकर होत असे. गुरुजींनी एकदा नाटक लिहिले आणि तरुणांनी त्याचा प्रयोगही केला. टिळक पुण्यतिथीला लोकमान्यांच्या जीवनावर गुरुजींनी सुरेख किर्तनही केले. पुस्तक-लेखन तर गुरुजींचे वेळ मिळेल तसे चालूच असे.

अनुक्रमणिका

येरवड्याहून गुरुजींना पुढे नाशिकच्या कारागृहात नेले होते. तिथेही गुरुजींचा हाच उपक्रम चालू असे. 'मानवजातीची कथा,' 'इस्लामी संस्कृती', चिनी संस्कृती' असे काही महत्वाचे ग्रंथलेखन गुरुजींनी नाशिकला केले.

१५ जानेवारी १९४५ रोजी गुरुजींची नाशिकच्या कारागृहातून सुटका झाली. सुटल्याबरोबर प्रथम ते ठाणे जिल्ह्यातील बोर्डी गावी आपल्या बंधूंकडे गेले. मध्यंतरी ते खानदेशातही जाऊन आले. बऱ्याच दिवसांनी कार्यकर्त्यांच्या गाठीभेटी झाल्या.

१९४२ची ऑगस्ट क्रांती आता ओसरली होती आणि बहुतेक नेते मंडळी व कार्यकर्ते तुरुंगातून सुटले होते. गुरुजी काही काळ बोर्डीला राहिले आणि नंतर 'ऑगस्ट क्रांतीचे संकीर्तन' गात महाराष्ट्रभर फिरले. ऑगस्ट क्रांतिवाद्यांवर हिंसाचाराचा आरोप करून काही बुजुर्गांनी त्यांना बदनाम करण्याचा उपद्व्याप चालवलेला होता. गुरुजींना हे सहन झाले नाही. त्यांनी या क्रांतीवीरांची प्रशस्ती करीत त्यांच्या शौर्याची, देशभक्तीची, स्वातंत्र्यप्रेमाची उज्ज्वल गाथा आपल्या प्रभावी वाणीने महाराष्ट्रापुढे मांडली.

गुरुजी नंदुरबारलाही गेले. बालहुतात्मे शिरीषकुमार, धनसुखलाल, लालदास आदींच्या स्मृतींना प्रचंड सभेत त्यांनी अभिवादन केले

२४ डिसेंबर १९४५ रोजी गुरुजींच्या ४६ व्या वाढदिवशी जळगाव येथे त्यांचा सत्कार करून त्यांना १५ हजारांची थैली देण्यात आली. त्या दिवशी सकाळी जळगाव शहरातून गुरुजींची ४६ बैलांच्या रथातून मिरवणूक काढण्यात आली होती. रस्ते लतापल्लवांनी आणि कमानींनी सजवण्यात आले होते. खानदेशातील खेड्यापाड्यांतून हजारो शेतकरी, कामकरी या समारंभासाठी आले होते. समारंभाच्या अध्यक्षस्थानी विनोबाजी होते. त्यांच्या हस्तेच सत्कार-निधी गुरुजींना देण्यात आला. अशा समारंभाला न जाण्याचा आपला परिपाठ मोडून केवळ गुरुजींच्या प्रेमामुळे विनोबाजी आले होते. विनोबांच्या उपस्थितीने समारंभाला गांभीर्य व आगळेपण आले.

दुसऱ्या दिवशी २५ डिसेंबरला धुळे शहरातही गुरुजींचा सत्कार करण्यात आला.

मिळालेला सत्कार-निधी गुरुजींनी बेचाळीसच्या लढ्यात खानदेशातील ज्या कार्यकर्त्यांनी जीवाचे रान केले, प्राणपणाने जे लढले, त्यांच्या निर्वाहाकरिता देण्याचे ठरविले होते. कारण त्या वेळी ती महत्त्वाची गरजच होती आणि म्हणूनच गुरुजींनीदेखील स्वतःचा असा सत्कार करून घेण्यास संमती दिली होती.

ज्या कारणासाठी खानदेशामध्ये गुरुजींनी सत्कारास संमती दिली होती, त्याच कारणासाठी महाराष्ट्रातील जनतेनेही गुरुजींचा सत्कार करण्याचे ठरविले. एक लाखाचा निधी जमविण्याचा संकल्प केला होता. त्यासाठी 'साने गुरुजी सत्कार समिती' स्थापन करण्यात आली होती. समितीचे अध्यक्ष सेनापती बापट होते. विविध क्षेत्रांतील थोरामोठ्यांनी या निधीचा पुरस्कार केला. मात्र मोठ्या प्रमाणावरील सत्कार समारंभास गुरुजींनी विरोध दर्शविला, म्हणून मुंबईला सत्कार समितीच्या बैठकीतच सेनापतींच्या हस्ते गुरुजींना एक लाखाचा निधी अर्पण करण्यात आला. निधीच्या विनियोगाची जबाबदारी गुरुजींनी श्री. अण्णासाहेब सहस्रबुद्धे यांच्याकडे सोपविली होती.

❑

अनुक्रमणिका

## २०. कुमारांशी हितगूज

*मुले म्हणजे देव, मुले म्हणजे देव ।*
*मुले म्हणजे राष्ट्राची मोलाची ठेव ॥*

असा श्रद्धायुक्त प्रेमभाव मुलांविषयी गुरुजींच्या मनीमानसी नित्य नांदत असे. हसरी-नाचरी मुले हे त्यांच्या सौख्याचे निधान होते. मुलांच्या मनोरंजनात साऱ्या वृत्तींसह ते तन्मय होऊन जात असत. एका कवितेत ते म्हणतात-

*वारा वदे, कानामध्ये*
*गीत गाईन तुला*
*ताप हरिन, शांति देईन*
*हस रे माझ्या मुला!*

*चिमणी येऊन, नाचून बागडून*
*काय म्हणे मला*
*चिवचिव करीन, चिंता हरीन*
*हस रे माझ्या मुला!*

*हिरवे हिरवे, डोले बरवे*
*झाड बोले मला*
*छाया देईन, फळ-फूल देईन*
*हस रे माझ्या मुला!*

अशा अंतरीच्या वात्सल्य-उमळ्यामुळेच गुरुजींनी 'कुमार साहित्य संमेलना'चे अध्यक्षपद स्वीकारले होते. एरवी ते साहित्य संमेलनांपासून दूर रहात असत. मोठमोठ्या साहित्यिकांमध्ये मिसळण्यास त्यांना भारी संकोच वाटे. इतके विविध प्रकारचे आणि विपुल लिहूनही त्यांनी स्वतःला कधी साहित्यिक म्हणवून घेतले नाही. कलादृष्ट्या त्यांच्या साहित्याचे मूल्यमापन कोणी विद्वान समीक्षक करू लागले, तर ते नम्रपणाने म्हणत असत, " कला मला समजत नाही." राष्ट्र, समाज, व्यक्ती यांच्या सेवेच्या साधनेसाठी म्हणून जी काही माध्यमे गुरुजींनी वापरली, त्यात लेखणी आणि वाणी ही दोन माध्यमे त्यांनी त्यांच्या उद्दिष्टांच्या संदर्भात अत्यंत प्रभावीपणे वापरली. ध्येयासाठी राष्ट्र उठवण्याचे, समाज जागरणाचे जे कार्य कार्यकर्त्यांनी अंगीकारलेले होते, त्याच कार्याचा एक भाग म्हणजे त्यांचे साहित्य होते.

पण मोठ्यांच्या साहित्य संमेलनापासून ते दूर राहिले, तरी छोट्यांवरील प्रेमाने ते अध्यक्ष बनले. हे 'कुमार साहित्य संमेलन' पुणे येथे २४ डिसेंबर १९४६ रोजी भरले होते. गुरुजींचा ४७वा वाढदिवस त्या दिवशी होता. गुरुजींना मुलांविषयी जसे मातृवात्सल्य वाटे, तसेच मुलांनाही गुरूजींविषयी मातृभक्ती वाटे. ते 'कुमारांचे गांधी'च होते! कुमारांनीही या वेळी गुरुजींचा सत्कार करून एक हजार रुपयांची गुरुदक्षिणा दिली.

या संमेलनाच्या अध्यक्षपदावरून बोलताना आपले सगळे अंतःकरण गुरुजींनी कुमार साहित्यिकांच्या पुढे मोकळे केले; आपल्या साहित्यनिर्मितीचा अनुभव सांगताना ते प्रारंभीच म्हणाले,

अनुक्रमणिका

“ माझे हृदय रिते करीत असताना मला अपार आनंद होई. मी भावनांवर नाचत लिहिले. लिहिताना रडे, संतापे, रोमांचित होई. अनेक वेळा असा अनुभव आला आहे की, लिहून झाल्यावर गळून गेल्याप्रमाणे होई. अपार भूक लागे. जणू मी माझ्या लिहिण्यात रक्त ओतत होतो. सारे प्राण ओतत होतो. माझे वाङ्मय कसेही असो, त्यात मी रक्त ओतलेले आहे. ते रद्दड असले तरी त्यात प्राण आहे. तेथे रक्त आहे, अश्रू आहेत. माझ्या वाङ्मयाला हात लावाल तर माझ्या हृदयाला हात लावाल. माझे वाङ्मय माझी वाङ्मयीन मूर्ती आहे.”

यानंतर गुरुजींनी कुमारांना “ सभोवतीच्या मानवी जीवनाशी एकरूप व्हा. प्राचीन, त्याचप्रमाणे अर्वाचीन-आजचाही-इतिहास अभ्यासा, निसर्गाशी एकरूप व्हा, थोर थोर देशी-विदेशी, प्राचीन-अर्वाचीन ग्रंथकारांचा अभ्यास करा”- असा उपदेश करून कुमार साहित्याबद्दल ते म्हणाले, “ कुमारांसाठी अनेक विषयांवरची हजार हजार तरी पुस्तके तयार करायला हवीत. जर्मनीत १९१४ पूर्वी मुलांसाठी एकेका शास्त्रीय विषयावरची पाऊणशे पाऊणशे छोटी पुस्तके तयार केली गेली होती. वनस्पतींवरची, ताऱ्यांवरची, इंजिनावरची, मोठमोठी चित्रे, त्यात नाना भाग रंगीत. मुलांची जिज्ञासा वाढवायला हवी.”

कुमारांना प्रत्यक्ष कार्याची कल्पना देताना गुरुजी म्हणाले, “ महाराष्ट्रभर हिंडून सारे परंपरागत वाङ्मय गोळा करा. सर्व प्रकारच्या गोष्टी, आख्यायिका, दंतकथा गोळा करा. जर्मनीतील ग्रिमबंधूंनी बारा वर्षे हिंडून अशा गोष्टी गोळा केल्या. त्या गोष्टी जगातील मुलांना आनंदवीत आहेत. आपल्या महाराष्ट्रात ग्रिमबंधू केव्हा निर्माण होणार? मुलांनी आपल्या आयुष्यातील मार्मिक आठवणी, प्रसंग लिहून काढावे... जुने वाङ्मय गोळा करा. सुंदर अनुवाद करून नवीन निर्मितीही करा. साहित्याचे तुम्ही थोर उपासक व्हा आणि साहित्याद्वारा जीवनाचे उपासक व्हा!”

गुरुजींनी कुमारांशी कळकळीने हितगूजच केले होते.

❑

# २१. मंदिर प्रवेश

पंढरपूर म्हणजे महाराष्ट्राची आध्यात्मिक राजधानी. वारकरी पंथाच्या भागवत धर्माचे प्रेरणास्थान. संतांनी वर्णिलेले भूवैकुंठ.... विठुरायाची नगरी!

परंतु विठुराया मात्र, शेकडो वर्षे झाली, बडवे आणि धर्ममार्तंड, सनातनी यांच्या कैदेत. तो सकलांसाठी माऊली होऊन उभा राहिला. पण या मंडळींनी त्याला त्याच्याच काही लेकरांपासून तोडले. शुद्रांना अस्पृश्य ठरवून त्यांच्यासाठी मंदिराची दारे लावून घेतली. मायलेकरांची ताटातूट केली. आषाढी-कार्तिकीला इतर लेकरांप्रमाणेच ही विठाई-माऊलीची लेकरेही अनवाणी पायांनी दगडगोट्यांची वाट तुडवीत, शिळ्या भाकरीचे तुकडे पोटात भरीत, मोठ्या भक्तिभावाने विठूनामाचा गजर करीत पंढरीला येत असत. पण तिथे आल्यावर त्यांना देवळात जाता येत नसे. विठाई माऊलीला भेटता येत नसे. तिचे श्रीमुख किंवा चरण दृष्टीला पडत नसत. कारण ते शुद्र, हरिजन, अस्पृश्य. मग तळमळत्या अंतःकरणाने, देवदर्शनासाठी भुकेजल्या मनाने लांबून, दुरून कुठून तरी देवळाच्या कळसालाच हात जोडायचे आणि जड मनाने, वारी घडली अशा खोट्या समाधानाने गावाकडे परत फिरायचे. जाता-येताना किंवा पंढरीतही कुठे हिंडता-फिरताना कुणा स्पृश्याला, सवर्णाला आपला धक्का लागणार नाही ना, आपला त्याला विटाळ होणार नाही ना, अशी काळजी वहायची. अंग चोरून, मन मारून वागायचे, अदबीने बोलायचे, तुच्छ पशूहून तुच्छ जिणे जगायचे. असे हे वर्षानुवर्षे चालले होते. देवाच्या नावावर चालले होते. धर्माच्या नावावर चालले होते. धर्मशास्त्राच्या नावावर चालले होते. परंपरा-रूढी यांच्या नावावर चालले होते.

माणसांना माणसांपासून दूर ठेवणारा देव आणि धर्म नसतो, तर ती श्रेष्ठत्वाच्या अहंकाराने पछाडलेली स्वार्थी, धर्मलंड माणसेच असतात. खोट्या धर्माचे स्तोम माजविणारे हेच खरे अधार्मिक, नास्तिक भोंदू असतात.

गुरुजींना हरिजन बांधवांवर चाललेल्या ह्या अन्यायाची चीड आली. संताप आला आणि त्यांनी ह्या दुष्ट रूढींविरुद्ध बंड करण्याचे ठरविले. आपले प्राण पणाला लावले. अस्पृश्यतेचा कलंक धुतला जावा म्हणून गुरुजी तर आयुष्यभर झगडत आलेच होते. पण १९४६ च्या नोव्हेंबर महिन्यात निमित्तमात्र अशी एक घटना घडली आणि अवघ्या महाराष्ट्राचे लक्ष गुरुजींनी वेधून घेतले. त्यांनी प्राणांतिक उपोषणाचा निर्धार घोषित केला.

घडले होते असे की, खानदेशातील एक कार्यकर्ते श्री. सीतारामभाऊ चौधरी विनोबांकडे गेले होते. त्या वेळी विनोबांच्या मनातही हरिजनसेवेचे विचार चालले होते. विनोबांनी सीतारामभाऊंजवळच गुरूजींसाठी एक पत्र दिले. ११ नोव्हेंबर १९४५ च्या ह्या पत्रात विनोबांनी 'मंदिर प्रवेशाबाबत काम करण्याचे मी सीतारामभाऊंना सुचवले आहे' असे वाक्य होते. 'पुणे करार झाला त्याला १४ वर्षे झाली, या अवधीत हरिजनांसाठी आम्ही किती मंदिरे उघडली, किती विहिरी मोकळ्या केल्या, हरिजनांना किती जवळ घेतले, याचा हिशोब द्या,' असेही एकदा विनोबा म्हणाले होते. गुरुजींच्या मनात ह्या प्रश्नावरून बरीच खळबळ माजून राहिली होती. ते अत्यंत अशांत, अवस्थेत होते. तशात श्री. सीतारामभाऊ पंढरपूरला गेले. ते वारकरी होते. मंदिर प्रवेशाच्या खटपटीला लागले. गुरुजींना पत्र लिहिले, " पंढरपूरला निघून या. तुम्ही आलात तर मला हिंमत चढेल."

'गुरुजी त्या वेळी बोर्डीला होते. सीतारामभाऊंचे पत्र वाचून त्यांच्या मनाची तगमग आणखीनच वाढली. पण पंढरपूरला जाऊन काय करणार? कसले बळ आपल्याजवळ आहे? बडवे मंडळींजवळ का याबद्दल शास्त्रार्थ करीत बसायचे? असे विचार त्यांच्या मनात आले आणि पंढरपूरला न जाता आपण आपले प्राण या कार्यासाठी हातात घेऊन उभे रहावे, असे गुरुजींनी आपल्या वृत्तीनुरूप ठरविले. कार्तिकी दशमीच्या दिवशी त्यांनी आपल्या

उपोषणाविषयी वृत्तपत्राकडे एक निवेदन धाडले आणि ते उंबरगावी आपले बालमित्र डॉ. रामभाऊ जोशी यांच्याकडे आले. दुसऱ्या दिवशी कार्तिकी एकादशीपासून गुरुजींचे पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरात हरिजनांना प्रवेश मिळावा, म्हणून प्राणांतिक उपोषण सुरू झाले.

त्याच दिवशी म्हणजे ४ नोव्हेंबर १९४६ रोजी ही बातमी सर्व वृत्तपत्रांतून, गुरुजींच्या पत्रकासह प्रसिद्ध झाली आणि अवघ्या महाराष्ट्रात खळबळ उडाली!

गुरुजींनी पत्रकात म्हटले होते, " आज कार्तिकी एकादशी. प्लेग असला तरी पंढरपूरची यात्रा जमेल. पंढरपूरच्या वारकऱ्यांत वऱ्हाड-खानदेशाकडील कितीतरी हरिजन वारकरी आहेत. त्यांच्या मुलांची नावे तुळशी, एकादशी अशी असतात. परंतु या वारकऱ्यांना त्या समचरणांवर डोई ठेवता येत नाही. 'समचरण' असे विठ्ठलाच्या चरणांचे संतांनी वर्णन केले. ते चरण भेदभाव करीत नाहीत. ते सर्वांभूती सम आहेत. परंतु त्या चरणांवर सर्वांना कां बरे डोके ठेवता येऊ नये?

" पंढरपूरच्या पांडुरंगाच्या मंदिराच्या व्यवस्थापकांना माझी प्रार्थना आहे की, त्यांनी देवाजवळ सर्व लेकरांस येऊ द्यावे. तशी त्यांनी घोषणा करावी. तोपर्यंत मी उपवास करीत राहीन.

" महाराष्ट्रातील हजारो गावांतील बंधू-भगिनींना, तसेच शहरातील बंधू-भगिनींना माझी प्रार्थना की, तुम्ही भराभरा पुढे येऊन ही अस्पृश्यता समूळ नष्ट करा. प्रचंड लाट सर्व महाराष्ट्रभर उसळू दे आणि हे पाप धुऊन जाऊ दे!"

ही वार्ता वाचून सेनापती बापट, अच्युतराव पटवर्धन, एस. एम. जोशी आदी मंडळी तातडीने उंबरगावी पोहोचली. सर्वांचीच गुरुजींच्या मनीची वेदना जाणली आणि त्यांना पाठिंबा दर्शविला. परंतु असे एकदम उपोषण करण्यापूर्वी महाराष्ट्रभर दौरा करून जनतेला आपले म्हणणे समजावून सांगावे, जनमतही आपल्या बाजूला उभे करावे आणि नंतर प्रसंग पडलाच तर आमरण उपोषण करावे, असा विचार गुरुजींच्या पुढे मांडला! बरीच चर्चा झाली, पण गुरुजी टाकले पाऊल मागे घ्यायला तयार होईनात. मग सेनापतींनीही आपला उपोषणाचा विचार सांगितला तेव्हा मात्र गुरुजी हालले. आपल्यामुळे वृद्ध सेनापतींना क्लेश होऊ नयेत, म्हणून मग त्यांनी प्रचारदौऱ्याची कल्पना मान्य करून त्या वेळचे उपोषण सोडले.

नंतर या मंदिर प्रवेशाला अनुकूल असणाऱ्या थोरामोठ्यांचे एक 'हरिजन मंदिर प्रवेश मंडळ' स्थापन करण्यात आले. 'हरिजन सेवक संघा'ने या कामी पुढाकार घेतला आणि ७ जानेवारी १९४७ पासून गुरुजींच्या महाराष्ट्र दौऱ्याची सुरुवात मुंबई-पुणे येथील विराट सभांपासून झाली. सेनापती बापटही या दौऱ्यात गुरुजींच्या बरोबर होते. 'महाराष्ट्र शाहीर' नामक सेवादलातील कलावंतांचे एक कलापथकही होते. महाराष्ट्राच्या बहुतेक जिल्ह्यातून गुरुजींचा दौरा झाला. रोज अशा ठिकठिकाणी ५-६ प्रचंड जाहीर सभा झाल्या. हजारो स्त्री-पुरुष गुरुजींचे विचार ऐकत असत आणि पाठिंबा देत असत.

सुरुवातीला सेनापती थोडेसे बोलत असत. नंतर गुरुजी बोलत असत. ते म्हणत, " पंढरपूरचे विठ्ठल मंदिर हरिजनांना मोकळे व्हावे म्हणून मी मरायला उभा राहिलो आहे. पंढरपूर म्हणजे महाराष्ट्राचे हृदय. महाराष्ट्राच्या जीवनाची किल्ली. पंढरपूरची कळ दाबली तर महाराष्ट्रभर प्रकाश पडेल, असे मनात आले. पंढरपूर म्हणजे दक्षिण काशी. असे हे प्राचीन मंदिरच देवाच्या सर्व लेकरांना मोकळे व्हावे. अशी माझी इच्छा. पंढरपूरचे मंदिर मी एक

प्रतीक मानतो. या रूपाने महाराष्ट्रातील सर्व जीवनातील अस्पृश्यता नष्ट व्हावी, दुष्ट रूढीची कुलपे गळून पडावी. मी माझ्या प्राणांचे तेल घालण्यासाठी उभा आहे…"

'घ्या रे, हरिजन घरात घ्या रे, घरात घ्या!' असे एक गाणेही त्यांनी करून दिले होते.

दौऱ्यात अनेक ठिकाणी गुरुजींच्या हस्ते हरिजनांसाठी पाणवठे मोकळे झाले, मंदिरे खुली झाली.

शेवटी १ मे १९४७ रोजी गुरुजी पंढरपुरी पोहोचले. सकाळी वाळवंटात प्रचंड जाहीर सभा झाली. त्या आधीपासूनच पंढरीत सनातनी मंडळींनी विरोधी सभा घेतल्याच होत्या. 'जाव साने भीमापार। नही खुलेगा विठ्ठल द्वार ।' अशा घोषणा दिल्या होत्या. सभेतही सनातन्यांच्या म्होरक्यांनी विरोध केला. गुरुजींनी त्यांच्या आक्षेपाला समर्पक अशी उत्तरे दिली. सभा संपली आणि गुरुजी तनपुरे मठात आले. सकाळपासूनच त्यांचे प्राणंतिक उपोषण सुरू झाले होते.

गुरुजींच्या या अग्निदिव्याने सारा महाराष्ट्र व्यस्थित झाला होता. अनेक ठिकाणांहून लोक व नेते पंढरपूरला आले होते. दोन्ही बाजूंनी सभा, मिरवणुका चाललेल्या होत्या. उपोषणाचा एकेक दिवस चालला तशी पंढरीतली परिस्थिती गंभीर बनत चालली, वातावण तापू लागले. सनातन्यांच्या घोषणेला गुरुजींचे तरुण चाहते उत्तर देत होते. " साने गुरुजी करे पुकार। खोलो विठ्ठल मंदिर द्वार।"

दरम्यान पंढरपूरच्या देवळाचेच व्यवस्थापक बडवे व उत्पात यांचे प्रतिनिधी एका तथाकथित गांधीभक्तांच्या – पुंडलिकजी कातगडे – मध्यस्थीने म. गांधींना भेटले व गुरुजींच्या उपवासाविषयीची विपर्यस्त बातमी गांधीजींच्या कानी घातली. महाराष्ट्रातल्या व मंत्रिमंडळातल्या काँग्रेस श्रेष्ठींनीही असेच विपर्यस्त सांगितलेले होते. ते ऐकून गांधीजींनी अत्यंत सावध शब्दात गुरुजींना तार केली, " मला माहीत झालेली वस्तुस्थिती पहाता तुमचे उपोषण सर्वस्वी चुकीचे आहे. पंढरपूरचे मंदिर हरिजनांना लौकरच खुले होईल. कितीही मोठ्या व्यक्तीने किंवा असंख्य लोकांनी काहीही आक्षेप घेतले तरी आपल्या मोठेपणाने त्यांच्याकडे दुर्लक्ष करावे. कृपा करून उपोषण थांबवा. आणि तशी उलट तार करा."

गांधीजींच्या या तारेमुळे गुरुजींना अतीव दुःख झाले. वेदना झाल्या. अनेकांनाही हे चमत्कारिक वाटले. पण गांधीजींच्या तारेतील 'मला माहीत असलेली वास्तुस्थिती' हे शब्द त्यांनी फार सावधतेने वापरले आहेत, हे गुरुजींच्या लक्षात आले. गांधीजींना संपूर्ण सत्य परिस्थिती कळलेली नव्हती. हितसंबंधी मंडळींनी अर्धसत्यच सांगितलेले होते. म्हणून गुरुजींनी ३ मे रोजी गांधीजींना उत्तर धाडले :

" पूज्य बापू, माझ्या निश्चयातील सत्य आणि पावित्र्य प्रायोपवेशनाच्या कसोटीस उतरलेच पाहिजे. आपला सल्ला मला पाळता येत नाही. क्षमा करा. आता मी स्वतःला सर्वस्वी परमेश्वराच्या हाती सोपविले आहे… स्वप्नात दिलेल्या शब्दांचे पालन करणाऱ्या हरिश्चंद्राच्या भूमीतील आम्ही लोक आहोत. आम्हीही गंभीर शब्दांना थोडेफार मोल दिले पाहिजे. . . बापू, तुमच्या जवळ अंनत दया आहे. तुमच्या दृष्टीने तुमचे लेकरू चुकत असले तरी ते स्वतःची वंचना करू शकत नाही. म्हणून तुम्हीही पाठ थोपटा, हेच तुमच्या प्रिय पूज्य चरणांजवळ मागत आहे."

गुरुजींचे पत्र घेऊन गांधीजींना वस्तुस्थिती सांगण्यासाठी श्री. अण्णासाहेब सहस्त्रबुद्धे व हरिभाऊ फाटक तातडीने दिल्लीला रवाना झाले.

अनुक्रमणिका

गुरुजींनी मंदिर प्रवेशासाठी दौरा सुरू केला व नंतर उपोषण करणार म्हणून त्या वेळच्या काँग्रेस मंत्रिमंडळाने एप्रिलच्या अखेरीस घाईघाईने मंदिर प्रवेशाचे बिल सादर केले होते. त्यावरून कायदा होणारच आहे. मग उपोषण कशाला? असाही प्रचार विरोधक करीत होते. गुरुजींना त्या वेळचे काँग्रेस श्रेष्ठीही तसा सल्ला देत होते पण गुरुजींनी त्यांना नम्रपणे सांगितले होते,

" असेंब्लीतल्या कायद्यापेक्षा मला हृदयाचा कायदा श्रेष्ठ वाटतो. सत्या-असत्याशी मन केले ग्वाही."

उपोषणाचा एकेक दिवस उलटू लागला तशी गुरुजींची प्रकृती क्षीण होत चालली होती. चिंतेंचे वातावरण सर्वत्र पसरले होते. काय होणार? हीच काळजी सर्वांच्या मनी दाटली होती.

अशा परिस्थितीतच त्या वेळच्या मध्यवर्ती कायदेमंडळाचे अध्यक्ष श्री. दादासाहेब मावळंकर हे ५ मे रोजी पंढरपूरला विठ्ठलाच्या दर्शनासाठी म्हणून आले होते. पंढरपुरातले स्फोटक वातावरण पाहून त्यांनी चौकशी केली, तेव्हा त्यांना गुरुजींच्या उपोषणाची सांद्यत हकीगत कळली. दादासाहेबांनी लगेच हालचालींना सुरुवात केली. बडवे मंडळीशी वाटाघाटी केल्या. उपलब्ध १९३८ चा 'टेंपल ॲक्ट' पाहिला आणि त्यांनी त्यानुसार बडवे मंडळींना समजावून सांगितले. बरीच चर्चा केली. या चर्चेचा परिणाम तरुण बडवे मंडळींवर झाला. त्यांनी बदलत्या काळाची चाहूल हेरली. त्यांनी वृद्धांना बाजूला सारून तडजोडीची भूमिका घेतली. त्यांनी तसे निवेदन न्यायालयात सादर केले. हरिजनांना मंदिर प्रवेश देण्यासाठी बडव्यांची हरकत राहिली नाही.

दादासाहेबांनी गुरुजींची भेट घेतली व त्यांनाही सर्व कायदेशीर बाजू समजावून दिली . कारण अस्तित्वात असलेल्या कायद्यानुसार मंदिराचे ट्रस्टी बडवे हे गुरुजी म्हणतात तसे मंदिराचे दरवाजे हरिजनांना खुले करू शकत नव्हते, ही वस्तुस्थिती होती. दादासाहेबांनी तीच गुरुजींना सांगितली व उपोषण मागे घेण्याची विनंती केली गुरुजींनी सर्व वस्तुस्थिती लक्षात घेऊन मोठ्या ना खुषीने ही विनंती मान्य केली.

दादासाहेबांनी गांधीजींनाही तार करून परिस्थिती कळवली. गांधीजींची परत तार आली, " श्री. मावळंकरांच्या सल्ल्याने काम करावे."

त्यानंतर आवश्यक ती कायदेशीर तरतूद झाल्यावर १० मे १९४७ रोजी संध्याकाळी दादासाहेब, मंदिराचे ट्रस्टी, बडवे, उत्पात यांचे प्रतिनिधी सर्वजण गुरुजींकडे आले. दादासाहेबांनी निवेदन वाचून दाखवले आणि उपोषण सोडण्याची विनंती केली. उपोषणकाळात गुरुजींनी श्रीविठ्ठलाचे एक चित्र आपल्याजवळ ठेवले होते. त्या विठ्ठलाला त्यांनी वंदन केले, डोळे मिटून क्षणभर मूक प्रर्थना केली आणि आपल्या वहिनींच्या हातून मोसंबीचा रस घेऊन १० दिवसांचे उपोषण सोडले.

उपोषण सुटल्याची वार्ता कळताच सर्वत्र आनंदाचे वातावरण पसरले. गुरुजींचे प्राण वाचले याचे अपूर्व समाधान सर्वांना झाले. त्याच दिवशी दिल्लीच्या प्रार्थनासभेत गांधीजी म्हणाले, " आज आणखी एक आनंदाची बातमी आली आहे. पंढरपूरचे पुरातन आणि प्रसिद्ध असे मंदिर इतर हिंदूंप्रमाणेच हरिजनांसाठीही खुले झाले आहे. याचे खास श्रेय साने गुरुजींना आहे. हरिजनांसाठी हे मंदिर उघडावे म्हणून त्यांनी आमरण उपवास आरंभिला होता."

महाराष्ट्रातून अभिनंदनाचा वर्षावच गुरुजींवर झाला!

अनुक्रमणिका

पंढरपूरचे विठ्ठल मंदिर हरिजनांसाठी खुले केले एवढेच श्रेय गुरुजींना लाभलेले नाही, तर तेराव्या शतकात ज्या सामाजिक क्रांतीचा श्रीगणेशा, महाराष्ट्राचा ‘बडा बंडवाला’ श्रीज्ञानदेव यांनी केला होता व जी समतेच्या सामाजिक क्रांतीची पावले पंढरीच्या वाळवंटातच त्या वेळी थबकून राहिली होती, ती समताधिष्ठित सामाजिक क्रांती विसाव्या शतकात साने गुरुजींनी पंढरीरायाच्या चरणापर्यंत पोहोचवली होती. ह्या एका फार मोठ्या कामगिरीचे श्रेयही गुरुजींनाच आहे.

संस्कृतातली ज्ञानभंडारे बहुजनांसाठी मायबोलीत आणण्याचेच केवळ कार्य ज्ञानदेवांनी केले नव्हते, तर भागवत धर्माची प्रस्थापना करून आध्यात्मिक लोकशाहीचा ध्वजही पंढरीच्या वाळवंटात फडकविलेला होता. अवघे जन सांगाती घेऊन, भेदभावाला तिलांजली देऊन, ‘नाचू कीर्तनाचे रंगी’ म्हणणाऱ्या नामदेवांसह सर्व संत मंडळी एका ध्वजाखाली एक झाली होती. ज्ञानदेव-निवृत्तीनाथांसह नामा शिंपी तर होताच, पण सावता माळी, गोरा कुंभार, नरहरी सोनार आदी अठरा पगड जातीतील संतांबरोबर चोखोबा महार, रोहिदास चांभार आणि मुक्ता व जनी हे सर्वजण होते. ज्या शूद्रांना आणि स्त्रियांना ज्ञानापासून वंचित ठेवले होते, तो ज्ञानाचा हक्क मुक्ता-जनीच्या व चोखोबा-रोहिदासांच्या रूपाने इथे मान्यता पावलेला दिसतो. ही समतेची नांदी गाणारी दिंडी दुर्दैवाने तिथेच थबकली होती. नव्हे नंतरच्या मतलबी धुरिणांनी त्या संतांचा नामगजर करीत त्यांचीच समतेची शिकवण दूर सारलेली होती आणि एखादा एकनाथ, तुकोबा वगळता अन्य धर्मलंड श्रेष्ठींनी समतेच्या दिंडीत पुनश्च विषमतेचे बीजच घुसडून जोपासलेले दिसते. परंतु साने गुरुजींनी आपल्या प्राणाची बाजी लावून पुनश्च त्या संतांच्या समतेच्या उदार शिकवणुकीला उजाळा दिला होता. या दृष्टीने पाहता साने गुरुजींचे महाराष्ट्रातील एक सामाजिक क्रांतिकारक म्हणून श्रेष्ठत्व लक्षात येते.

❏

अनुक्रमणिका

# २२. 'कर्तव्य' आणि 'साधना'

पंढरपूराहून परतल्यावर गुरुजी एक-दोन महिने बंधूंकडे बोर्डीला राहिले. उपवासाने आलेली शारीरिक क्षीणता थोडी कमी झाली; परंतु उपवासाच्या निमित्ताने जे काही भलेबुरे घडले होते, त्याने आलेली मानसिक खिन्नता गेलेली नव्हती. म्हणून गुरुजी कुठे जात-येत नव्हते.

१५ ऑगस्ट १९४७ रोजी देश स्वतंत्र झाला. त्या वेळी गुरुजी पुण्यात आपल्या प्रसूत वहिनींची सेवा करीत होते. त्या दिवशी त्यांनी राहत्या खोलीवर राष्ट्रीय झेंडा लावला. तोरण बांधले. संध्याकाळी मेणबत्त्या लावून आरास केली. मनःपूर्वक आनंदाने, पण साधेपणाने, गंभीरपणाने, मूकपणाने त्यांनी स्वातंत्र्याचे स्वागत केले होते!

मित्रांच्या आग्रहाने पुढे गुरुजींनी मुंबईत 'कर्तव्य' नावाचे सायंदैनिक काढावयाचे ठरवले. त्याची जुळवाजुळव सुरू झाली होती. परंतु ३० जानेवारी १९४८ रोजीच महात्माजींचा दिल्लीत वध झाला. गुरुजींवर दुःखाचे आकाशच कोसळले. गुरुजींच्या जीवनात गांधीजींना अनन्यसाधारण असे स्थान होते.

" एक परार्धांश गांधी, एक परार्धांश रवींद्रनाथ, एक परार्धांश रामकृष्ण हा माझा आदर्श आहे. गांधीजींचा सेवावृत्ती, रवींद्रांची कवित्ववृत्ती आणि रामकृष्णांची भक्ती यांचे मिश्रण माझ्यात आहे. हात थोडेफार सेवेत राबावेत, ओठ एखादे गोड गाणे गुणगुणत असावेत आणि भक्तीने सर्वांविषयीच्या प्रेमाने हृदय भरलेले असावे ह्या तीन माझ्या क्षुधा आहेत. ह्या तीन वृत्ती समाधान पावल्या की मी समाधानी राहीन." असे गुरुजी म्हणत असत. गांधीजींवर त्यांची अपार भक्ती होती. गांधीजींना गुरुजींच्या जीवनात सुर्यासारखे स्थान होते. म्हणूनच त्यांनी गांधीहत्येनंतर " माझ्या जीवनातील सुर्य मावळला!" असे दुःखोद्‌गार काढले होते.

गांधीजींचा खुनी महाराष्ट्रीय आहे हे कळल्यावर तर गुरुजींना फारच वाईट वाटले. ते व्यथित बनले. महाराष्ट्रावरचा हा कलंक अंशतः तरी दूर व्हावा, त्या पापाचे प्रायश्चित घ्यावे, महाराष्ट्राच्या जीवनातून जातीयता नष्ट व्हावी, या हेतूंनी एक महाराष्ट्रीय म्हणून गुरुजींनी १ फेब्रुवारी १९४८ पासून २१ दिवसांचे उपोषण आरंभिले होते.

याच उपोषण काळात ११ फेब्रुवारीपासून गुरुजींनी 'कर्तव्य' सायंदैनिकाचे प्रकाशन सुरू केले होते. 'कर्तव्य' दैनिकाच्या मथळ्याच्या ठिकाणी गांधीजींच्या रेखाचित्राखाली गुरुजींनी पुढील ब्रीदवचन छापले होते :

*"स्मरुनी हृदय तूंते । कर्तव्य निज चालवूं ।"*

गुरुजींचे २१ दिवसाचे उपोषण पार पडले. या काळात महाराष्ट्रभर सेवादलाने जातीयताविरोधी प्रचार केला. 'कर्तव्य' दैनिकापासून गुरुजींनी 'बापूजीं'च्या गोड गोष्टी प्रथम लिहिल्या .

पारतंत्र्यात परक्या सत्तेशी गुरुजींना झुंज घ्यावी लागली होती, पण स्वातंत्र्यातही हे टळले नव्हते. स्वातंत्र्य मिळून सात-आठ महिनेच झाले होते. पण गांधीवधाचे निमित्त करून गृहमंत्री मोरारजी देसाई यांनी जातीय संस्थेबरोबरच राष्टसेवादलावरही बंदीचा वरंवटा फिरवला होता. गुरुजींनी 'कर्तव्य' दैनिकातून या अन्यायाचा कडाडून निषेध केला.

अनुक्रमणिका

‘कर्तव्य’ सायंदैनिक जेमतेम चार महिने चालले आणि पुढे ते आर्थिक ओढाताणीमुळे बंद पडले. ‘कर्तव्य’ दैनिक बंद झाले, पण गुरुजींसारख्या समाज शिक्षकाला व सेवकाला असे कर्तव्यच्युत होऊन रहाणे कसे आवडणार? त्यांची तगमग चाललेलीच होती. स्वातंत्र्यानंतरचे प्रश्नपुढे ठाकले होते. त्यांना सामोरे जायचे होते. लेखणी हे गुरुजींचे एक अमोघ साधन होते. तिच्या उपासनेतच त्यांना पुढची साधना करावी अशी तळमळ वाटत होती. आणि या तळमळीतूनच १५ ऑगस्ट १९४८ रोजी दुसऱ्या स्वातंत्र्यदिनी ‘साधना’ साप्ताहिकाचा मुंबईत जन्म झाला.

गुरुजींच्या कुशल, चतुरस्त्र, साक्षेपी संपादनाखाली ‘साधना’ साप्ताहिक लवकरच महाराष्ट्रात लोकप्रिय झाले. “ लिहिणे हा माझा थोडासा स्वधर्म आहे. परंतु ती माझी जीवनव्यापी वृत्ती नाही. मी झाडूच्या लालित्याचा उपासक आहे. मी ‘साधना’ चालवितो काही विचार जनतेत जावे, अशी तहान वाटते म्हणून.” असे आपल्या लेखन प्रवृत्तीबद्दल गुरुजींनीच म्हटले आहे.

‘साधना’ साप्ताहिकाच्या प्रकाशनाबद्दल त्यांनी लिहिले होते., “ वैरभाव नि विषमता नष्ट करण्याची थोर साधना अपणास करावयाची आहे, या ध्येयाने हे ‘साधना’ साप्ताहिक निघत आहे...”

‘साधने’च्या प्रत्येक अंकात विविध विषयांवर गुरुजी लिहित असत. गुरुजींच्या कामाच्या झपाटा और होता. अंकासाठी त्यांच्याकडे मजकुराला कधीच तोटा नसे. ते स्वतः तर पुष्कळ लिहीतच, पण अनेक वेळा दुसऱ्यांचे आलेले काही लेखही अनेक वेळा लिहून काढीत असत. अग्रलेख, माहितीपर लेख, परिचय, व्याख्यानांचे सारांश, गोष्टी, चरित्रे, कितीतरी बहुमोल असे ललित व वैचारिक साहित्य गुरुजींनी ‘साधने’तून भरभरून वाचकांना दिले. लोकशाही समाजवाद हेच स्वातंत्र्योत्तर ध्येय ठरवून त्यांनी ‘साधने’तून समाजवादी विचारांचा आणि आंदोलनाचा हिरिरीने पुरस्कार केला.

‘साधने’च्या व्यापातून वेळ होत नसे, पण तरीही कधी कधी मित्रांच्या आग्रहावरून ते दौऱ्यावर जात असत. भाषणे, मेळावे करीत असत.

अन्यायाचे तर ते दावेदारच होते. न्यायासाठी संघर्षाला ते माघारी रहात नसत. असाच एक समरप्रसंग स्वातंत्र्यातही उभा राहिला. १९४९च्या ऑक्टोबरमध्ये मंत्रिमंडळाने शिक्षणखात्यामार्फत एक पत्रक काढून शिक्षक व विद्यार्थी यांना राजकारणात भाग घेण्यास बंदी घातली होती. या निर्बंधाने गुरुजी अस्वस्थ झाले. त्यांना जबर धक्काच बसला होता. स्वातंत्र्यात स्वातंत्र्यावर स्वतंत्र सरकारकडून असा काही घाला येईल, स्वातंत्र्याचा अशा प्रकारे संकोच केला जाईल, याची गुरुजींना स्वप्नातही कल्पना नव्हती. स्वातंत्र्याचे अतीव सुंदर, सुरेख रूप ते मनाशी कैक वर्षे रंगवीत आले होते. परंतु स्वातंत्र्यानंतर घडत चाललेल्या एकेक घटनांनी त्यांचा मनोभंग होत चालला होता. सेवादलावर बंदी, त्यानंतर ही बंदी. गुरुजींनी ‘साधने’तून कडक टीका केली, “ सरकारच्या या हुकुमाचा माझ्या प्राणार्पणाच्या निर्धाराने निषेध करावयाचा असे मी ठरविले आहे. हे सरकार ठायी ठायी अन्याय करीत आहे. मी दुःखी होत आहे. यासाठी का राष्ट्र लढले? हे का स्वातंत्र्याचे फळ? मला वेदना होतात...”

मुंबईतील एका सभेत गुरुजींनी सरकारी हुकूम टरकावून जाहीर निषेध केला! २४ डिसेंबरपासून उपोषणाचा निर्णय जाहीर केला.

महाराष्ट्रातील विचारवंत, वृत्तपत्रे आदींनीही या सरकारी हुकूमावर टीका केली होती.

अनुक्रमणिका

चोहोकडून झालेल्या टीकेमुळे व गुरुजींच्या उपोषणाच्या निर्धाराने उशिरा का होईना, सरकारचे डोळे उघडले आणि ते लोकशाही व स्वातंत्र्याविरोधी काळे फर्मान सरकारने मागे घेतले.

गुरुजींचे २४ डिसेंबरपासूनचे संकल्पित उपोषण रद्द झाले आणि त्याच दिवशी शिवाजी पार्कवर सेनापती बापट यांच्या अध्यक्षतेखाली गुरुजींचा पन्नासावा वाढदिवस साजरा करण्यात आला.

❏

अनुक्रमणिका

## २३. आंतरभारतीचा ध्यास

'आंतरभारती' हे गुरुजींनी आपल्या हृदयाशी बाळगलेले एकात्म भारताचे महन्-मंगल असे सुंदर स्वप्न होते. भारताच्या विविधतेमधून एकतेचे दर्शन घेण्याची 'अविभक्त विभक्तेषु' अशी ही थोर दृष्टी होती. या आपल्या स्वप्नाच्या पूर्तीला थोरामोठ्यांचा हातभार लागावा म्हणून पुणे येथे आचार्य जावडेकर यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या साहित्य संमेलनासाठी गुरुजी गेले होते. संमेलनात गुरुजींनी 'आंतरभारती'चा ठराव मांडला होता. या ठरावावर गुरुजींनी जे कळकळीचे भाषण केले होते. ते एकून सारे साहित्य रसिक प्रभावित झाले होते.

संमेलनाच्या आधी 'साधने'च्या एका अंकात गुरुजींनी 'आंतरभारती'विषयी लिहिताना म्हटले होते

" १९३० साली आम्हाला त्रिचनापल्लीच्या तुरुंगात ठेवण्यात आले होते. अंमळनेरच्या हायस्कूलमधील नोकरी सोडून मी सत्याग्रहात सामील झालो होतो. आमच्या शाळेत एक बंगाली मित्र होते. त्रिचनापल्लीच्या तुरुंगातील एक मित्र श्री. व्यंकटाचलम् सुटणार होते. त्यांना तमीळ, तेलगु, मल्याळम भाषा येत होत्या. ते बी. एस् सी. होते. मी अंमळनेरच्या मित्रांना लिहिले, " त्यांना आपल्या शाळेत घ्या. बंगाली मित्र आहेत. हे दक्षिणेकडील एक मित्र होतील. आपली शाळा भारतीय ऐक्याचे प्रतीक होवो. त्या त्या प्रांताची भाषा कानी येईल. त्या त्या प्रांताची संस्कृती, वाङ्मय सारे कळेल. तेव्हापासून माझ्या मनात स्वप्न होते की, केव्हातरी अशी संस्था काढायची, जी भारताचे ऐक्य शिकवील, अनुभवील. आपण अखंड भारत म्हणत आलोत, परंतु या भारताचे आपणांस ज्ञान नाही. हे सारे प्रांत माझे भाऊ. सर्वांना भेटेन, सारे अभ्यासीन, असे आपणास कोठे वाटते? महात्माजी देशातील निरनिराळ्या भाषा वेळात वेळ काढून अभ्यासीत. पू. विनोबाजी तेच करीत आले. आपणापैकी कितीकांना ही तहान आहे? मुंबईत रशियन, जर्मन, फ्रेंच वगैरे भाषा शिकवायची सोय आहे; परंतु अशी संस्था नाही; जेथे सकल भारतीय भाषा शिकता येतील. परंतु प्रांतभारती संस्था स्थापण्याचे माझे कधीपासूनचे स्वप्न. सुंदरशी जागा असावी, सरकारजवळ मागावी किंवा कोणा भल्या सज्जनाने दिली तर कृतज्ञतेने घ्यावी. त्या त्या प्रांतीय भाषेतील वाङ्मय तेथे राहील. संस्थेला जोडून विद्यालय असावे. शेती, हस्तोद्योग असावेत. भारतीय भाषा शिकवण्याची तेथे सोय होईल. विद्यार्थ्यांच्या कानांवर सर्व भाषा पडतील. त्या त्या साहित्यांचे मराठीला परिचय करून देण्यात यावेत. इतर भाषांतूनही मासिके काढून त्या त्या प्रांतीयांना सकल भारताची ओळख करून द्यावी. असे माझे स्वप्न. गुरुदेव रवींद्रनाथ विश्वकवी. त्यांनी विश्वभारती स्थापिली. जगाचा नि भारताचा संबंध असू दे. पूर्व ती पूर्व, पश्चिम ती पश्चिम असे नाही. पूर्वेकडून निघाला तो पश्चिमेला भेटतो, पश्चिमेकडून निघाला तो पूर्वेला भेटेल. पृथ्वी वाटोळी आहे. पूर्ण आहे. भारत विश्वाच्या ऐक्याचा अनुभव घेण्यासाठी आहे. स्वतःचा अनुभव घ्या. भारतातील प्रांतांची तरी एकमेकांस ओळख कुठे आहे? त्या त्या प्रांताचे सांस्कृतिक कार्य, नवसर्जन आपणांस कोठे आहे माहीत? आंतरभारती भारतीयांना एकमेकांची भक्तिप्रेमाने ओळख करून देईन. त्या त्या प्रांतातील सर्व क्षेत्रातील थोरामोठ्यांच्या तेथे तसबिरी राहतील; हे सारे नव भारत निर्माते असे नवपिढीला सांगण्यात येईल.

" साहित्याबरोबर तेथे चित्रकला, नृत्यकला यांचाही अभ्यास असावा. सहकारी शिक्षण दिले जावे. नवभारताच्या निर्मितीचे ते एक तीर्थक्षेत्र असावे. माझ्या डोळ्यांसमोर सुंदर स्वप्न आहे. प्रांत भारतातील मुले सुट्टीत खेडोपाडीत जातील. मेळे, संवाद करतील. स्वच्छता करतील. प्रांतभारतीतून सहकारी चळवळ फैलावायाला ध्येयवादी तरुण बाहेर पडतील. ग्रामीण कला तेथे फुलतील. कोकणातील काटखेळ, नाना नाच तेथे अभ्यासिले जातील. मौज, आनंद! सेवा, संस्कृती, उदारता, ज्ञान, विज्ञान, कला अशी एक गंभीर प्रकृती आंतरभारती निर्मू पाहील."

अनुक्रमणिका

परंतु हे स्वप्न कृतीत कसे आणावयाचे? महाराष्ट्रभर भिक्षा मंडळे स्थापावीत आणि गीतेवर प्रवचने देत सर्वत्र हिंडावे, शेवटच्या दिवशी आंतरभारतीसाठी मदत मागावी, अशी योजनाही गुरुजींच्या मनात घोळत होती.

त्या काळी आंतरभारतीची आवश्यकता आणखी एका कारणामुळे गुरुजींना तीव्रतेने लागली होती. स्वातंत्र्य मिळाले होते. स्वातंत्र्यानंतर भाषावार प्रांतरचना करण्यास काँग्रेस पूर्वीच वचनबद्ध झालेली होती. स्वातंत्र्यानंतर त्या त्या प्रांतातला कारभार त्या त्या भाषेत चालावा. तिथल्या सामान्य माणसाला सर्व क्षेत्रात आपल्या मातृभाषेचा वापर करण्याची संधी मिळावी; त्या त्या भाषेची साहित्य, कला, संस्कृतीविषयक समृद्धी वाढावी आणि या द्वारा तिथल्या माणसाची अस्मिता जागावी हे इष्टच होते. परंतु इष्ट ते घडत असताना अनिष्टही टाळणे आवश्यक होते. त्या त्या प्रांतातील माणसांची प्रांतीय भावनाच वाढीस लागून अतिरिक्त प्रांताभिमानात तिचे पर्यावसान होऊ नये, भारताच्या एकात्मतेला ती बाधक ठरू नये याची खबरदारी घेणे आवश्यक होते. भाषावर प्रांतरचनेमधील प्रांतीय दुरभिमान वाढीस लागण्याचा धोका लक्षात घेऊनच गुरुजींनी पुढे असे म्हटले होते :

“ आज स्वतंत्र भारताची टोलेजंग इमारत उभी रहायची आहे. भाषावर प्रांतरचना पूर्वीच मंजूर झालेली आहे. परंतु अशी रचना केली जात असताना द्वेष, मत्सर न फैलावोत, परस्पर प्रेम राहो, सहकार्य राहो, भारताचे हृदय एक आहे ही जाणीव सर्वांना राहो. परमेश्वराला सहस्रशीर्ष, सहस्राक्ष अशी विशेषणे आपण देतो. परंतु सहस्रहृदय असे विशेषण कधीच नाही आढळत. परमेश्वराला हृदय एकच. त्याचप्रमाणे भारताचे प्रांत अनेक झाले तरी अंतःकरण एक असो.

“ प्रांतांनी भारती व्हावे व भारताने अतिभारती व्हावे. आपण क्षुद्र कुंपणे घालून बसता कामा नये. व्याप वाढवाल तर वैभव वाढेल. संकुचितता सोडा.”

पुढे भाषावर प्रांतरचना झाल्यावर सरहद्दी, नद्यांचे पाणी, कारखाने, विविध प्रकल्प इत्यादी गोष्टींवरून राज्याराज्यांमध्ये उद्‌भवलेले तंटे आणि त्यावरून प्रकट झालेली प्रांतीय भावना हा एक चिंतेचाच विषय बनला आहे. त्यासाठीच अखिल भारतीय पातळीवर राष्ट्रीय एकात्मतेचा विचार करण्याची पाळी सरकारसह सर्व विचारवंतांवर आली. ही घटना चांगली नसली तरी या एकाच गोष्टीवरून गुरुजींच्या द्रष्टेपणाची कल्पना येते. ही भावी समस्या स्वातंत्र्याच्या उषःकालीच गुरुजींनी जाणून घेऊन ‘आंतरभारती’चा उपाय, मार्ग सुचवलेला होता! गुरुजींची ‘आंतरभारती’ ही भारतीयांच्या दृष्टीने एक अत्यावश्यक अशी ज्वलंत जीवननिष्ठाच आहे! भारत ऐक्याची तहान असलेली व्यापक जाणीव आहे! भारतीय जीवन समृद्धीची विशाल दृष्टी आहे! आणि म्हणूनच गुरुजींनी आपली ही कल्पना अधिक विशद करताना पुढे म्हटले आहे :

“ केवळ भाषांचा अभ्यास हेच काही या संस्थेचे ध्येय नव्हे. तेथे दुसऱ्याही अनेक चळवळी जोडाव्या असे मनात आहे. कला आणि ग्रामीण जीवन यांचा तेथे अभ्यास व्हावा. धंद्यातून कला कशी नेता येईल, ते येथे कलावान सांगतील. साध्या चटयाच विणायच्या परंतु त्यांच्यात सुंदरता कशी आणता येईल, साध्या बांबूच्याच टोपल्या परंतु त्यात कला कशी मिसळता येईल, साधी मातीची भांडी परंतु ती रमणीय कशी करता येतील, हेही येथे अभ्यासिले जावे, शिकविले जावे. म्हणून ग्रामोद्योग तज्ज्ञ व कलावान यांना येथे सन्मानाचे स्थान राहील. नाना प्रकारचे नृत्य प्रकार, तेही तेथे संग्रहित करून त्यांचा प्रचार करू. सहकारी जीवनाचे शिक्षण देऊ. जर संस्थेभोवती बरीच जमीन असेल तर फुलझाडे, शेती, फळझाडे यांचे प्रयोग करू. विद्यार्थी श्रमतील, नवीन नवीन निर्माण करतील. माझ्या मनातील स्वप्न अनंत आहे...”

अनुक्रमणिका

तथापि, “ कोठून तरी राष्ट्राचे महान ऐक्य जीवनात अनुभविण्याचे मंगल प्रयत्न होवोत” एवढीच तहान अखेरच्या दिवसांत त्यांना होती.

❑

अनुक्रमणिका

# २४. महाप्रस्थान

१९५० च्या मे महिन्यात राष्ट्रसेवादलाचे वासंतिक शिबिर सांगली येथे भरले होते. गुरुजींना सेवादल म्हणजे प्राणवायू! ते सांगलीला गेले. दल सैनिकांपुढे बोलताना त्यांनी आंतरभारतीप्रमाणेच 'सेवापथकाची'ची अभिनव कल्पना मांडली. ते म्हणाले,

" जातिधर्मनिरपेक्ष अशी महान राष्ट्रीय भावना, तिचा प्रचार, अधिक धान्याची उत्पत्ती, स्वच्छता, साक्षरता-प्रसार, सहकारी शिक्षण अशा निरनिराळ्या आजच्या गरजा आहेत. सेवादलाने हे व्यापक शिक्षण, या गरजा भागवणारे शिक्षण स्वतः घेऊन राष्ट्राला द्यायला उभे राहिले पाहिजे. कणभरही निर्मळ सेवा तारणारी आहे. मणभर सेवा की कणभर सेवा, हा महत्त्वाचा प्रश्न नाही. ही दृष्टी, तो ध्यास आहे की नाही, हा प्रश्न आहे. जोवर सेवादलाजवळ सेवेचा प्राण आहे, तोवर सेवादल अमर आहे. लिहा-वाचायला शिका आणि भूमातेच्या सेवेला जा. घरे बांधा, बांध घाला, नद्यानाले अडवा, खते फुकट नका दडवू, रस्ते करा, गायराने ठेवून बाकीची सारी जमीन लागवडीस आणा... क्षुद्र भेदांच्या पलीकडे जाऊन अंतरात्म्याला पाहाणारी ज्यांची दृष्टी असे शेकडो सेवादल सैनिक, हे नवव्रती तरुण जर भारताला मिळतील तर आलेले स्वराज्य पुरूषार्थप्रद आज ना उद्या करता येईल."

मेच्या अखेरीस गुरुजी कर्नाटकात धारवाड, हुबळी, गदग इत्यादी ठिकाणी गेले होते. तिथे त्यांची गीतेवर प्रवचने झाली. आंतरभारतीच्या दृष्टीने शेजारच्या प्रांताची ओळख झाली. कन्नड वाङ्मयासंबंधी बरीच माहिती मिळाली. लोकजीवनाचे जवळून दर्शन घडले.

कर्नाटकचा दौरा संपवून २ जून रोजी गुरुजी मुंबईला परतले आणि पुढच्याच आठवड्यात मनीध्यानी नसताना गुरुजींनी आपली जीवनज्योत मालवून या जगाचा निरोप घेतल्याची अत्यंत कटू वार्ता साऱ्या महाराष्ट्राला, भारताला ऐकायला मिळाली.

११ जून १९५० चा तो दिवस होता. अवघ्या महाराष्ट्राला गुरुजींच्या निधनवार्तेने धक्का बसला!

'साधने'च्या त्या दिवशीच्या खास अंकात रावसाहेब पटवर्धन यांनी हे दु:खद वृत देताना लिहिले होते :

" पू. साने गुरुजी आज पहाटे चार वाजता ईहलोक सोडून देवाघरी गेले! त्यांच्या आकस्मिक देहान्तवासाचे वृत्त ऐकून अवघ्या महाराष्ट्राला धक्का बसेल. हजारो तरुणांचे साने गुरुजी हे एक आराध्यदैवत होते. शेकडो तरुणांना गुरुजी मातेसमान वाटत. महाराष्ट्राच्या नैतिक व सांस्कृतिक मूल्यांची गुरुजी व त्यांची 'साधना' म्हणजे अंखड वाहणारी भागीरथी होती. . . "

गुरुजींना नैसर्गिक मृत्यू आलेला नव्हता. त्यांनी तो झोपेच्या गोळ्या घेऊन जवळ केलेला होता. गुरुजींनी हे असे कां केले होते? आजही अनेकांच्या मनी हे कुतूहल आहे.

गुरुजींच्या प्रकृतीतच, अगदी प्रथमपासूनच त्यांना मृत्यूची विलक्षण ओढ असल्याचे दिसते. सेवेचे प्रचंड काम करूनही आपल्या हातून काहीच सेवा होत नाही, असे त्यांना वाटत असे. त्यांनी स्वतःसंबंधी एके ठिकाणी लिहिले आहे, " माझे स्थान मला कोठेच दिसत नाही. मला वर्णच नाही. नवीन सर्वोदयकारी विचार देणारा मी ब्राह्मण नाही, अन्यायाविरुद्ध तडफेने उठून, बंडाचा झेंडा उभारून मारण-मरण करणारा मी क्षत्रिय नाही. देशातील

अनुक्रमणिका

उद्योगधंदे कसे वाढतील ; कृषी—गोरक्षण कसे सुधारेल; ग्रामोद्योग कसे जगतील; मधुसंवर्धन विद्या, कागदाचा धंदा वगैरे कसे पुनरुज्जीवित होतील यासंबंधी मला काही येत नाही. मी केवळ मजुरी करणारा शूद्रही नाही. कारण मजुरीची सवय नसल्याने तासन् तास शरीरश्रम मी करू शकत नाही. मग माझा उपयोग काय? रांत्रदिवस हा विचार मला टोचीत असतो. मला खाणे विषमय वाटते, जगणे असह्य होते. ज्याला प्रामाणिकपणे वाटते की आपण भारभूत आहोत त्याने खुशाल जीवन संपवावे…”

स्वतःविषयी अत्यंत लघुत्वाची, नव्हे तर नगण्यतेची भावना त्यांच्या मनी वसत होती. यात त्यांच्या ठायीची प्रांजळ नम्रता, सौजन्य, लीनता, ऋजुता हे सर्व श्रेष्ठ गुण होते. ‘आपला जगाला काही उपयोग नाही’ ह्या उपयुक्ततेच्या दृष्टीने त्यांनी असे स्वत:चे मूल्यमापन केले होते, तसेच त्यांच्या ठायी मृत्यूचे आकर्षणही जबरदस्त दिसते. ‘मृत्यूचे महाकाव्य’ नावाचे एक प्रकरणच त्यांनी आपल्या ‘भारतीय संस्कृती’ नामक ग्रंथात लिहिलेले आहे. गुरुजी लिहीतात, “ मृत्यू म्हणजे जीवनातल्या वृक्षाला लागलेले गोड फळ. गीतेने मरण म्हणजे वस्त्र फेकणे असे म्हटले आहे. काम करता करता हे वस्त्र जीर्ण झाले, फाटले की त्रिभुवन माउली नवीन वस्त्रे देण्यासाठी आपणास बोलाविते. पुन्हा नवीन आंगडे—टोपडे लेववून या जगाच्या अंगणात खेळावयास ती पाठवते आणि दुरून गंमत बघते….

“ मृत्यू म्हणजे महामाया, महाप्रस्थान! मृत्यू म्हणजे महानिद्रा! दररोजच्या धडपडीनंतर आपण झोपतो. झोप म्हणजे लघुमरण. सर्व जीवनाच्या धडपडीनंतर असेच आपण झोपतो. रोजची झोप आठ तासांची, परंतु ही झोप मोठी असते एवढाच फरक!

“ मृत्यू म्हणजे आईच्या कुशीत जाऊन झोपणे! लहान मूल दिवसभर खेळते, खिदळते, रडते, पडते. रात्र पडताच आई त्याला हळूच उचलून घेते. त्याची खेळणी वगैरे तेथेच पडतात. आई त्याला कुशीत घेऊन झोपते. आईची उब घेऊन बाळ ताजेतवाने होऊन सकाळी पुन्हा दुप्पट उत्साहाने चेष्टा करू लागते. तसेच जीवनाचे! जगात दमलेल्या, श्रमलेल्या जीवाला ती माता उचलून घेते.

“ जन्मदायी माता, भारतमाता आणि विश्वमाता जगदंबा यांनी आजवर माझा संभाळ केला. आता मृत्यूमातेच्या मांडीवर डोकं ठेवून या मातांचा निरोप घेणार! मरण हे उपकारक आहे. जीवनाने जे काम होत नाही, ते कधी कधी मरणाने होते. आपल्याला वाटते, मरण म्हणजे अंधार परंतु मरण म्हणजे निर्वाण, म्हणजेच अनंत जीवन पेटवणे. मरण म्हणजे अमर आशावाद आहे. मरण म्हणजे पुन्हा नवीन जोमाने, नवीन उत्साहाने ध्येयाची सिद्धता. मरणाची भीती कशाला? निद्रेची भीती नाही. मग चिरनिद्रेची काय म्हणून?”

मृत्यूकडे पाहण्याची गुरुजींची अशी असामान्य काव्यात्म, सौंदर्यवादी दृष्टी होती.

*‘येई ग आई । मज माहेराला नेई!’*

अशी त्यांची मृत्यूमातेकडे विनवणी होती. ही अशी सर्वस्व समर्पण करून निघून जाण्याची तीव्र वृत्तीच त्यांची होती. तशात काही शारीरीक त्रासही होऊ लागला होता. डोकेदुखी, निद्रानाश, घशाचा त्रास होऊ लागला होता. गुरुजींना वाटे, ‘ज्या शरीराने इतरांची सेवा करायची, त्या शरीराला इतरांकडून सेवा घ्यायची वेळ येऊ नये. तसे होण्याआधी हे शरीरच विसर्जित केलेले बरे!’

पंढरपूरच्या उपवासाच्या वेळी अनुभवास आलेली कटुता, असत्यपणा, गांधीजींच्या वधाने पसरलेला अंधार, स्वातंत्र्यप्राप्तीनंतर स्वकीयांशी न्यायासाठी करावे लागणारे संघर्ष, त्यातून उद्‌भवलेले मनोमालिन्य या सर्वांचाच मिळून परिणाम म्हणजे गुरुजींचे देहविसर्जन होय!

गुरुजींच्या जाण्याने महाराष्ट्रातील बाल तरुणवर्ग पोरका झाला. पण गुरुजींनी त्यांच्यासाठी लिहून ठेवलेले वाङ्‌मय त्यांना निरंतर प्रेरणा देत राहील.

गुरुजींच्या निधनानंतर अनेक थोरामोठ्यांनी शोक व्यक्त केला. विनोबाजी म्हणाले, " माझ्याहून शरीराने ते मजबूत आणि वयाने लहान होते. जेमतेम पन्नास वर्षांचे वय असेल. पण एवढ्यात त्यांनी प्रचंड कामगिरी केली! महाराष्ट्रातील सबंध तरुण पिढी त्यांनी आपल्या विचाराने भारून टाकली. बाळगोपाळांना वेड लावले!

" रामकृष्ण, रवींद्रनाथ आणि गांधी या त्यांच्या तीन देवता होत्या. तिघांचे अंश त्यांच्या ठिकाणी उतरले होते. 'येता जाता, उठता बसता, कार्य करिता। सदा देता घेता, वदनि वेदता, घास गिळता'—चोवीस तास परमार्थाशिवाय ज्याला दुसरे चिंतन नाही असा हा पुरुष होता.

" त्यांचा पिंड राजकारणी नव्हता, पण गरिबांच्या तळमळीने त्यांना राजकारणात पडावे लागे, बोलावे लागे, लिहावे लागे. त्याच तळमळीने त्यांना समाजवादी बनविले. वस्तुतः ते समाजवादी म्हणण्यापेक्षा समाजसेवी होते. त्यांचा विशाल आत्मा सर्वांचे गुण घेणारा होता. भलेपणा जिथे आढळला तिथून त्यांनी तो उचलला.

" साहित्य तर त्यांनी अपरंपार लिहून ठेवले आहे. तरी पण ते स्वतःला साहित्यिक समजत नसत. लिहिल्याशिवाय, बोलल्याशिवाय राहवत नसे, म्हणून ते लिहीत आणि बोलत. दीनांचा कळवळा त्यांच्याकडून साहित्य वदवीत होता.

" तुकारामादिकांच्या मालिकेत मी त्यांचा निःशंक गणना करतो. त्यांना योग्याची क्षमता लाभली नव्हती, पण त्यांची उत्कट आर्त भक्ती होती. 'परपीडक तो आम्हा दावेदार' अशी त्यांची मनोभूमिका होती. यामुळे राग-द्वेषही त्यांचे प्रबळ होते. पण ते सारे देवाच्या चरणी वाहिलेले होते.

" बत्तीस साली धुळे जेलमध्ये त्यांचा-माझा परिचय झाला. पहिल्याच भेटीत गाढ मैत्री अनुभवली. तिला कारण काहीच नाही. अशाच काही अनुभवांवरून मी पूर्वजन्माची सिद्धी करीत असतो. त्यांचा तो स्नेहभाव उत्तरोत्तर दृढच होत गेला. त्यांचा तो माझ्यावर फार मोठा अनुग्रह होता.

" त्यांच्या मरणावर माझा विश्वास बसत नाही, हे त्यांनी एक नाटक केले आहे असे मी समजतो.

" अमृतस्य पुत्रः ही त्यांची वास्तविक पदवी आहे."

❏

अनुक्रमणिका

# २५. अशी नेऊया पुढेच दिंडी!

साने गुरुजी गेले. अनंतात विलीन झाले. त्यांची देहमूर्ती हरपली. पण वाङ्मयमूर्ती सर्वांसाठी चिरंतन उपलब्ध आहे.

गुरुजी आयुष्यभर झगडले, धडपडले ते सर्वांभूती कल्याणमय, आनंदमयासाठीच. या त्यांच्या वागण्यात 'धीर माझ्या मना । नाही आता नारायणा' अशी त्यांची हरक्षणी अवस्था असे. पंढरपूर मंदिर प्रवेशच्या दौऱ्यात प्रत्येक सभेत ते ही ओळ म्हणून दाखवून आपली अस्पृश्यतेच्या कामातील अधीर उत्कटता व्यक्त करीत असत. ही अधीरता खरीच, पण ती उदात्त स्वरूपातली होती! गुरुजींची अधीरता, भावनाविवशता, उतावीळपणा किंवा प्राणही झोकून देण्याची सिद्धता ही अशी उदात्तच होती. त्यांचे सारे उमाळे असे उदात्तच होते. त्यांचा संतापही उदात्त, विकारही उदात्त! गोल्डस्मिथने म्हटल्याप्रमाणे, 'Even his falls learn to virtuels side' असे त्यांच्या दोषांचेही उदात्तीकरण झालेले होते.

मानवाविषयी गुरुजींच्या ठायी असलेल्या अथांग करुणेलाच वात्सल्याचे धुमारे फुटले होते आणि या वात्सल्यानेच त्यांना समाज-मातृत्वही प्राप्त झालेले होते. मातेच्या ममतेनेच ते सगळ्यांकडेच पहात असत. चिडले, रागावले तरी तो पुन्हा मातेचाच राग होता. मुलाला काही कारणाने एखादे वेळी मारल्यानंतर आई जशी दुःखी होऊन अश्रू ढाळत बसते, तसेच गुरुजीही घरात बसत असत. स्वतःच्या आईकडून लाभलेला हा वात्सल्याचा वारसा त्यांनी समाजव्यापी बनवला. पत्निनिरपेक्ष अशा विशाल मातृत्वाचा गुरुजी एक विलक्षण आणि फार फार क्वचित आढळणारा आदर्श होते.

जन्मदात्री माता, भारतमाता आणि विश्वमाता यांच्या सेवामय निदिध्यासातून त्यांच्या ठायीच्या मातृत्वाला एवढे सहजपण लाभले होते. कमालीचे सौजन्य, दीनता, नम्रपणा त्यांच्या स्वभावात होता. याचाही परिणाम अशा प्रकारच्या ऋजुतेत झाला असावा. सेवामय, त्यागमय, कष्टमय, प्रेममय व सोशीक अशा भारतीय स्त्रीच्या संस्कृतीचा गुरुजींच्या प्रकृतीवर एवढा प्रभाव पडलेला होता!

सहज म्हणा की नियतीमुळे म्हणा, पण कोकणातल्या गुरुजींना खानदेशच्या भूमीचा लाभ झाला ही गोष्टही त्यांच्या ठायीच्या मूलद्रव्याला पोषक ठरण्यास कारण झाली आहे. गुरुजींसारखा साधा, प्रेमळ, उदार, मनस्वी माणूस एरवी अन्यत्र गुदमरून गेला असता. पण त्यांच्या वृत्तीशी खानदेशच्या माणसांची वृत्तीही जमली. खानदेशची माणसे, खानदेशची माती आणि गुरुजी या परस्परांमध्ये एवढे तादात्म्य निर्माण झाले की, मातृवात्सल्याच्या नात्यानेच ते वागले.

कोकणातला निसर्ग आणि खानदेशची माती व माणसे यांच्यावर गुरुजींनी निरतिशय प्रेम केले.

अंतरीच्या उमाळ्याने गुरुजींनी लेखणीचा वापर केला त्याच उमाळ्याने त्यांनी आपली वाणीही वापरली. लेखणी आणि वाणी ही त्यांना त्यांच्या कार्यसिद्धीसाठी लाभलेली अमोघ अशी वरदानेच होती.

गुरुजींची 'वाणी' आणि 'लेखणी'सुद्धा महाराष्ट्रात आबालवृद्धांनी ऐकलीच. त्यांना त्यांचा वाचक होता असे म्हणण्यापेक्षा श्रोता होता म्हणजेच अधिक उचित होईल. गुरुजींच्या ललित साहित्याला भाषा आहे म्हणण्यापेक्षा वाणी आहे असे म्हणणेच यथार्थ ठरेल. कारण अन्य साहित्याप्रमाणे गुरुजींच्या गोष्टी केवळ वाचल्या जात नाहीत,

अनुक्रमणिका

तर ऐकल्या जातात. त्यातून गुरुजी सारखे बोलत असतात. या बहुतेक गोष्टींचा जन्मही असा सांगता-ऐकतानाच झालेला आहे. सेवादलातल्या मुलांना किंवा तुरुंगातल्या मित्रांना त्यांच्या कोंडाळ्यात बसून सांगितलेल्या त्या गोष्टी आहेत आणि मग ते जशी सांगत असत तशीच ती गोष्ट लिहून काढत असत. त्यामुळे त्यांची लिखित भाषादेखील बोलीप्रमाणे बनली. मराठी लोकवाङ्मयातील कहाणीशी जवळीक साधणारी त्यांची भाषा आहे. गुरुजी लोकमानसात साहित्याच्या द्वारा अल्पावधित पोहोचले त्याला विषयांप्रमाणे त्यांची ही लोकवाङ्मयाशी नाते जोडणारी लोकभाषाही कारण ठरली आहे. 'हा माणूस आपले जीवन, आपली सुखदुःखे, आपल्याच भाषेत, आपल्यापाशी तादात्म्य पावून अपरंपार सहानुभूतीने रंगवतो आहे' असेच त्यांना भावले.

याच उमाळ्याने शिक्षणाच्या क्षेत्रातही गुरुजी वावरले. 'गुरुजी' हे बिरुद त्यांच्याइतके महाराष्ट्रात अन्य कुणीही सार्थ केलेले नाही. तसे अंमळनेरच्या शाळेत शिक्षक म्हणून ते पाच-सहा वर्षेच होते. पण शाळेच्या चिमण्या जगाचा निरोप घेऊन राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या लढ्यात भाग घेतल्यावरसुद्धा त्यांनी आपली शिक्षकाची भूमिका कधी सोडली नव्हती. समाजशिक्षणाचे कार्य अनेक अंगांनी ते सतत करीतच राहिले आणि महाराष्ट्राचे गुरुजी बनले.

साने गुरुजींच्या व्यक्तिमत्त्वाचा पिंड हा श्रद्धाशील समर्पणवृत्तीच्या प्रेमळ अशा आर्त भक्ताचाच होता. त्यांनी मानवावर आणि मानवेतर सृष्टीवरही अपार प्रेम केले. प्रेमधर्माचे ते यात्रिकच होते. 'खरा तो एकचि धर्म । जगाला प्रेम अर्पावे' अशा तऱ्हेच्या प्रेमधर्माची पताका त्यांनी आयुष्यभर फडकवत ठेवली. गुरुजींनी आपल्या वागणुकीतून, शिकवणुकीतून सर्वत्र प्रेमधर्माची शिकवण दिली. प्रेमाच्या फडाचे ते फडकरीच होते. प्रेमाच्या दिंडीचे ते दिंडीकरच होते.

त्यांची ही प्रेमदिंडी आपण अशीच पुढे नेऊया!

❏

अनुक्रमणिका

**महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई**

## नवी प्रकाशने

**ग. त्र्यं. माडखोलकर**
**व्यक्तित्त्व आणि कर्तृत्व** (संपादित)
*संपादक : डॉ. वि. स. जोग व इतर*
पृष्ठसंख्या २२५, मूल्य रु. ९०

**ज्ञानोदय लेखनसारसूची**
खंड २रा भाग दुसरा (संपादित)
*संपादक : डॉ. गंगाधर मोरजे*
पृष्ठसंख्या १०९०, किंमत रु. ३००

**शिल्प प्रकाश** (अनुवाद)
*डॉ. र. पु. कुलकर्णी*
पृष्ठसंख्या २८४, मूल्य रु. १६७

**धम्मपद** (अनुवाद, पुनर्मुद्रण)
*पुरुषोत्तम मंगेश लाड*
पृष्ठसंख्या २२१, मूल्य रु. १०८

**एस. एम. जोशी**
**(स्वातंत्र्यसेनानी व समाजवादी नेते)**
'महाराष्ट्राचे शिल्पकार' या
ग्रंथमालेतील १ले प्रकाशन
*प्रा. ग. प्र. प्रधान*
पृष्ठसंख्या ११०, मूल्य रु. ४०

**प्रबोधनकार ठाकरे समग्र वाङ्मय**
खंड ४था (हिंदुत्व) संपादित
*संपादक : श्री. पंढरीनाथ सावंत व इतर*
पृष्ठसंख्या २००, मूल्य रु. १०५

**स्वामी रामानंद तीर्थ यांची रोजनिशी**
(संपादित)
*संपादक : प्रा. वि. पां. देऊळगावकर*
पृष्ठसंख्या १७४, किंमत रु. ६०

**स्वरयोगिनी**
*पं. ए. पी. नारायणगावकर*
पृष्ठसंख्या १५७, मूल्य रु. ८५

**पाली-मराठी शब्दकोश**
*बाबा भारती*
पृष्ठसंख्या २९९, मूल्य रु. ४२६

**लोकशाही अण्णा भाऊ साठे**
**निवडक वाङ्मय**
(द्वितीय आवृत्ती)
*संपादक : अर्जुन डांगळे व इतर*
पृष्ठसंख्या ११८३, मूल्य रु. १२५

.............................................................................................................................


**मंडळाची प्रकाशने मिळण्याची ठिकाणे**

सर्व शासकीय ग्रंथ भांडार
मुंबई, पुणे, नागपूर, औरंगाबाद
व
महाराष्ट्रातील प्रमुख ग्रंथ विक्रेते.

**अधिक माहिती/चौकशीसाठी**

सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ,
मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय इमारत,
तिसरा मजला, दादर (पूर्व), मुंबई- १४
दूरध्वनी ४१४४०२१, ४१४६००५

अनुक्रमणिका



**श्री. राजा मंगळवेढेकर**

मराठीतील एक साहित्यिक व सामाजिक कार्यकर्ते म्हणून श्री. राजा मंगळवेढेकर यांची विशेष प्रसिद्धी आहे. स्वातंत्र्यलढ्यातील एक सैनिक, राष्ट्र सेवादल, आंतरभारती, साने गुरुजी कथामाला आदींशी त्यांचा निकटचा संबंध आहे. साने गुरुजींच्या सहवासातून त्यांना साहित्यलेखनाची व मुलांसाठी कथाकथनाची प्रेरणा मिळाली असून त्यांची सुमारे २०० पुस्तके प्रसिद्ध आहेत. त्यामध्ये बहुसंख्येने बालसाहित्याचा समावेश आहे.

'साने गुरुजींची जीवनगाथा' हे साने गुरुजींचे विस्तृत चरित्र तसेच 'मित्राय नमः', 'मित्राय नमो नमो', 'मित्रदेवोभव' या पुस्तकांमधून त्यांनी काही विशेष व्यक्तींचा परिचय घडविला आहे. 'आठवणीतील अण्णा-गदिमा', 'शाहीर ग. दि. माडगूळकर', 'समुद्र, मासा आणि माणूस', 'अखेरची झुंज' ही पुस्तके तसेच 'रंग आणि चित्रांगण' हे त्यांचे काव्यसंग्रह विशेष प्रसिद्ध आहेत. 'कथा आणि कथाकथन' व 'बिनभिंतीची उघडी शाळा' हेही त्यांचे ग्रंथ प्रसिद्ध आहेत. १९८५ साली पुण्यात भरलेल्या 'बालकुमार' साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले आहे. गेली ५० वर्षे महाराष्ट्रभर हिंडून खास मुलांसाठी कथाकथन करून साने गुरुजींची परंपरा त्यांनी पुढे चालू ठेवलेली आहे.

अखिल भारतीय साने गुरुजी कथामालेचा 'बालसेवा' पुरस्कार, कोपरगाव येथील स्वातंत्र्यसैनिक श्री. मामा गवारे फाउंडेशनचा 'बालआनंद' पुरस्कार, प्रा. बाबुराव शिरोळे हा बालसाहित्य लेखकासाठीचा पुरस्कार, फुलराणी थिएटरचा 'पंडित जवाहरलाल नेहरू स्मृती' पुरस्कार, महाराष्ट्रातील सांस्कृतिक क्षेत्रातील मानाचा समजला जाणारा 'गदिमा' पुरस्कार तसेच, केंद्र व राज्यशासनाचे उत्कृष्ट वाङ्मय निर्मिताचे पुरस्कार आदी पुरस्कारांनी ते सन्मानीत झालेले आहेत.

अनुक्रमणिका